पहा, नवखा शेतकरी शेत नांगरीत आहे. शिदोरीचा हारा आणणाऱ्या स्त्रीला पाहतांच गरीब बिचारा इतका बावरला कीं जुंवाचा कासरा सोडण्याऐवजीं त्यानें बैलांच्या वेसणीच सोडल्या !

● शेतकरी नवखा होता असें मुळांत स्पष्ट सांगितलेलें असलें तरी खेडेगांवांत, शेतांच्या सान्निध्यांत वावरणाराच्या हातून कधींही होणार नाहीं अशी ही चूक व धांदल पाहून वाटतें कीं तो लटका शेतकरी असावा; शिदोरी आणणाऱ्या स्त्रीबरोबर संकेत ठरवून त्यानें त्रिदंडी संन्यासासारखा हा मजुराचा तात्पुरता पेशा घेतलेला असावा. या गोंधळामुळें बिचाऱ्याचा संकेत विफल झाला असावा असें दिसतें.

६९३ नन्दीबैल : 693. Cuckold.

दट्ठूण हरिअदीहं गोसे सण्ढाणँ जूरए हलिओ ।
असईरहस्समग्गं तुसारधवले तिलच्छेत्ते ॥ ९३ ॥

[दृष्ट्वा हरितदीर्घं प्रातर्वन्येभ्यः कुप्यति हलिकः ।
असतीरहस्यमार्गं तुषारधवले तिलक्षेत्रे ॥]

दंवामुळें तिळाचें शेत पांढुरकें दिसत होतें. त्यांतून रात्रीं कोणी स्वैरिणी गुप्तपणें गेलेली असल्यामुळें लांबवर हिरवीगार पाऊलवाट दिसत होती. पहांटे शेतावर फेरी मारण्यास गेलेला शेतकरी हें दृश्य पाहून बैलांवर चिडला.

● कांहीं टीकाकार सांगतात, ही नीहाराभिसारिका त्याचीच बायको होती; पण हें कांहीं ह्या नन्दीबैलाच्या ध्यानांत आलें नाहीं. त्या मूर्खाला वाटलें कीं बैलांनींच आपलें शेत तुडवलें, म्हणून तो त्यांच्यावरच रागावला.

१. वण्ठाण जूरए, णइजूरए. २. नातिखिद्यते, प्रातर्वृषभाखिद्यति.

'णइजूरए'—'नातिखिद्यते' हा पाठ स्वीकारला तर अर्थ बदलतो: माणसाऐवजीं शेतांत जनावरें घुसलीं असतीं तर केवढें नुकसान झालें असतें, या विचारामुळें तो रागाला आला नाहीं.

६९४ घराची ओढ : 694. Yearning.

संकेल्लिओ व्व णिज्जइ खण्डं खण्डं कओ व्व पीओ व्व ।
वासागमम्मि मग्गो घरहुत्तसुहेण[2] पहिएण ॥ ९४ ॥

[संकोचित[3] इव नीयते खण्डं खण्डं कृत इव पीत इव ।
वर्षागमे मार्गो गृहभविष्यत्सुखेन[4] पथिकेन ॥]

पावसाळ्याच्या प्रारंभीं घराकडे परतणारा प्रवासी घरीं पोंचल्यानंतर प्राप्त होणाऱ्या सुखांच्या आशेनें जणूं रस्ता संकुचित वा खण्डित व्हावा अगर पिऊन टाकला जावा तसा (मार्गक्रमणाचे क्लेश न जुमानतां) झपाझप चालतो.

६९५ बहिरे व आंधळे : 695. Deaf and Blind.

धण्णा बहिरा अन्धा ते च्चिअ जीअन्ति माणुसे लोए ।
ण सुणंति पिसुणवअणं खलाणँ ऋद्धिं[5] ण पेक्खन्ति ॥ ९५ ॥

[धन्या बधिरा अन्धास्त एव जीवन्ति मानुषे लोके ।
न शृण्वन्ति पिशुनवचनं खलानामृद्धिं न प्रेक्षन्ते ॥]

---

१. साहइ. २. मणेण, मुहेण. ३. संकलित, संवेष्टित. ४. गृहाभिमुखमनसा.
५. अद्धिं.

जे बहिरे आहेत व आंधळे आहेत ते धन्य आहेत; खरोखर, या मनुष्यलोकांत तेच जगतात; कारण त्यांना चहाडखोरांचें घातकी बोलणें ऐकूं येत नाहीं किंवा नीचांची दुष्ट समृद्धि दिसत नाहीं.

● दुर्जनांची अभिवृद्धि पाहून उद्विग्न झालेल्याचे उद्गार. किंवा, पति आंधळा व बहिरा आहे, तरी गुणी आहे, शिवाय या शारीरिक वैगुण्यामुळें सपत्नींचा उपसर्ग नाहीं, म्हणून तो मला प्रिय आहे आणि मी सुखी आहे, असे साध्वीचे उद्गार.

६९६ निवारण : 696. Too Late.

एण्हिं वारेइ जणो, तइआ मूइल्लओ, कहिं व्व गओ ।
जाहे विसं व जाअं सव्वङ्गपहोलिरं पेम्म ॥ ९६ ॥

[इदानीं वारयति जनस्तदा मूलकः कुत्रापि वा गतः ।
यदा विषमिव जातं सर्वाङ्गघूर्णितं प्रेम ॥]

आतां प्रेम सर्वाङ्गांत विषासारखें भिनलें आहे. आतां त्याचें निवारण करूं पाहणारे मुळारंभीं काय दुसरीकडे गेले होते !

● सखि, त्याचे अवगुण आतां कशाला सांगतेस ! आरंभीं सूचना देतीस तर मी मन आवरलें असतें. आतां प्रेम हृदयांत रुजलें. आतां हे रोपटें उपटावयाचें, म्हणजे माझें हृदयच विदीर्ण करावयाचें.

६९७ घरजांवई : 697. Nonchalance.

कहँ ? तंपि तुह ण णाअं, जह सा आसन्दिआणँ बहुआणम् ।
काऊण उच्चवाचिअं तुह दंसणलेहला पडिआ ? ॥ ९७ ॥

१. मुरलिओ. २. जनस्तद्ग्रामतः ३. णेहला, लम्हडा, लेहडा

[कथं तदपि त्वया न ज्ञातं यथा सा आसन्दिकानां बहूनाम् ।
कृत्वा उच्चावचिकां तव दर्शनलालसा पतिता ॥]

तूं जाऊं लागलास तेव्हां तुझें दर्शन घेण्याच्या लालसेनें खुर्चीवर खुर्ची ठेवून त्यांवर ती उभी राहिली. या उतरंडीवरून ती कोसळली, हें तुला कसें कळलें नाहीं ?

● संपन्न सासर सोडून अपमानामुळें व्यथित झालेला घरजांवई आपल्या दरिद्री पितृगृहीं जावयास निघाला तेव्हांचा हा प्रसंग आहे. जातांना तो आपल्याला डोळे भरून अखेरचें पाहून घेईल अशी त्याच्या पत्नीची खुळी आशा होती. ही दृष्टिभेट टाळण्याचा त्याचा निग्रह होता; कारण तीमुळें आपला निश्चय ढळेल अशी त्याची खात्री होती. प्रीति व संपत्ति यांचें द्वंद्व सनातन आहे.

६९८ सूचना : 698. Alarm.

चोराणँ, कामुआणँ अ पामरपहिआणँ कुक्कुडो वअइ ।
रे रमह, वहह, वाहेयह, एत्थ, तणुआअए रअणी ॥ ९८ ॥

[चौरान्कामुकांश्च पामरपथिकांश्च कुक्कुटो वदति ।
रे रमत वहत वाहयत अत्र तन्वी भवति रजनी ॥]

चोर, कामुक व गरीब वाटसरू यांना पहांटे कोंबडा आरवून सांगतो कीं अरे, आतां (चोरीचा माल) पळवा, (प्रेम) आवरतें घ्या व (ओझ्याचीं जनावरें) हांका; कारण रात्र क्षीण होत आहे.

---

१. लम्पटा. २. रडइ. ३. पलह रमह वाहय. ४. तणुइज्जइ. ५. कर्षकाणां पथिकानां. ६. रटति. ७. पलायत रमध्वं वाहयत.

६९९ प्रीतिसंगम : 699. Union.

अण्णोण्णकडक्खन्तरपेसिअमेलीणादिट्ठिपसराणम् ।
दो च्चिअ मण्णे कअभण्डणाइँ समअं पहसिआइं ॥ ९९ ॥

[अन्योन्यकटाक्षान्तरप्रेषितमिलितदृष्टिप्रसरौ ।
द्वावपि मन्ये कृतकलहौ समकं प्रहसितौ ॥]

दोघेंही एकामेकांवर रुसलीं होतीं. अंतःप्रेरणेनें त्यांनीं एकमेकांकडे चोरून कटाक्ष टाकले ! त्यांच्या दृष्टीचें मीलन झालें, तेव्हां दोघेंही एकदम हंसलीं.

● अनुनयाचा आरंभ दुसऱ्यानें करावा अशी दोघांचीही इच्छा होती; कारण त्यांचा कलह कृत्रिम होता. हंसल्यानंतर त्यांनीं एकमेकांना विचारलें असेल कीं अगादर कोण हंसलें आणि एकमेकावर आरंभाचा आरोप केला असेल. मुळांतील ' मन्ये ' या शब्दावरून वाटतें, या प्रसंगीं सखी हजर असून तिनें या प्रश्नाचें उत्तर दिलें असावें कीं दोघेंही जोडीनें हंसलीं; किंवा सखीच्या अनुरञ्जनासाठीं तिनें अशा प्रसंगाचें वर्णन केलेलें असावें. अमरुशतकांतील समानार्थी वचन पहाः एकस्मिन् शयने पराङ्मुखतया वीतोत्तरं ताम्यतो रन्योन्यस्य हृदि स्थितेऽप्यननुये संरक्षितोर्गौरवम् । दम्पत्योः शनकैरपाङ्गवलनान्मिश्रीभवच्चक्षुषोर्भग्नो मानकलिः सहासरभसव्यासक्तकण्ठग्रहम् ॥ १९ ॥ लेले-प्रत.

---

१. कलक्खलसावेसिअमेलिण, छलपेछीअसुलग्गमेलीण, सिअमंगुलग्गमेलीण.
२. छलप्रेक्षित.

७०० सायंसन्ध्या : 700. Evening Oblation.

संझागहिअजलञ्जलिपडिमासंकन्तगोरिमुहकमलम् ।
अलिअं चिअ फुरिओट्ठं विअलिअमन्तं हरं णमह ॥ १०० ॥

[संध्यागृहीतजलाञ्जलिप्रतिमासंक्रान्तगौरीमुखकमलम् ।
अलीकमेव स्फुरितोष्ठं विगलितमंत्रं हरं नमत ॥]

(मावळत्या सूर्याला) अर्घ्य देण्यासाठीं अञ्जलींत घेतलेल्या जलांत गौरीचें आरक्त मुखकमल प्रतिबिंबित झालेलें पाहून शंकराला मंत्रांचा विसर पडला आणि (प्रियेच्या सान्निध्यामुळें) आपलें चित्त व्याकुळ झालें आहे हें कोणाच्या ध्यानीं येऊं नये म्हणून (जणूं आपण मनातल्या मनांत मंत्र म्हणत आहोंत असें भासविण्यासाठीं) ज्यानें उगाच ओठ हलविले, त्याला नमस्कार असो.

● पहिल्या गाथेंतील प्रणाम उगवत्या सूर्याला अर्घ्य देणाऱ्या पशुपतीला व अखेरच्या गाथेंतील नमन मावळत्या सूर्याला अर्घ्य देणाऱ्या गौरीहराला. संन्यासी टीकाकार सांगतात, शंकरालाही सन्ध्योपासनेंत व्याकुलचित्त करणारा स्त्रीसङ्ग सर्वथा त्याज्य आहे ! आणि शृङ्गारी टीकाकार सांगतात, पहा, शंकर एवढा विरागी, तरी किती सहृदय ! गौरी सदैव सन्निध असूनही प्रेमामुळें उपासनेचे वेळींही देवाधिदेव व्याकुलचित्त होतो; नाहीं तर, पत्नी पतीला म्हणते, तूं ! एकान्तांत आणि प्रेमप्रसंगींही मनासारखें अनुरंजन करीत नाहींस !

● ● ●

---

१. मत्तं.

इअ सिरिहालविरइए पाउअकव्वम्मि सत्तसए ।
सत्तमसअं समत्तं गाहाणँ सहावरमणिज्जम् ॥
[इति श्रीहालविरचिते प्राकृतकाव्ये सप्तशते ।
सप्तमशतं समाप्तं गाथानां स्वभावरमणीयम् ॥]

● ● ●

एसो कइणामंकिअ गाहापडिबद्धवड्ढिआमोओ ।
सत्तसअओ समत्तो सालाहणविरइओ कोसो ॥
[एष कविनामाङ्कितगाथाप्रतिबद्धवर्धितामोदः ।
सप्तशतकः समाप्तः शालवाहनविरचितः कोषः ॥]

● ● ●

● सगळें सातवें शतक हालाच्या नांवावर खपतें. ही समजूत या गाथेवर आधारलेली आहे.

॥ गाथासप्तशती ॥

उत्तरार्ध

● या भागांत समाविष्ट केलेल्या गाथांपैकीं क्र. ७०१ ते ९९४ या वेबर प्रतीवरून घेतलेल्या आहेत. त्यांचें मूळ येणेंप्रमाणें : क्र. ७०१ व ७०२ या गाथा अनुक्रमें कुलनाथ व पीतांबर यांच्या हस्तलिखित प्रतींतील आहेत. क्र. ७०३ ते ७९३ या गाथा वेगवेगळ्या हस्तलिखितांतील आहेत. क्र. ७९४ ते ८०८ या साधारणदेवाच्या मुक्तावलींतील असून क्र. ८०९ ते ९४७ या तेलंग (१) व क्र. ९४८ ते ९५९ या तेलंग (२) या हस्तलिखित प्रतींतील आहेत. क्र. ९६० ते ९९४ या गाथा संस्कृत अलङ्कार-वाङ्मयांत गाथासप्तशतींतील म्हणून ऊधृत केलेल्या आहेत. वेबरनें आपल्या आवृत्तींत गाथांच्या संस्कृत छाया कोठेंही दिलेल्या नाहींत. उत्तरार्धांतील गाथांच्या ज्या छाया मला मिळाल्या त्या मी जागोजाग दिल्या आहेत. वेबर आवृत्तीवरून घेतलेल्या गाथांचे अखेरीस त्याचे इंग्रजी क्रमांक मुकाबल्यासाठीं दिले आहेत. क्र. ९९५ ते १००६ या गाथा प्रबन्धचिंतामणींतून घेतलेल्या आहेत. या गाथा हालानें संपादन केल्याची कथा त्यांत दिलेली आहे.

७०१ सखी : 701. Request.

सुहअ ! इअं मज्झ सही तुज्झ विओएण धारिउं पाणे ।
सव्वह चिअ ण समत्थ त्ति बुज्झिउं विरम गमणाओ ।। 703 ।।

सुभग, ही माझी सखी तुझ्या विरहांत प्राणधारण करण्यास सर्वस्वीं असमर्थ आहे, हें जाणून तूं प्रवासाला जाऊं नको.

७०२ प्रतिज्ञा : 702. Declaration.

गामारुह म्हि, गामे वसामि, णअरट्ठिइं ण आणामि ।
णाअरिआणं पइणो हरेमि, जा होमि सा होमि ।। 705 ।।

[ग्रामारुहाऽस्मि ग्रामे वसामि नगरस्थितिं न जानामि ।
नागरिकाणां पतीन् हरामि या भवामि सा भवामि ॥]

मी खेड्यांत जन्मलें व आजवरचें आयुष्य खेड्यांतच काढलें; यामुळें शहरी राहणीची मला माहिती नाहीं. तरी या शहरी स्त्रियांच्या पतींना मी नादीं लावीनच लावीन. तरच मी खरी, मग काय व्हाव-याचें असेल तें होवो..

● छाया काव्यप्रकाशावरून. चंद्रालोकावरील गागाभट्टाच्या राकागम व्याख्येंतील समानार्थी गाथा: ग्राम्यास्मि नागरीवृत्तेरनभिज्ञापि तादृशी। रमणानां मानसानि नागराणां हराम्यहम् ॥ (चौखम्बा प्रत : पृ. १३७). नगरच्या नारी, गोऱ्या पान, फुसका माल, लटका मान; रानची होशी, बावनकशी, होशिल खुषी, पडशील फशीं ! प्रतिशित स्पर्धेत नागरकांचा पाडाव व नागरिकांचा पराभव होणार, हें उघड आहे.

---

१. गम्मइरि अम्हि, गामरुहाणि (गामारि अम्हि) गामे वहामि. २. वसम्मि. ३. पइणो. ४. ग्राम्यास्मि, ग्रामे जाता.

७०३ फसवणूक : 703. Character

ओसर ! रोत्तुं चिअ णिम्मिआइँ मा पुससु मे हअच्छीइं ।
दंसणमेत्तुम्मइएहि जेहि सीलम् तुह ण णाअं ॥ 706 ॥

[अपसर रोदितुमेव निर्मिते मा उत्पुंसय हते अक्षिणी मे ।
दर्शनमात्रोन्मत्ताभ्यां याभ्यां तव हृदयमेवं रूपं न ज्ञातम् ॥]

जा, दूर सर; माझे हे जळ्ळे डोळे रडण्यासाठींच निर्माण झाले आहेत; ते पुसूं नको. तुझ्या नुसत्या दर्शनानें ते उन्मत्त झाले; मात्र त्यांना तुझें शील समजलें नाहीं.

● छाया ध्वन्यालोकावरून. येथील पाठ थोडा वेगळा आहे. त्याचा अर्थ असा : माझे नेत्र तुझ्या शरीराचें रूप पाहून उन्मत्त झाले, त्यांना तुझ्या हृदयाचें रूप उमजलें नाहीं.

७०४ अधीर : 704. Impatience.

रणरणअसुण्णहिअओ चिंतंतो विरहदुव्वलं जाअं ।
अप्पुणिअणिअवसही सो वोलीणो गाममज्झेण ॥ 707 ॥

उत्कण्ठेमुळें त्याचें हृदय इतकें सुन्न आणि विरहामुळें इतकें दुबळें झालें होतें कीं खेड्यांतल्या वाटेवरून चालतां चालतां आपलें घर ओलांडून तो तसाच पुढें गेला.

---

१. अवसर. २. रोहुं. ३. दसणमेत्तुम्मत्तेहिं. ४. हिअअं. ५. प्रोञ्छ, मार्जय. ६. दर्शनमात्रे प्रसक्ताभ्यां, मात्रोन्मादिताभ्यां. ७. दुब्बलं, दुब्बलं, दोब्बलं. ८. अणिअणिअवसइ, आसंम्बिअवसही, उम्मिअणिअवसही.

● त्याला आपल्या घराचीही शुद्ध राहिली नाहीं. मग तो तसाच पुढें गेला, कीं त्याच्या घरधनिणीनें त्याला परत बोलावून आणविलें ? कीं तिची दासी या बुआजींचा विसरभोळेपणा धनिणीच्या निदर्शनास आणीत आहे ?

७०५ बहुजन : 705. Majority.

सुअणो ण दीसइ व्विअ खलबहुले डड्ढजीअलोअम्मि ।
जह काअसंकुला तह ण हंसपरिवारिआ पुहवी ।। 710 ।।

[सुजनो न दृश्यत इव खलबहुले दग्धजीवलोके ।
यथा काकसंकुला तथा न हंसपरिवारिता पृथ्वी ।।]

या दुष्ट जगांत नीच माणसेंच बहुसंख्य आहेत; येथें सज्जन क्वचितच आढळतात. पृथ्वी कावळ्यांनीं भरलेली आहे. हंस मात्र क्वचितच दिसतात.

● ही गाथा पीतांबरानें दिलेली आहे. पहाः गाथासप्तशतीप्रकाशिका : क्रमांक ४०५ : संपादक श्री. जगदीशलाल शास्त्री. खलनायकाला उद्देशून वत नायिकेचे उद्गार; किंवा अभिसारिकेला धोक्याची सूचना. दृष्टान्तोक्ति.

७०६ सुयोग : 706. Fortunate.

जं मुच्छिआइ ण सुओ कलंबगंधेन तं गुणे पडिअं ।
इअरा गज्जिअसद्दो जीएण विणा ण वोलन्तो ।। 711 ।।

[यन्मूर्च्छिता न च श्रुतः कन्दम्बगन्धेन तद्गुणे पतितम् ।
इतरथा गर्जितशब्दो जीवेन विना न व्यतिक्रामेत् ।।]

१. तं से गुणम्मि जाअं कलम्बगन्धेण जं गआ मोहम् । २. तत् तस्याः गुणविषये जातं ।

कदम्बाच्या सुगंधामुळें ती मूर्च्छित झाली आणि मूर्च्छेमुळें तिला मेघगर्जना ऐकू आली नाहीं. हा सुयोगच म्हटला पाहिजे. नाहींतर मेघगर्जना ऐकून तिचा अंतच झाला असता.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून. कदम्बाच्या मादक सुगंधामुळें तिला मूर्च्छा आली, हा त्याचा दोष, पण तोच गुण ठरला; नाहींतर, तिला मेघगर्जना ऐकूं आली असती, यामुळें तिची विरहव्यथा तीव्र झाली असती आणि तिचा अंत झाला असता.

७०७ इंद्रधनुष्य : 707. Splendour.

पीणपओहरलग्गं दिसाणँ पवसन्तजलअसमअविइण्णं ।
सोहग्गपढमइण्हं पम्माअइ सरसणहवअं इन्दधणुम ॥ 712 ॥

[पीनपयोधरलग्नं दिशां प्रवसज्जलदसमयवितीर्णम् ।
सौभाग्यप्रथमचिन्हं प्रम्लायति सरसनखपदमिन्द्रधनुः ॥]

(वर्षाकाळांत स्वगृहीं राहून शरद् ऋतूचे आरंभीं) प्रवासाला निघालेल्या पतीनें पत्नीच्या पुष्ट स्तनांवर केलेल्या व तिच्या सौभाग्याचें प्रथमचिन्ह असलेल्या नखक्षतांपुढें पावसाळ्याच्या अखेरीस आभाळांत दाटलेल्या मेघांवर आधारलेल्या इंद्रधनुष्याची शोभा म्लान दिसते.

● ही गाथा श्री प्रवरसेनाच्या सेतुबन्धांतील (१.२४) आहे. या गाथेचा शृंगारिक अर्थ नीट लागत नाहीं, असें वेबर सांगतो. हा घोटाळा शुद्ध पाठाच्या अभावीं झालेला असावा. अलंकारकौस्तुभांतील व श्री राम-दासाच्या सेतुबन्धावरील टीकांवरून अर्थ स्पष्ट होतो. नायिकेच्या परस्परांना भिडलेल्या व पुष्ट स्तनांवर प्रवासाला निघालेल्या पतीनें उमटविलेलीं नखांचें

१. [illegible]. २. [illegible] ३. प्रसवत्. ४. वितीर्णम्.

आणि आकाशांत या पासून त्या क्षितिजापर्यंत पसरलेल्या पयोधरांवर प्रवासाला निघालेल्या पावसाळ्यानें प्रकटविलेलें इंद्रधनुष्य यांच्या शोभेची तुलना पयोधरांच्या द्वयर्थी आधारानें कवीनें केली आहे. अलंकारकौस्तुभांत रूपकाचें उदाहरणः " तद्रूपकं त्वभेदः स्यादुपमानोपमेययोर्यत्र । "

७०८ अगतिक : 706. Lost.

एत्ती मत्तम्मि थवा पुत्तीमत्तम्मि लअणा भत्ती ।
अगईअ अवत्थाए दिअहाई भित्तरं तरइ ॥ 713 ॥

आजवर स्तवन केलें; आतां इच्छापूर्ति झाली तर भक्ति कृश होईल; अशा अगतिक अवस्थेंत मी दिवस कसेबसे काढीत आहे.

● अर्थ नीट लागत नाहीं. एक टीकाकार सांगतो : ' एतेन यस्य यदुचितम् कर्म तस्य तत्परिशीलयतो वैरूप्यापत्तिरपि अलंकारायेति दर्शितम् । '

७०९ आग : 709. Red-Hot.

जं असरणो व्व डड्ढो गामो साहीणबहुजुआणो वि ।
संभमविसंठुलाणं तं दुच्चरिअं तुह थणाणं ॥ 714 ॥

गांवांत अनेक तरुण होते; तरी गांवाला आग लागली तेव्हां कोणी त्राता नसल्यासारखें तें गांव पूर्णपणें जळून गेलें. हा तुझ्या स्तनांचा अपराध; कारण त्या वेळीं तुझें वक्षःस्थल उघडें पडलें होतें आणि त्यावरून तरुणांच्या नजरा हलेनातच.

१. मत्तम्मी, मंतम्मि. २. दड्ढो. ३. अशरण, अरक्षक. ४. संभ्रमविसंस्थितयोः

● तुझ्या निर्दोष व तेजःपुंज स्तनांचा हा दोष व कलंक; कारण त्यांच्या दर्शनामुळें तरुणांच्या चित्तांत संभ्रम उत्पन्न झाला. आग लागली होती एकीकडे आणि त्यांना तिचा भडका दुसरीकडेच दिसत होता.

७१० चषकः　　710. Wine-Glass.

सो वि जुआ माणहणो, तुमं पि माणस्स असहणा, पुत्ति !
मत्तच्छलेण गम्मउ सुराइ उवरिं पुससु हत्थं ॥ 715 ॥

मुली, हा तरुण मानी आहे आणि तुला तर कोणाचाही रागरोष सहन होत नाहीं. मद्याचा मद चढल्याच्या निमित्तानें तूं चषकाला नुस्ता हात लाव, (म्हणजे झालें.)

वेबर सांगतो, या गाथेचा अर्थ नीट लागत नाही. दूतीची कलहान्तरितेला किंवा कुट्टिनीची दुहितेला अनुनयाची प्रेरणा. मानखेदामुळें तूं मद्यपानाविषयीं उत्सुक नाहींस हें खरें, त्याच्या समाधानासाठीं तूं चषकाला नुस्ता हात लाव, त्याला एवढाही आविर्भाव अनुनयासारखा भासेल.

७११ केतकी :　　711. Thorns.

केअइगंधहगव्विआरअरंजिआइणोहिं ।
कंठअसवलितणुतव छड्डिअमवलाणं ॥ 716 ॥

केतकीनें आपल्या गंधानें मानिनींना व्याकुल केलें आणि त्यांना जणूं आपलें वैशिष्ट्य अर्पण करून रोमांचित केलें व त्यांचा मान नष्ट केला.

१. मणुस्स.

७१२ धुंद : 712. Flush.

अह सुअइ दिण्णपडिवक्खवेअणा पसिढिलेहिँ अंगेहिँ ।
णिव्वत्तिअसुरअरसाणुबंधसुहणिब्भरं बहुआ ॥ 717 ॥

[अथ स्वपिति दत्तप्रतिपक्षवेदनं प्रशिथिलैरङ्गैः ।
निवर्तितसुरतरसानुबन्धसुखनिर्भरं स्नुषा ॥]

रात्रीं सुरतसुखाचा मनमुराद आस्वाद घेतल्यामुळें सूनबाईची गात्रें शिथिल झालीं आहेत व सकाळ झाली तरी अजून त्या त्याच धुंदींत गाढ झोंपल्या आहेत. यामुळें तिच्या सवती मत्सरग्रस्त झाल्या आहेत.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरूनः ' निद्रारूनेण रसप्रकर्षः । ' असूं प्रतिपक्षाला वेदना देतांना झालेल्या श्रमांमुळेंच तिचीं गात्रें शिथिल झालेलीं आहेत. आम्हांला ठाउकी आहे, म्हणून इतका वेळ लोळत पडावयाचें कीं काय !

७१३ अधरक्षत : 713. Lip.

जइ तेण तुज्झ वअणं ण कअं, मह कारणेण अ, हआसे ।
सा कीस खण्डिअतडं णिआहरं दूइ ! दुम्मेसि ? ॥ 718 ॥

दूती, तूं सांगतेस कीं तूं माझ्याविषयीं केलेल्या विनंतीचा त्यानें धिक्कार केला. हें जर खरें, तर, दुष्टे, सांग, तूं आपला खण्डित अधर वारंवार कां चावते आहेस !

---

१. ओसुसई. २. सोण्हा. ३. सपत्नी.

७१४ आकाशाच्या सरोवरांत : 714. Firmament.

निर्मलगगनतडागे तारागणकुसुमामिते तिमिरे ।
भिकरवोचालम् चरति मृगाङ्को मराल इव ॥ 719 ॥

निरभ्र आकाशाच्या निर्मळ सरोवरांत जणूं ताऱ्यांचे पुष्पपुंज तरंगत आहेत आणि त्याच्या शांत पृष्ठभागावरून चंद्र जणूं हंसाप्रमाणें भ्रमण करीत आहे.

● या गाथेचें शुद्ध प्राकृत अगर संस्कृत रूप उपलब्ध नाहीं. आमि-सारिकेच्या उद्दीपनासाठीं दूतीचे उद्गार.

७१५ अनुमान : 715. Guesswork.

दिट्ठाइ जं ण दिट्ठो, सरलसहावाइ जं च णालविओ ।
उवआरो जं ण कओ तं चिअ कलिअं छइल्लेहिं ॥ 720 ॥

तिनें त्याला पाहिलें होतें, तरी तिनें त्याच्याकडे पाहिलें न पाहिलेंसें केलें; तिचा स्वभाव सरळ आहे, तरी तिनें त्याच्याशीं भाषण केलें नाहीं; एवढेंच काय, नुसतें अभिवादनही केलें नाहीं. तरी यावरून काढावयाचें तें अनुमान चतुर लोक काढतातच.

● अलंकारकौस्तुभांत विषम (विचित्र) अलंकाराचें उदाहरण: "संबन्धानुपपत्तौ इष्टार्थानाप्त्यनिष्टसंप्राप्तौ । जन्यजनकयोभयगुणक्रियाविरोधे च विषमः स्यात् ।" "इष्टसिध्यर्थमिष्टैषिणा क्रियमाणमिष्टप्रतिकूलाचरणं विचित्रालंकारः ।" वज्जालग्गांतील पाठ : सहसत्ति जं ण दिट्ठो सरलसहावेहि

१. दिट्ठीअ.

जं ण आलत्तो । उवयारो जे ण कओ तं चिअ कलियं छइल्लेहिं ॥
सहसा यत्र दृष्टः सरलस्वभावेन यन्नालपितः । उपकारो यन्न कृतस्तदेव कलितं छेकैः ॥

७१६ सीत्कारः — 716. Symptoms.

अविरलणिग्गअपुलओ पअडिअकंपो पमुक्कसिक्कारो ।
हेमंते पहिअजणो सुरआसत्तो व्व पडिहाइ ॥ 721 ॥

हिंवाळ्यांत प्रवासी थंडीमुळें कुडकुडत असतो, त्याचें अंग रोमांचित झालेलें असतें व त्याच्या मुखांतून सीत्कार निघत असतात; वाटतें कीं तो जणूं सुरतसुखाचाच आस्वाद घेत आहे.

● शीतार्तपथिकावस्थावर्णनाच्या निमित्तानें पथिकाला आवाहन.

७१७ अनुभवः — 717. Experience.

बहुविहविलासभरिए सुरए लब्भंति जाइ सोक्खाइं ।
विरहम्मि ताइ पिअसहि ! खाउग्गिण्णाइ कीरंति ॥ 722 ॥

प्रियसखी, विविध विलासांनीं भरलेल्या सुरतांत जीं सुखें मिळतात त्यांची आठवण करून विरहांत रवंथ करीत बसावें लागतें.

● जास्त झालें म्हणजे ओकाऱ्या सुरू होतात ! तुलनेसाठीं गाथा क्र. ६६८ पहा.

७१८ व्यूहः — 718. Labyrinth.

सेउल्लणिअंवालग्गसण्हसिचअस्स मग्गमलहंतो ।
सहि ! मोहघोलिरो अज्ज तस्स हसिओ मए हत्थो ॥ 723 ॥

१. सेओह. २. श्लक्ष्ण, सण्हह, सोण्ह, सूक्ष्म. ३. मूढब्भमिरो.

सखि, घामामुळें माझें पातळ नितंबांना चिकटलें होतें आणि तो इतका अधीर झाला होता कीं त्याला मार्गच सांपडेना; म्हणून मला भारी हंसूं आलें.

● साधारणदेवानें 'मग्गम्'–'मार्गम्' याचा अर्थ 'नीवीबन्धनक्रमम्' असा दिलेला आहे. नायिकेनें नीवी परिधान केलेली असावी असें दिसत नाहीं.

७१९ कर्णफूल : 719. Lotus.

दूई[1]कज्जाअण्णणपडिरोहं मा करेहिइ इमं ति ।
उत्थंघेइ[2] व तुरिअं तिस्सा कण्णुप्पलं पुलओ[3] ॥ 724 ॥

दूतीनें प्रियकराचा निरोप सांगितला तेव्हां अंगावर फुललेल्या रोमांचांमुळें तिच्या कानावरलें कमळ जरा उंच झालें. निरोप ऐकतांना आपण आड येऊं नये म्हणूनच जणूं तें बाजूला झालें.

● कीं कानांत कुजबुजला जाणारा संदेश ऐकूं यावा म्हणून तेंही मान उंचावून तो ऐकण्यासाठीं उत्सुकलें होतें !

७२० गोडबोली : 720. Sweet Tongue.

मा वच्चसु[4] वीसम्भं[5] पुत्तअ ! चडुआरओ इमो लोओ ।
सुईवेहो कण्णस्स पेच्छ ! किं णिज्जइ पमाणं ? ॥ 725 ॥

[मा गच्छत विस्रम्भं पुत्रक चाटुकारकोऽयं लोकः ।
सूचीवेधः कर्णस्य पश्यत किं नीयते प्रमाणम् ॥]

---

१. तुह दूई कहायण्णण, दूतीकार्याकर्णन. २. उत्थम्भेइ, उक्खिप्पेइ उत्क्षिप्यत इव. ३. पुलकः, पुरतः ४. गच्छह. ५. विश्वासम्.

मुला, या गोडबोल्यांच्या शब्दांवर विशेष विश्वास ठेवूं नको. पहा, सुईनें पाडलेलें कर्णछिद्र पुढें किती मोठें होतें !

● छाया पीतांबराच्या टीकेवरून. प्रशंसेनें हुरळून जाऊं नको. वेश्या प्रथम तुझें चित्त विद्ध करील व नंतर तें विदीर्ण करील.

७२१ अमृत : 721. Urge.

अमिअमअं[1] चिअ हिअअं, हत्था तण्हाहरा सअण्हाणं[2] ।
चंदमुह[3] ! कत्थ णिवसइ अमित्तदहणो तुह पआवो[4] ? ॥726॥

[अमृतमेव हृदयं हस्तौ तृष्णाहरौ सतृष्णानाम् ।
चंद्रमुख कुत्र निवसति अमित्रदहनस्तव प्रतापः ॥]

तुझें मुख चंद्रासारखें (शांतशीतल आहे); तुझ्या हृदयांत अमृत आहे. तुझ्या हस्तस्पर्शानें तृषार्तांची तहान भागते. शत्रूंना दहन करणारा अग्नि तुझ्या ठायीं आहे अशी कीर्ति आहे. तो कोठें आहे !

● छाया पीतांबरावरून. पीतांबरानें व वेबरनें ' चंदमुहि ' ' चंद्रमुखि ' हा पाठ घेतला आहे. त्यावरून नीट अर्थबोध होत नाहीं. अलंकार-कौस्तुभांत ' चंदमुह ' हाच पाठ घेतलेला आहे. विषादालंकाराचें उदाहरण : ' अभीष्टार्थविरुद्धलाभो विषादालंकार : ।' टीकेंत श्री विश्वेश्वरपण्डित सांगतात : ' अत्र हस्तस्य राजजनकत्वं तस्य प्रतापजनकत्वं । हस्तप्रतापनिष्ठ तृष्णा हरणदहन क्रिययोर्विरोधइति दिक् ।'

७२२ स्वप्नाख्याय : 722. Nightmare.

दिट्ठीअ जाव पसरो ताव तुमं सुहअ ! णिव्वुइं कुणसि ।
वोलीणदंसणो तह तवेसि जह होउंदिट्ठेण[5] ॥ 727 ॥

---

१. अमअं चिअ. २. तण्हाहरासअण्हाणं. ३. चंदमुहि. ४. अमित्तडहणो तुह पआवो. ५. होउवइण्णेन, होउविट्ठेण; दुट्ठासिविणेण, दुस्सुमिणेन.

सुभग, नजरेसमोर असतोस तोंवर तूं आनंदित करतोस आणि दृष्टि-आड झालास कीं त्रस्त करतोस. तुझें दर्शन स्वप्नांतल्या ऋत्विजासारखें आहे.

● ऋत्विजाचें दर्शन शुभ, स्वप्नांत मात्र त्याचें दर्शन अशुभ. स्वप्नाध्यायांत सांगितलें आहे : " रक्तांबरधरः कृष्णः स होता ऽ प्रियदर्शनः । ददाति दारुणं दुःखं दृष्टः, स्पृष्टो हिनस्ति च ॥ " तूं दृष्टीसमोर नसलास तरी चित्तचक्षूंना तुझें दर्शन होतें; स्वप्नांतील ऋत्विजदर्शनाप्रमाणें तें त्रस्त करतें. या गाथेंतील उद्गार बौद्ध धर्माच्या प्रचाराचे द्योतक आहेत असें मानण्यास जागा आहे. त्यांना प्रत्यक्षांतील होतृदर्शनही अप्रिय होतें.

७२३ अवस्था : 723. Crush.

काचित्कृतार्थाभिसारा सपत्नीः श्रावयन्ती अभिसारगुप्तिम् आह : कुप्पासम् इति । कूर्पासान्तरे त्वं पाक्षिकम् (?) भण ताः दुःखबलाधिकारेण सॉ स्तनयोर्मम कृतावस्था । कूर्पासकश्चोलः कञ्चुलिकेति यस्य प्रसिद्धिः ॥ 728 ॥

● मूळ गाथा मिळाली नाहीं. तीवरील टीका तेवढी वेबरनें दिली आहे. तीही अपूर्ण असल्यामुळें अर्थ नीट लागत नाहीं. अभिसार पूर्ण झालेली स्त्री सवतींना आपलें रहस्य सांगत आहे: ही माझी चोळी पहा. तिच्या स्थितीवरून तुम्हांला माझ्या स्तनांच्या दुर्दशेची कल्पना करतां येईल. ' कप्पासं कुप्पासं '– क्र. ८०५ आणि ही गाथा या एकच असाव्यात असें वाटतें.

७२४ मरला : 724. Delay

गज्जंति घणा, पंथाणो वहुतणा अ, पसारिआ सरिआ ।
अज्ज वि उज्जुअसीले ! पइणो मग्गम् पलोएसि ॥ 729 ॥

मेघ गर्जना करूं लागले, रस्त्यांवर हिरवेंगार गवत उगवलें आणि नद्यांना पूर आले. सरले, अजूनहि पति परत येण्याची का तूं वाट पहात आहेस !

● पति परतण्याची वेळ टळली. माथ्यावर चंद्र ढळला कीं स्त्रिया अधीर होतात; येथें तर ऋतु टळला आहे ! सतीत्वाची प्रशंसा कीं असतीत्वाला प्रोत्साहन ! वज्जालग्गांतील पाठ व छाया: गज्जन्ति घणा भग्गा य पन्थया पसरियाउ सरियाओ । अज्ज वि उज्जुयसीले पियस्स पन्थं पलोएसि ॥ ६४८ ॥ गर्जन्ति घना भग्नाश्च पन्थानः प्रसृताः सरितः । अद्याप्युजुशीले प्रियस्य पन्थानं प्रलोकयसि ॥

७२५ शीतोष्ण : 725. Cold-Heat.

उण्हो च्चि समत्थिज्जइ डाहेण सरोरुहाण हेमंतो ।
चरिएहि णज्जइ जणो संगोवंतो वि अप्पाणम् ॥730॥

हिंवाळा कमळांना जाळतो. म्हणून तो उष्ण. स्वभाव लपवला तरी तो कृतीवरून ओळखतां येतो.

● हेमंतनिंदेच्या निमित्तानें अभिसारस्थानभंगाची सूचना. पत्नीशीं गोड गोष्टी बोलून पतीनें अन्य स्त्रीसंग छपविण्याचा यत्न केला तरी ती त्याचें इङ्गित सहज ओळखूं शकते. आणि त्याच्या अपराधाचा पुरावा ? तिचा स्वतःचा दाह !

७२६ गौळण : 726. Milkmaid.

उवॅहारिआइ समअं पिंडारे उअ ! कहं कुणंतम्मि ।
णवबहुआइ सरोसं सव्व च्चिअ वछआ मुक्का ॥ 731 ॥

१. उपहारिकया. २. पैंडारो.

दोहन करीत असलेल्या गवळणीशीं मवळीबुवा (लाडीलाडें) बोलत असलेले पाहून चिडलेल्या त्याच्या नवश्वूनें सारीं वासरें मोकळीं सोडून दिलीं.

● आणि यामुळें उडालेल्या गोंधळांत त्यांचें बोलणें तसेंच राहून गेलें ! सरस्वतीकण्ठाभरणांतील पाठ : पढमघरिणीअ समअं उअ पिंडारे दरं कुणन्तम्मि । णववहुआइ सरोसं सव्व च्चिअ वच्छआ मुक्का ॥ प्रथम-गृहिण्या समकं पश्यामीरे भयं कुर्वति । नववध्वा सरोषं सर्वेऽपिच वत्सका मुक्ता ॥

७२७ उज्वला : 727. Bright.

पज्जालिऊण अग्गि मुहेण पुत्तिए ! किणो समोसरसि ! ।
थणअलसपडिअपडिमा फुरंति ण छिवंति ते जाला ॥ 732 ॥

मुली, तूं जरासा फुंकर घातलास आणि अग्नि एकदम प्रज्वलित झाला; लगेच चमकून तूं इतकी दूर कां सरकलीस ? ज्वाला कंप पावत आहेत हें खरें, पण त्या तुला स्पर्श करूं शकणार नाहींत. तुझ्या वक्षस्थलावर उमटलीं आहेत तीं फक्त त्यांचीं प्रतिबिंबें आहेत.

● कन्येचें मुग्धत्व व तिची कांति यांची भुजंगप्रलोभनार्थ वेश्यामातेनें केलेली प्रशंसा; किंवा रन्धनकर्मांत व्यग्र असलेल्या स्त्रीला अनुकूल करण्या-साठीं कुट्टिनीचे उद्गार; किंवा नायकप्रलोभनार्थ पामर नायिकेच्या स्तनमंडलाच्या शोभेचें वर्णन.

७२८ कान : 728. Lobes.

अग्गि अब्भुंत्तंतीअ पुत्ति ! पडिभागआ कवोलम्मि ।
कण्णोलंबिअपल्लवलच्छि संवेइ ते जाला ॥ 733 ॥

१. मुहेण. २. पुत्तलि. ३. अब्भुट्टंतीएँ, अब्भुअंतीएँ.

वध करण्याचा तुला अनुभव नाहीं; आणि तिच्या शरीरावर नखदंतांचीं चिन्हें खुलविण्याची तुला हौस आहे; हें कसें जमणार ?

७३३ मित्रमंडल : 733. Day-Moon.

विअलिअकलाकलावो चंदो मित्तस्स मंडलं विसइ ।
णिस्सारइ तादिसो च्चिअ, गअविहवं को समुद्धरइ ? ॥738॥

चंद्र एवढा सतेज व कलापूर्ण; पण सूर्य तळपत असतांना आकाशमंडलांत त्याचें तेज नष्ट होतें. ज्यांचें वैभव नष्ट झालेलें असतें त्यांचा उद्धार कोण करणार !

● मित्र = सूर्य व स्नेही. चंद्राच्या अंगीं सोळा कला तर कलावन्ताच्या अंगीं चौसष्ट. कलावन्तांचें माहात्म्य त्याच्या अंगच्या कलेच्या तेजावर आणि आश्रयदात्यांच्या औदार्यावर व रसिकांच्या प्रोत्साहनावर अवलंबून असतें. त्याचे मित्र श्रीमंत असतात, पण केवळ श्रीमंतांच्या बैठकींत त्याचें तेज पडत नाहीं. आश्रयदात्यांच्या समोर आश्रितांचें तेज पडत नाहीं.

७३४ पुंड्या : 734. Old is Gold.

जो होइ रसाईसओ सुविणट्ठाणं वि पुंडइच्छूणं ।
कत्तो सो होइ रसो मोहासाणं अणिच्छूणं ॥ 740 ॥

पुण्ड्या ऊंस इतका सरस असतो तो सुकला तरी रसाळ व गोड लागतो. इतर उसांत एवढी गोडी कोठून येणार !

● गलितयौवनेवर अनुरक्त असलेल्याचा उपहास करणारास उत्तर.

---

१. रसातिशयो. २. पुण्ड्र-इक्षु, पुण्ड्रेक्षूणाम्.

७३५ पद्मिनी : 735: Inference.

जइ वि हु दिल्लिंदिल्लिआ तह वि हु मा पुत्ति ! णग्गिआ ममसु ।
छेआ णअरजुआणो माअं धूआइ लक्खंति ॥ 741 ॥

पोरी, तूं अजून लहान आहेस हें खरें, पण आतां अशी नागवी हिंडूं नको; शहरांतले चावट तरुण मुलीवरून आईबद्दल अनुमान करतील.

● टीकाकार सांगतात कीं आपल्याही अंगीं पद्मिनीचे गुण आहेत असें तिची माता या उद्गारांनीं ध्वनित करीत आहे.

७३६ अभय : 736. Boon.

गअ,गंडअ,गवअ,सरभ,सेरिह,सद्दूल,रिक्ख जाईणं ।
थणआ वाहवहूए अभअं दाउं व णिक्कंता ॥ 742 ॥

जंगलांतल्या श्वापदांना अभय देण्यासाठींच जणूं व्याधस्त्रीचे स्तन पुढें सरसावले.

● व्याधस्त्री वयांत आली म्हणून तिचा पति आणि त्याच्या नेतृत्वाखालीं मृगयेला जाणारे व्याध तरुण शिकारीला जाईनासे झाले; म्हणून श्वापदांना अभय मिळालें. हत्ती, गेंडा, गवा, शरभ (अष्टपद सिंह), सैरिभ (रानरेडा), शार्दूल व अस्वल या श्वापदांचा या गार्थेतील उल्लेख मननीय आहे.

---

१. दिल्लदिल्लिआ, डुल्लिआ, मंदकिलिआ, पिदिल्लिआ. २. अनुमाति, लक्खंति लेक्खंति.

७३७ भृकुटि : 737. Limit.

भिउडीअ पुलोइस्सं, णिब्भच्छिस्सं, परम्मुही होस्सं ।
जं भणह तं करिस्सं सहीउ ! जइ तं ण पेच्छिस्सं ॥743॥

[भ्रुकुट्या प्रलोकयिष्ये निर्भर्त्स्ये पराङ्मुखी भविष्यामि ।
यद्भणत तत्करिष्ये सख्यो यदि तं न प्रेक्षिष्ये ॥]

तो आला कीं मी भुंवईवर आंठी चढवीन, त्याची निर्भर्त्सना करीन, त्याला पराङ्मुख होईन; सख्यांनो, जें जें सांगाल तें तें मी करीन, पण (कोठवर ?) त्याची माझी दृष्टादृष्ट झाली नाहीं तोंवर.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून. मानधारणाचें शिक्षण देणाऱ्या सखीप्रत नायिकेचे उद्गार. वेबरनें टीकेंत दिलेली आर्या: 'सखि ! कुरु तावत् यत्नं मम मनसिजवेदनाप्रतीकारे । क्रोडीकृताऽपि पत्या न भवत्युपदेशयोग्या हि ॥ '

७३८ प्रेम : 738. Welcome.

जं केअवेण पेम्मं, जं च वला, जं च अत्थलोहेण ॥
जं उवरोहणिमित्तं, णमो णमो तस्स पेम्मस्स ॥ 744 ॥

प्रेमाला नमन असो, मग तें लबाडीमुळें निर्माण झालेलें असो किंवा बळजोरीमुळें; द्रव्यलोभामुळें किंवा प्रीतिबंधामुळें. प्रेमाचें स्वागत असो. प्रेमाला नमन असो.

१. भिउडि. २. पलोएस्सं. ३. णिब्भुच्छिस्सं. ४. भर्त्सयिष्यामि.

७३९ हेमंतरात्रि : **739. Winter Nights**

कस्स ण सद्धा गरुअत्तणम्मि पइणो पसाअमाणस्स ।
जइ माणभञ्जणीओ ण होन्ति हेमन्तराईओ ॥ 745 ॥

आपण रुसावें व पतीनें आपल्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करावा, असें कोणाला वाटत नाहीं ! पण काय करूं ! हिंवाळ्यांतल्या रात्री मानधारणाला अनुकूल नाहींत.

● कारण थंडी किती ! रुसून पराङ्मुख होतांच येत नाहीं.

७४० डोलकाठी : **740. Mast.**

अव्वो तहिंतहिंचिअ गअणे भमिऊण वीसमंतेण ।
वोहित्थवाअसेण व्व हासिआ दड्ढपेम्मेण ॥ 746 ॥

[अहो तत्र तत्रैव गगनं भ्रान्त्वा विश्रमता ।
प्रवहणवायसेनेव हासिता दग्धप्रेम्णा ॥]

समुद्रावर लांबवर भ्रमण करून आलेला कावळा पडावाच्या डोलकाठीवर पुन्हां येऊन बसतो. तशीच माझी स्थिति झालेली आहे. आणि हें दुष्ट प्रेम माझा उपहास करीत आहे.

● छाया वज्जालग्गावरून. माझें हल्लींचें आश्रयस्थान मनाजोगें आहे असें नाहीं. पण काय करणार ? भटक भटक भटकलें, पण दुसरीकडे निवारा मिळेना; म्हणून लोंचट कावळ्याप्रमाणें मी या डोलकाठीकडे परतलें व तिला बिलगून आहे. आतां माझें प्रेम माझाच उपहास करीत आहे, ही दुर्दैवाची परिसीमा.

1. वहित्तवाअसेण व्व. २. हसिआ.

७४१ सफेती : 741. Whitewash.

दइए हुमइ तुमं चिअ मा परिहर पुत्ति ! छहमदुमियं ति ।
किं कुड्डं णिअमुहअंदकंतिदुमिअं ण लक्खेसि ? ॥ 747 ॥

दयिताच्या स्वागताकरितां भिंतींना सफेती देण्याचें काम चालू केलें. भिंती नुकत्याच रंगविलेल्या आहेत असें भासत आहे, कारण त्यांवर तुझ्या मुखचंद्राचा प्रकाश परावर्तित झालेला आहे.

७४२ अनङ्गबाण : 742. Cupid's Arrows.

विज्झंति तणुं, उवणेंति वेअणं णेयताण खयमग्गे ।
अव्वो ! अइट्ठपुव्वो अणङ्गबाणाण माहप्पो ॥ 748 ॥

अहो, अनङ्गाच्या बाणांचा प्रभाव अद्वितीय आहे. त्यांचें लक्ष्य ते विद्ध करतात, इतकेंच नव्हे, आसपास असतात त्यांनाही ते विद्ध व व्याकुल करतात.

७४३ धरिलेंस मनगट : 743. Grip.

आमोडिऊण बलाउ हत्थं मज्झं गओ सि भो पहिअ ! ।
हिअआउ जइ अ णीहंसि सामत्थं तुज्झ जाणिस्सं ॥ 749॥

पथिका, जाता जातां तूं माझा हात जोरानें दाबलास आणि तसाच निघून गेलास. एखाद्या सहजासहजीं तूं माझ्या हृदयांतूनही गेला असतास तर मी तुझ्या सामर्थ्याची वाखाणणी केली असती.

---

१. आमोडिऊण बलणा मम हत्थं (भुवनपाल). २. णिक्केहसि, निर्वेस्यसि पलायिष्यसे.

७४४ शिकवणी : **744. Tutorial.**

सद्धा मे तुज्झ पियत्तणस्स, अहयं तु तं ण याणामि ।
दे, पसिय, तुमं चिय सिक्खवेसु जह ते पिया होमि ॥750॥

प्रियकरा, तूं मला प्रिय आहेस अशी माझी खात्री आहे; मी मात्र तुला प्रिय कां नाहीं तें मला कळत नाहीं. मी काय केलें असतां तुला प्रिय होईन ते तूंच मला शिकव.

● तिरस्कृतेचे स्वगौरवोद्गार.

७४५ तृणपुरुष : **745. Scarecrow.**

पेम्मुम्मइयाइ मए उवऊढो हलिअउत्तबुद्धीए ।
फंसेमि जाव, फरुसो तणपुरिसो गामसीमाए ॥ 751 ॥

तेथें शेतकऱ्याचा मुलगा उभा आहे असें वाटलें, म्हणून मी त्याला दृढ आलिंगन दिले. पण मी फसलें. स्पर्शानंतर मला समजलें की तो गांवाच्या शीवेवर उभा केलेला तृणपुरुष आहे.

● पांखरांना भिवविण्यासाठीं शेतांत बुजगावणें उभें करतात, तसाच हा तृणपुरुष. ती चकली, इतका बेमालुम, मग चोर कां न चिचकतील!

७४६ भ्रमंता : **746. Rover.**

बे मग्गा धराणियले माणिणि ! माणोण्णयाण पुरिसाण ।
अहवा पावंति सिरिं अहव भमंता समप्पंति ॥ 752 ॥

[द्वौ मार्गौ भुवनतले मानिनि मानोन्नतानां पुरुषाणाम् ।
अथवा प्राप्नुवन्ति श्रियमथवा भ्रमन्तः समाप्यन्ते ॥]

मानिनी, या जगांत अभिमानी पुरुषांना दोनच मार्ग मोकळे असतात; एक यशप्राप्तीचा आणि दुसरा (अपेशी झाल्यास) भ्रमंतीचा.

● छाया वज्जालग्गावरून.

७४७ अंतर्हेतु : 747. Long Wave.

कत्तो कमलाण रई कत्तो कुमुयाण सीअलो चंदो ? ।
तह सज्जणाण णेहो ण चलइ दूरट्ठिआणं पि ॥ 753 ॥

प्रियकर व प्रेयसी यांमध्यें स्थलाचें अंतर कितीही असलें तरी तें प्रीतीच्या आड येत नाहीं. कुठें सूर्य व कुठें कमळ; कुठें शीतल चंद्र व कुठें कुमुद !

● वज्जालग्गांतील पाठः कत्तो उग्गमइ रवी कत्तो वियसन्ति पङ्कयवणाइं । सुयणाण जत्थ नेहो न चलइ दूरट्ठियाणं पि ॥ ८० ॥ कुत उद्गच्छति रविः कुतो विकसन्ति पङ्कज वनानि । सुजनानां यत्र स्नेहो न चलति दूरस्थितानामपि ॥]

७४८ आत्मसमर्पण : 748. Self Immolation.

हा हा किं तेण कयं मालइविरहम्मि पुत्ति ! भसलेणं ? ।
कंकेल्लिकुसुममज्झे जलणो त्ति समप्पिओ अप्पा ॥ 754 ॥

मुली, मालतीच्या विरहामुळें उद्विग्न झालेल्या भ्रमरानें काय केलें तें कळलें का ? त्यानें अशोकाच्या लालभडक फुलांच्या ज्वालेंत आत्मसमर्पण केलें.

● अशोकाचीं मदक फुलें पाहून ह्या अग्निज्वाला आहेत असें वाटल्यामुळें आत्मसमर्पणासाठीं भ्रमरानें त्यांच्याकडे धांव घेतली, पण तींही फुलेंच आहेत असें त्याच्या प्रत्ययास आलें. मुली, हा पुरुषांचा धर्मच आहे. आपल्याला वाटतें आपल्या विरहानें ते आत्मत्याग करतील; पण नाहीं, ते सरळ दुसरीकडे जातील !

७४९ संभ्रमः 749. Delirium.

ईसरसेसो वि हु महुअरेण मुक्को, ण मालईविडवो ।
दरवियसियकलियामोयबहलिमं संभरंतेण ॥ 755 ॥

[ईषद्रसशेषोऽपि खलु मधुकरैर्मुक्तो न मालतीविटपः ।
दरविकसितकलिकामोदबाहुल्यं संस्मरद्भिः ॥]

मालतीच्या नुकत्याच उमललेल्या कळींच्या सुकुमार सौंदर्यानें व सुगंधानें भ्रमराला संभ्रम झाला आणि पूर्णविकसित फुलांतील मधूचा आस्वाद घेण्याचें सोडून तो मालतीच्या वेलीभोंवतीं भमूं लागला.

● छाया बदलल्यावरून. प्रत्यक्ष आस्वादापेक्षां अपेक्षित आस्वाद अधिक आकर्षक असतो. सुंदर, सुगंधित व सुकुमार अशी मालतीची कळी पाहून त्याला वाटलें कीं येथें अधिक व मधुर मधु प्राप्त होईल. तो त्या वेळीं ज्या फुलांतल्या मधूचा आस्वाद घेत होता तें मधुपूर्ण होतें, पण मालतीच्या कलिकेइतकें देखणें व ताजेंतवानें नव्हतें. म्हणून अज्ञ, चंचल व अदूरदर्शी भ्रमरानें त्याचा त्याग केला. संदर्भावरून वाटतें कीं निदान मधूच्यापुरती मालतीकलिकेनें भ्रमराची निराशा केली असावी. सौंदर्य व सौकुमार्य यांचें दुसीशीं सहकार्य असतेंच असें नाहीं.

७५० पातळांगी : **750. Mensuration.**

समुहागयवोलंतम्मि सा तुमे अघेडियंगसंठाणा ।
रुंदं वि गामरच्छं भिंदइ तणुअं च अप्पाणं ॥ 756 ॥

तूं तिच्या समोरून आलास व तिच्या अंगाला आपला स्पर्शही न होऊं देतां निघून गेलास, तेव्हां तिनें गांवांतल्या रस्त्यांच्या रुंदीचा व स्वतःच्या सडपातळपणाचा निषेध केला.

७५१ चंचल : **751. Fickle.**

सममच्छंति, णिअत्तंति, पसारिया रणरणंति तद्दियहं ।
चलचित्त ! तुज्झ लग्गा मणोरहा तीएँ हिययम्मि ॥ 757 ॥

हे चलचित्त, तुझ्याविषयीं तिच्या हृदयांत कामना उद्भवते न उद्भवते तोंच तिचें चित्त उद्विग्न होतें आणि तिचे मनोरथ नष्ट होतात.

● तिच्या अंतःकरणांत अनुराग आहे, पण तुझी वृत्ति चंचल असल्यामुळें तीही स्वत.चें मन स्थिर करण्यास असमर्थ आहे आणि म्हणून उद्विग्न आहे, असा दूतीचा संदेश.

७५२ वणवा : **752. Forest Fire.**

डहिऊण सयलरण्णं अग्गी समविसमलंघणुव्वायो ।
तडलंबततणेहिं विसिय व्व घरं समोसरइ ॥ 758 ॥

---

१. उद्भ्रान्त-भ्रांत. २. सुमुहागय. ३. अपडिय, अपत्तअंगसंसग्गा. ४. अघटितांगसंधाना अप्राप्तांगसंसर्गा.

सगळें अरण्य जाळण्यासाठीं उंचसखल जमिनीवरून फुंकरा मारण्याच्या श्रमामुळें थकलेला वणवा अखेरीस जणूं तहान भागविण्यासाठीं नदीतीरीं आला व त्यानें तिच्या कांठावरील गवतावर पाणी टाकून दिलें.

७५३ अट्टल : **753. Arrant**

सं च्चिय रामेउ तुमं पंडिय ! जिच्चे, अलं म्ह रमिएण ।
सब्भावबाहिराइं जा जाणइ अट्टमट्टाइं ॥ 759 ॥

हे पण्डित, तुला रमविण्याचे मार्ग जिला माहीत आहेत तिच्याकडे तूं जा आणि तिच्याशीं खुशाल प्रेमचेष्टा कर; आमच्याकडे मुळींच येऊं नकोस. प्रेमाचीं ढोंगं करण्यांत तूं अट्टल आहेस हें आम्हांला माहीत आहे.

● नेहमीं बाह्योपचारांची प्रशंसा करणाऱ्या वेश्यानुरक्त पतीच्या लाडक्या अनुनयामुळें उद्विग्न झालेल्या पत्नीचे उपालंभोद्गार.

७५४ चहाडी : **754. Report**

रअणायरस्स साहेमि नम्मए ! अज्ज मुक्कदक्खिण्णा ।
वेडिसलयाहरंतेण मिलिया जं सि पूरेण ॥ 760 ॥

नर्मदे, शिष्टाचार बाजूला ठेवून मी आज रत्नाकराला भेटेन आणि पूर आला होता तेव्हां वेताच्या बेटांत तूं काय काय प्रेमचेष्टा केल्यास तें सारें त्याला सांगेन.

---

१. पण्डित. २. इत्थिऍं, इथिऍं. ३. अट्टमट्टादि, उपचारविशेषान्. ४. कहेमि, कहेसि, काहेसिमि, कथयिष्यामि. ५. वेतसलतागृहांतर.

● रत्नाकर हा नर्मदेचा पति. पूर आला होता तेव्हां तिचें पाणी कांठावरल्या वेतांच्या जाळींत घुसलें व तेथें क्षुद्र, खळखळत्या ओघाशीं तिचा संगम झाला. नर्मदाकांठीं वेतांच्या बेटांत संकेतस्थान ठरलें होतें, पुरामुळें तें उध्वस्त झालें, म्हणून नायिकेचा संताप झाला.

७५५ संगोपन : 755. Prudence.

रक्खइ अणण्णाहियओ जीवं पिव महुअरो पयत्तेण ।
देरणेंतदीविदाढग्गसच्छहं मालईमउलम् ।। 761 ।।

चित्याच्या नुकत्याच निघालेल्या दाढेच्या अग्रासारख्या दिसणाऱ्या मालतीच्या कळीचें मधुकर अनन्य भावानें, जीव लावून रक्षण करतो; एवढ्याचसाठीं कीं ती उमलतांच तिच्यांतील मधूचा आस्वाद घेण्याची संधि मिळावी.

● उपजीविकेसाठीं किंवा उपभोगासाठीं, भविष्यावर दृष्टि ठेवून, एका बालिकेचें पालनपोषण करणाऱ्या लम्पटास अनुलक्षून हे उद्गार काढलेले आहेत असें टीकाकार सांगतात.

७५६ दुर्जन : 756. Wicked.

तह णेहलालियाण वि अवाहिरिल्लाण सयलकज्जेसु ।
जं कसणं होइ मुहं, तं भण्णइ किं पईवाणं ।। 762 ।।

कितीही स्नेहानें लालपालन केलें तरी दुर्जन नेहमीं असंतुष्ट असतात. नेहमीं तेल घालीत राहिलें तरी दीपज्योतीचें मुख काळें नसतें का !

१. दरनिग्गअदिवि. २. गज. ३. प्रदीपानाम्.

७५७ तृषार्त : **757. Thirst.**

तिसिया पियउ त्ति मओ, मओ वि तिसिओ मई करेऊण ।
इय मयमिहुणं तिसियं पियइ ण सलिलं सिणेहेण ।। 763 ।।

मृगाला वाटतें कीं मृगी अधिक तृषित आहे, तिनें अगोदर पाणी प्यावें; आणि तिला वाटतें कीं तोच अधिक तृषार्त आहे व त्यानेंच अगोदर पाणी प्यावें; म्हणून एकमेकांवरील प्रेमामुळें दोघेंही पाणी प्यालीं नाहींत.

७५८ आह्वान : 758. Challenge.

तुह सामलि ! धवलचलंततरलतिक्खग्गलोयणबलेण ।
मयणो पुणो वि इच्छइ हरेण सह विग्गहारंभं ।। 764 ।।

श्यामलेचे डोळे स्वच्छ व तेजस्वी आहेत आणि तिची नजर चंचल व तीक्ष्ण आहे. तिची दृष्टि पाहून वाटतें कीं जणूं मदनाला शंकराबरोबरचें युद्ध पुन्हां आरंभावयाचें आहे.

● तुलनेसाठीं पाहा : (मेघदूत) मत्वा देवं धनपतिसुखं यत्र साक्षाद्वसन्तं । प्रायश्चापं न वहति भयान्मन्मथः षट्पदज्यम् ।। सभ्रूभङ्गं प्रहितनयनैः कामिलक्ष्येष्वमोघैः । तस्यारम्भश्चतुरवनिता विभ्रमैरेव सिद्धः ।। ७१ ।।

७५९ गोंडा : **759. Servility.**

सुहय ! तुई चिय कुडलि व्व पेहुणो जिणायस्स चडुयस्स ।
जणरंजणिम्महो ते धरम्मि सुपहो अवितिहिंवंतो ।। 765 ।।

सुभग, पहा, तुझ्या घरातून बाहेर पडणाऱ्यांशीं कुत्रा कसा आनंदानें व आपुलकीनें शेंपटी हलवून लाडीगोडी लावीत आहे.

७६० तोंडघशी : 760. Slip.

णिवडिहिसि, सुण्णहियए ! जलहरजलपंकिलम्मि मग्गम्मि ।
उप्पेक्खागयपियमहत्थे हत्थं पसारेंती ॥ 766 ॥

मनोमय प्रियकराचें स्वागत करण्यासाठीं ती हात पसरून पुढें आली आणि पावसामुळें निसरड्या झालेल्या मार्गावर पाय घसरून तोंडघशीं पडली. शून्यहृदये, तुझीही तशीच अवस्था होईल.

७६१ उत्संग : 761. Endearment.

उच्छंगियाऍ पइणा अहिसारणपंकमलिणपेरंते ।
आसण्णपरियणो किअ सेअ च्चिय धुवइ से पाए ॥ 767 ॥

मार्गावरील चिखलामुळें अभिसारिकेचे चरण मलिन झाले होते. प्रियकरानें तिला मांडीवर घेतलें तेव्हां तिला इतका घाम आला कीं त्यामुळें तिचे पाय आपोआप स्वच्छ धुतले गेले.

७६२ झेंप : 762. Jump.

जइ लंघेसि परवइं णिययवइं भरसहं पि मोत्तूणं ।
तह मण्णे, कोहलिए ! अज्जं कल्लं पि फुट्टिहसि ॥ 768 ॥

१. निपतिष्यसि.

कोहाळ्याचा वेल ज्या कुंपणावर चढविलेला होता, तें चांगलें मजबूत होतें. तरी तें ओलांडून त्यानें पलीकडच्या कुंपणावर झेंप घेतली, तेव्हां कोहळा तुटून खालीं पडला व फुटला. सांभाळ, तुझीही तशीच अवस्था होईल.

● शेजाऱ्याशीं किंवा शेजारणीशीं संधान बांधणाऱ्या पतीला किंवा पत्नीला, प्रियकराला किंवा प्रेयसीला उद्देशून हे उद्गार काढलेले आहेत. कोहलिए याचा अर्थ कुतूहली असाही घेतां येईल. वई म्हणजे कुंपण किंवा पति. अर्थ किती आधुनिक !

७६३ रानउंदीर : 763. Rats.

अणुसोयइ हलियबहू रइकिरणोलुग्गपंडुरच्छायं ।
रेण्णुंदुरदंतुक्खुत्तविसमवलियं तिलच्छेत्तं ॥ 769 ॥

उन्हाच्या कडाक्यामुळें तिळाचें शेत म्लान झालें आणि रानांतल्या उंदरांनीं तें कुरतडलें. हें पाहून शेतकऱ्याची पत्नी दु:खित झाली.

● पीक बुडालें म्हणून नव्हे, संकेतस्थान नष्ट झालें म्हणून.

७६४ शेकोटी : 764. Warming Fire.

ओवालअग्गि सीआलुआणं वइमूलमुहिहंताणं ।
डिंभाण कलिंचयवावडाण सुण्णो जलइ अग्गी ॥ 770 ॥

पंढीनें कुडकुडणाऱ्या मुलांनीं ओवंड्यांत काटक्यांची शेकोटी पेटविली आहे. पण ती कांहीं त्यांना पुरेशी ऊब देत नाहीं.

१. रण्णुंदुर, अरण्योन्दुर. २. आहारवंचनाशालेषाम. ३. ... शीतालूनाम्. ४. ... ...

७६५ आश्रय : 765. Rags.

मा ! मा ! मुय परिहासं ! देअर ! अणहोरणा वराई सा ।
सीयम्मि वि पासिज्जइ, पुणो वि एसिं कुणसु छायं ।। 771 ।।

[मा मा मुञ्च परिहासं देवर अप्रावरणा वराकी सा ।
शीतेऽपि प्रस्विद्यति पुनरपि अस्या कुरु छायाम्]

हे देवर, नको नको, भावजयीचा असा उपहास करूं नकोस. बिचारीच्या अंगावर धड वस्त्रही नाहीं; आणि हिंवाळा आहे, तरीहि (तुझ्या सान्निध्यामुळें) ती घामाघूम झाली आहे. तिला आश्रय दे.

● छाया पीताम्बरावरून. तिला हंसूं नको, तिचें हंसें होऊं देऊं नको. तिला सावली कर. दीर व भावजय यांचा अनुराग ओळखणारी वृद्धा सांगते, आणखी हें पहा, तिच्यासाठीं एक छान पातळ घेऊन ये.

७६६ मच्छरदाणी : 766. Bed Curtain.

किं तस्स पारएणं किमग्गिणा किं च गब्भहरएण ।
जस्स णिसम्मइ उअरे उण्हायंतत्थणी जाया ? ॥ 772 ॥

ज्याची जाया पतीच्या छातीला आपले ऊबदार स्तन भिडवून झोंपते त्याला शीतनिवारणासाठीं पांघरूण, शेकोटी किंवा मच्छरदाणी यांची काय जरूर !

७६७ हिंवाळा : 767. Nature.

कमलायराण उण्हो हेमंतो, सीअलो जणवयस्स ।
को किर भिण्णसहावं जाणइ परमत्थयं लोए ? ॥ 773 ॥

हिंवाळा हाच कमळांचा उन्हाळा; इतरांना मात्र तो शीतल वाटतो, वस्तूंच्या स्वभावांतील भिन्नतेचें रहस्य कोण जाणूं शकतो !

● सर्वांशीं तो खेळीमेळीनें वागतो, तुझ्याशींच एवढा उदासीन कां ? या सखीच्या प्रश्नाचें उत्तर. विशिष्ट परिस्थितींत समृद्धि व विनाश हे स्वभावभेदाचे परिणाम आहेत. निसर्गाचें रहस्य कोणाला उलगडणार ?

७६८ हेमंत : **768. Shiver.**

हेमंते हिमरअधूसरस्य ओअसंरणस्स पहियस्स ।

सुमरियजायामुहसिज्जिरस्स सीयं चिअ पणट्ठं ॥ 774 ॥

(हेमंताच्या रात्रीं) पथिकाच्या अंगावर पांघरूण नव्हतें; हिमरजांनीं त्याचें शरीर धूसर झालें होतें. त्याला पत्नीच्या मुखाची आठवण झाली आणि लगेच (त्याच्या अंगांत ऊब आली व) त्याला घाम आला.

७६९ चरक व तरुण : **769. Manhandling.**

उवहसइ लडियाण, कड्ढइ रसं, ण देइ सोत्तुं जे ।

जंतस्स जुव्वणस्स य ण होइ इच्छु च्चिय सहावो ॥775॥

ललनांनो, हा उपदेश ध्यानांत ठेवा. उसाचा चरक आणि यौवन यांचा स्वभाव सारखा; तावडींत सांपडेल त्याला ते रसासाठीं पिळून काढतात, कोणाचें कांहीं ऐकत नाहींत. बिचारा ऊंस, पिळला जातो !

● वेबर सांगतो, गाथेचा पाठ भ्रष्ट असल्यामुळें अर्थ नीट [illegible] नाहीं. उसाचा चरक व तरुण यांची तुलना आणि त्यांच्या [illegible]

1. [illegible].

इषारा हा आर्येचा विषय आहे; दोघेही खोटाडे व निर्दय, त्यांच्या आहारीं जाऊं नये, असा आशय आहे. ' ण देई सोत्तुं ' म्हणजे कोणाचें ऐकत नाहींत, कोणाला जुमानीत नाहींत, बोलणें ऐकूं देत नाहींत, कीं सारखी चिरचिर करून किंवा वटवट करून झोंप घेऊं देत नाहींत ! ' सोत्तुं ' व ' इच्छुच्चिय ' यांचे मूळ पाठ ' सत्तं '=' स्वत्वं ' आणि ' मिच्छच्चिय '= ' मिथ्या एव ' असें असणें शक्य आहे. चरक व तरुण, दोघेही निर्दय; तावडींत सांपडेल तें पिळून काढतील, चिपाड करून फेंकून देतील. दोघेही खोटाडे, आवाहन करतील व आश्वासन देतील, हातीं लागलेल्याला भरपूर उपद्रव देतील, स्वत्व मात्र देणार नाहींत. त्यांवर विश्वास ठेवूं नये, त्यांच्या आहारीं जाऊं नये. दोघेही जसे निर्दय तसेच अरसिक. चरक एवढा रस काढतो, पण स्वतः चाखत नाहीं; तरुण एवढा अधीर कीं आस्वाद घेण्यालाही थवकत नाहीं. या निमित्तानें वेश्यामाता, वृद्धा नारी किंवा सराईत सखी एकाद्या वयस्क कामुकाची मलावण करीत आहे कीं काय !

७७० चिपाड : 770. Hag.

बहुएहि जंपिएहिं सिट्ठं अम्ह सेवहे करेऊण ।
सद्दो च्चिय से महो मोहणिजंते रसो ण त्थि ॥ 776 ॥

पुष्कळांनीं अगदीं शपथेवर शेटाणीची प्रशंसा केली होती. तिचा शब्द मधुर आहे खरा पण ती अगदीं रूक्ष आहे.

● अविदग्ध ग्रामप्रधानमहिलेची निंदा; ' जंतिएहिं '=' यंत्रवाहकैः ' (नानाबन्धसुरतज्ञैः): पुष्कळ गुऱ्हाळवाल्यांनीं तिच्या चरकाची प्रशंसा केली होती; त्याचा आवाज मंद आहे खरा, पण अनेक हंगामांत वापर झाल्यामुळें त्याचीं चाकें आवां इतकीं ढिलीं झालीं आहेत कीं जो रस काढण्याला निरुपयोगी झाला आहे. अनेक विदग्धांनीं तिच्या रसिकतेची

१. जंतिएहिं. २. कथितं. ३. शपथं. ४. मंदो. ५. प्रामणिमणो.

प्रशंसा केली होती, तिचा शब्द मधुर आहे पण बोलणें नीरस आहे. उसाचें चिपाड खाल्ल्याकर त्यांतून रस कसा निघणार !

७७१ वसंतागम : 771. Approaching Summer.

पढमं चिय माहवपहुयं व घेत्तूण दाहिणो वाओ ।
अंकोल्लपढमवत्तं परिहिंडिओ गामरच्छासु ॥ 777 ॥

दक्षिणेकडला वारा नववस्त्रधारी वसंताला घेऊन येत आहे. पहा, अंकोल्लांना नवी पालवी फुटत आहे आणि सुकलेलीं पानें तुटून गांवांतल्या रस्त्यांवरून उडत आहेत.

● नव्या केरसुणीनें केर चांगला निघतो, ही म्हण येथें दृष्टींत दिली आहे.

७७२ अंकोळकळी : 772. Buds.

सो माणो पियमुहअंददंसणे कह थिरो धरिज्जिहइ ।
अंकोल्लकोरआण वि जो फुट्टमुहाण बीहेइ ॥ 778 ॥

अंकोळाच्या उमलत्या कळ्या पाहूनच तुझें मन डळमळूं लागलें आहे मग प्रियकराच्या मुखचंद्राचें दर्शन झाल्यानंतर तुला मान कसा धारण करतां येणार !

७७३ प्रियदर्शन : 773. Reflux.

कारणगहिओ वि मए माणो एमेअ जं समोसरिओ ।
अत्थक्कफुल्ल अंकोल्ल ! तुज्झ तं मत्थए पडउ ॥ 779 ॥

---

१. अंकोल. २. कोरकाणां, कारकाणां ३. फुल्लितमुखानां, स्फुटमुखानाम्. ४. समपसृतः ५. अस्थानक, अकाल, अकस्मात्, अतर्कित.

मी रुसलें होतें, त्याला कारण सबळ होतें. पण अवेळीं उमललेली अंकोळाची कळी अकस्मात् दिसली आणि धारण केलेला मान एकाएकीं ओसरला. कालेके, ह्याचा दोष तुझ्या मस्तकावर.

● ही कळी उमलली व ती कळी खुलली. रुसणें लटकें आणि शापही लटका.

७७४ स्वागतोत्सव : 774. Procession.

रंजेह[1], देह रूवं, रएह कुसुमाइ, देह विच्छिरिं[2] ।
ण वि तह पुहवीसस्स[3] वि हलहलओ जह वसंतस्स ॥780॥

प्रसाधन करून आणि अलंकार व पुष्पमाला धारण करून लोक पृथ्वीशाच्या स्वागतासाठीं सज्ज होतात, पण वसंतागमनाचे वेळीं असतो तेवढा उत्साह या स्वागतोत्सवांत दिसत नाहीं.

● कारण वसंतोत्सवांत नैसर्गिक प्रेरणांचा उत्साह असतो आणि राजाच्या स्वागतोत्सवांत कृत्रिमाचा आविष्कार असतो. मान धारण करून वसंतोत्सव विफल करूं नकोस, अशी नायिकेची विनवणी.

७७५ मुंगुस : 775. Tender Leaves.

सिसिरे वणदवडड्ढं वसंतमासम्मि उअह संभूयं ।
मंगुसकण्णसरिच्छं[4] दीसइ पत्तं पलासस्स ॥ 781 ॥

शिशिर ऋतूंतल्या वणव्यांत जळून गेलेल्या पळसाच्या फांद्यांवर आतां वसंतांत पुन्हां कोंवळी पालवी फुटली आहे. हीं पानें मुंगसाच्या कानांसारखीं दिसत आहेत.

---

१. सज्जेत. २. कुरुत, रूपम्. ३. पृथ्वीशस्यापि. ४. मंगुस.

● बंगालांत जेथें पलाशवृक्षांची समृद्धि आहे तेथें संकेतस्थान ठर-विल्याची सूचना. शिशिरांत पानें गळतात, वसंतांत पालवी फुटते, हा सृष्टीचा नियम आहे. मनुष्याच्या वैभवाचा क्षय होतो किंवा वृद्धि होते, हाही जीवनाचा क्रम आहे. म्हणून कोणी कधीं उद्विग्न होऊं नये. नायकाचें वैभव नष्ट झालें होतें, पण आतां त्याला तें पुन्हां प्राप्त झालें आहे, अनमान करूं नको, अशी नायिकेला सूचना. महाभारतांत (७-१९४२) शिशिरांतील वणव्याचें वर्णन आढळतें. 'दावं दग्ध्वा यथा शान्तं पावकं शिशिरात्यये ।' शिशिर म्हणजे माघ व फाल्गुन हे महिने. फाल्गुनांत वणवे लागलेले अनेक वेळां दिसतात.

७७६ ब्रह्मा : 776. Creator.

दूरपइण्णपरिमलं सपल्लवं मुद्धपुप्फपंगुरणं ।
अंगच्छिअं पिव वम्महेण दिण्णं महुसिरीए ॥ 782 ॥

सुंदर, सपल्लव आणि दूरवर सुगंध दरवळणाऱ्या पुष्पांची वस्त्रें मदनानें मधुश्रीला अर्पण केलीं आणि जणूं ब्रह्मदेवाचें कर्तृत्व दाखविलें.

● फुलांना जशी पालवी तसा वस्त्रांना पदर. वसंतांतलीं पुष्पें विशेष उन्मादक असतात.

७७७ मंजिरी : 777. Pedicle.

कारणगहिअं वि इमा माणं मोएइ माणिणिअणस्स ।
सहयारमंजरी पियसहि व्व कण्णे समोल्लीणा ॥ 783 ॥

1. प्रकीर्ण, वितीर्ण. २. समालीणा, समुल्लीणा, समाश्रिता, संलग्ना.

रुसण्याचें कारण कितीही गंभीर असलें तरी प्रियसखीप्रमाणेंच आम्रमंजिरी कानाला लागली कीं मानिनींचा मान नष्ट होतो.

● वसंतांत मानधारणाचें ढोंगही करतां येत नाहीं. प्रियसखीच्या मधुर वचनांनीं प्रेयसी प्रसन्न होते, त्याचप्रमाणें आम्रमंजिरीच्या सुगंधामुळें राग नष्ट होऊन अनुराग निर्माण होतो.

७७८ सांत्वनः 778. Consolation.

अज्जं चिय छणदिहओ, मा पुत्ति ! रुएहि, एहइ पिओ चि ।
सुण्हं आसासंती पडियत्तमुही रुवइ सासू ॥ 784 ॥

" मुली, आज सणाचा दिवस आहे, रडूं नको; तुझा पति आज खास परत येईल, " असें आश्वासन देऊन सासूनें सुनेचें सांत्वन केलें आणि नंतर ती स्वतःच मुख फिरवून रडूं लागली.

७७९ पांग्याः 779. Dwarf.

दियहे दियहे णिवडइ गिहवइधूआ णिहेण, माउच्छा !
संगहणइ चि वावउ वसुहारा खुज्जसहयारे ॥ 785 ॥

मावशी, खुजा आम्रवृक्ष पाण्यावर वाढेना, म्हणून घरधन्याची मुलगी त्यामींवतालचें अळें रोज तुपानें भरते.

● वेबर सांगतो, या गाथेचा अर्थ नीट लागत नाहीं. खुजट आम्रवृक्ष वाढीला लागावा, त्याला लवकर मोहोर यावा, म्हणून घरधन्याची मुलगी कृत्रिम उपाय करित आहे, पण आंबा कांहीं मोहरत नाहीं. वयांत आलेला

आंबा हेमंतांत थंडीनें कोमेजला की त्यावर धान्यासारखा मोहोर येतो; शिशिरांत तो बहरतो व वसंतांत फलद्रूप होतो. चुकट सारे आपलें म्हटलें; तुपानें शिंपडलें म्हणून तें बहरलें, असें कधीं झालें? या गाथेंतला लावलेला खुजा आंबा हा घरजांवई असावा.

७८० शृंखला :   780. Irons.

> आउच्छणोवऊहणकंठसमोसारियबाहुलइयाए ।
> वलयाइ पहियचलणे बहूएँ णियलाइ व पडंति ॥ 786 ॥

पति प्रवासाला जाणार होता. पत्नीनें त्याच्या गळ्याभोंवतीं आवळ्या बाहुलतिकांचा विळखा घातला. मिठी सुटली तेव्हां तिच्या मनगटावरील बांगड्या ओघळल्या आणि त्या पतीच्या चरणांजवळ पडल्या. जणूं आपल्या पायांत शृंखलाच पडल्या आहेत असें त्या भटक्याला वाटलें.

७८१ पाश :   781. Trap.

> उड्डियपासं तणछण्णकंदरं णिहुअसंठियावक्खं ।
> जूहाहिव ! परिहर मुहमेत्तसरीयं कल.... ॥ 787 ॥

● वेबर सांगतो, गाथा भ्रष्ट व त्रुटित असल्यामुळें अर्थबोध होत नाहीं. आशय असा : "हे यूथाधिप, खड्ड्यांत पडलेल्या हस्तिणीची किंवा छाव्याची सुटका करण्यासाठीं तिकडे जाऊं नको. ही हत्तीण खरी नाहीं; पेंढा भरलेली आहे; एवढेंसुद्धां तुला ओळखतां येत नाहीं ! तिच्या शेजारीं विवर आहे व त्यांत हत्ती पकडण्यासाठीं पाश लावलेले आहेत. आजूबाजूला

1. आपुछणो. २. बाहुलइयाए.

गवत पसरल्यामुळें विवर गुप्त आहे. तिकडे फिरकलास तर पाशांत सांपड-शील, " हत्ती पकडण्यासाठीं जंगली लोक या युक्तीचा अवलंब करतात.

७८२ मावळ : 782. Hills & Dales.

गुणसालिणो वि करिणो होइ जूहाहिवत्तणं कत्तो ।
णवसालिकवललोहिल्लिआएँ विंझं मुअंतस्स ।। 788 ।।

या हत्तीचे अंगीं अनेक गुण आहेत, हें खरें, पण कोंवळें भात खाण्याच्या लालसेनें विंध्य पर्वताचा त्याग करून तो मावळाकडे वळला. असा हत्ती आपल्या कळपाचा पुढारी कसा होऊं शकेल ?

७८३ दैवयोग : 783. Highborn.

विहिणा अणुज्जुएणं पुत्तय ! जाओ कुलम्मि पढमाम्मि ।
जाइविसुद्धो भद्दो वि बंधणं पावइ खणम्मि ।। 789 ।।

पुत्ता, दैवाची गति सरळ नसते; (दैवावर कधीं विसंबूं नको.) उच्च कुळांत जन्मलेला, सद्वर्तनी, सद्गुणी व भव्य असा पुरुषही क्षणार्धात बंधनांत पडूं शकतो.

● हत्तिणीचा पुत्राला उपदेश. उच्च वंशालाच विशेषेंकरून बंधनें भोगावीं लागतात; मनुष्यासाठीं उत्तम बैल निवडून काढण्यांत येतात आणि राजाच्या स्वारीसाठीं उत्तम गज. हीं क्षत्रियांचीं भूषणें व कौतुकाचे विषय, पण गुलामगिरीचीं प्रतीकेंही.

१. अनृजुक.

७८४ ज्वलत्-जाल : 784. Flame Trap.

चउपासदिण्णहुयवहविसमाहः हवेढणापिउलं ।
णिव्वाहेउं जाणइ जूहं जूहाहिवो च्चेव ॥ 790 ॥

हत्तींचा कळप चोहोंबाजूंनीं वणव्यांनीं वेढला गेला म्हणजे त्यांचा पुढारीच त्यांना त्यांतून सुरक्षितपणें बाहेर काढूं शकतो.

● जंगलांत वणवे पेटवावयाचे व त्यांमुळें भेदरून सैरावैरा पळणाऱ्या हत्तींना जाळ्यांत पकडावयाचें, ही हत्ती पकडण्याची रानटी पद्धत या काळांत प्रचलित असावी असें या उल्लेखावरून वाटतें.

७८५ पुढारी : 785. Leadership.

अल्लग्गकवोलेण वि गयमइणा पच्चदसात्तसणम्मि ।
अज्ज वि माँए सणाहं गयवइजूहं धरंतेण ॥ 791 ॥

हत्तीच्या छाव्याचें गंडस्थळ मदानें ओलें झालें होतें, तरी संकट-काळीं त्यानें आपल्या कळपाचें रक्षण करून पुढारीपण मिळविलें

● मद आलेला असतांना हात्तिणींचा अनुनय करण्याची नैसर्गिक प्रवृत्ति आवरून त्यानें आपल्या जथ्याचें रक्षण केलें; म्हणूनच त्याला कळपाचें नेतृत्व मिळालें.

७८६ मदस्राव : 786. Debility.

ण वि तह दूमेइ मणं गयस्स मन्थो वि करिणिविरहो वि ।
दाणविओयविहुरिए जह भमरउले भमन्तम्मि ॥ 792 ॥

हत्तीणीच्या विरहाचा संताप किंवा बंधनाची धास्ती यांमुळें होत नाहीं एवढा त्रास हत्तीला मदस्राव नष्ट झाल्यामुळें भोंवती भ्रमरांचे थवे घोंगावेनासे झाले म्हणजे होतो.

७८७ तरवार : 787. Sword.

गामम्मि मोहणाइं दिण्णे खग्गे व्व चोराहित्थाइं ।
गहवइणो णामेणं कियाइ अण्णेण वि जणेण ॥ 793 ॥

घरधन्याचें नुसतें नांव ऐकलें कीं गांवकऱ्यांना दरारा वाटतो आणि त्यानें तरवार उपसली कीं लगोलग चोरांची पांगापांग होते.

७८८ सौदा : 788. Exchange.

मलिणाइं अंगाइं, वाहिरलोएण मंसलुद्धेण ।
हियय हियएण विणा ण देइ वाही, भमइ हट्टं ॥ 794 ॥

व्याधस्त्रीचें शरीर मलिन आहे आणि ती बाजारांत भटकत आहे, तरीही हृदयाच्या मोबदल्याशिवाय ती आपलें हृदय कोणालाही देणार नाहीं; मग तो मांसलुब्ध असला किंवा त्याच्या अंगावर राठ केंस असले तरी तिला पर्वा नाहीं.

● अर्थ नीट लागत नाहीं. प्रीती बाजारांत मिळत नाहीं हें तिला माहीत आहे. बाजाराला आलेल्यांमध्यें ती स्वतःला लायक असा पुरुष शोधीत आहे, मग तो जंगली असो किंवा लोलुप असो.

७८९ नांगऱ्याचें बळ : 789. Sparks.

कढिणखरचीरपेल्लणहलं व पत्थरविणिग्गयग्गिकणे ।
बंचलोआयरियवहे कसरा वि सुहेण वच्चंति ॥ 795 ॥

जमीन कितीही खडकाळ असली तरी तींत प्रथम नांगरट करणाराच्या हातांत बळ असलें म्हणजे ठिणग्या उडाल्या तरी जमीन नांगरली जाते. समर्थांनीं पाडलेल्या पाऊलवाटेनें नंतर दुर्बळांनाही जातां येतें.

● जमिनींतल्या दगडांवर नांगराचा फाळ घासला कीं ठिणग्या उडतात.

७९० भ्रमर-भ्रमण : 790. Nail Polish.

णक्खमऊहेसु खणं, कुसुमेसु खणं, खणं किसलएसु ।
हत्थेसु खणं कुसुमोच्चियाइ लोडाविया भसला ।। 796 ।।

आतां हिच्या चमकदार नखांभोंवतीं, तर नंतर त्या फुलांभोंवतीं; क्षणांत या वेलीभोंवतीं, तर क्षणांत फुलें खुडणाऱ्या स्त्रीच्या हातां-भोंवतीं, असे भ्रमर भ्रमण करतात.

● त्या काळींही स्त्रिया नखांवर चमकदार रंग चढवीत असत हें नक्की.

७९१ धडधड : 791. Excitement.

छेत्तम्मि जेण रमिया, ताओ किर तस्स चेअ मंदेइ ।
जइ तीअ इमं णिसुयं, फुट्टइ हियय हरिसवाए ।। 797 ।।

त्यानें शेतांत तिचा उपभोग घेतला होता. त्याचें हृदय कामाग्नीनें पुन्हां संतप्त झालें, हें तिला समजलें, तेव्हां आनंदानें तिचें हृदय धडधडूं लागलें.

१. डोलाइया, दोलायिता.

७९२ धग: 792. Heat.

हिययं णियामि कढिणं..पा हासेण वडियं मे ।
विरहाणलेण तत्तं रससित्तं अंतिता फुडइ ॥ 798 ॥

माझें हृदय मला आवरत नाहीं; हर्षामुळें हृदय फुटेल असें वाटतें. विरहाच्या धगीमुळें तापलेल्या हृदयावर एकाएकीं प्रेमरसाचे बिंदु पडल्यामुळें तें तडकेल कीं काय, अशी मला धास्ती वाटते.

७९३ सिंचन: 793. Libation.

अण्णे ते किल सिहिणो सिणरससेएण हुंति विच्छाया ।
आसाइयरससेओ होइ विसेसेण णेहजो दहणो ॥ 799 ॥

विस्तवावर पाणी ओतलें कीं तो विझतो, परंतु शृंगाररसाच्या सिंचनानें प्रेमाग्नि अधिकच प्रज्वलित होतो.

७९४ विरीट: 794. Siesta.

अंतो णिभुअहिअपरिअणाइ ओरुद्धदारणअणाइं ।
गिम्हे घोरडुघग्घररवेण घोरन्ति व घराइं ॥ 800 ॥

ग्रीष्मांतील दुपारच्या उन्हाच्या तापामुळें लोकांनीं आपआपल्या घरांचीं दारें लावून घेतलीं आहेत; वाटतें कीं जणूं साऱ्या घरांनीं आपआपले डोळेच मिटून घेतले आहेत. घरोघर सारे लोक दुपारची झोंप घेत आहेत. कोठें कोठें विरीटांची घरघर चाललेली आहे; ती ऐकून वाटतें कीं जणूं सारीं घरेंही घोरत आहेत.

● ग्रीष्ममाध्यान्हाभिसारिकेला दूतीचें प्रोत्साहन व आश्वासन. तुझें साहस कोणाच्याही नजरेस येणार नाहीं, भिऊं नको; फक्त पाय उचल, म्हणजे ते पोळणार नाहींत आणि कोणी जागें होण्याच्या आंत आपण जागीं पोंचूं.

७९५ जिह्वास्पर्श : 795. Tongue Touch.

जीहाइ परं लिम्भइ, दंतोट्ठेणं ण तीरए गहिउं ।
अहरो व्व सव्वणो गोहणेण पढमो तणुच्छेओ ॥ 801 ॥

गवताचे कोंवळे कोंब ओठांत धरण्याजोगे किंवा दांतांनीं कुरतडण्या-एवढे वाढलेले नसल्यामुळें गाई त्यांवरून जीभ फिरवीत आहेत, दंतव्रण झालेल्या ओंठांवरून जीभ फिरवावी त्याप्रमाणें.

● वस्तु उपचारांनीं उपभोग्य करावी लागते आणि उपभोगयोग्य झाली तरी ती उपचारांच्या परंपरेनें सज्ज करावी लागते.

७९६ कुंपणापलीकडे— 796. Beyond the Fence.

जह वेल्लीहि ण माअसि जह इच्छासि परवइं पि लंघेउं ।
तह णूणं कोहलिए ! अज्जं कल्लिं व फुल्लिहिसि ॥ 802 ॥

कोहाळ्याची वेली फुलें फळें धरूं लागली म्हणजे तिच्या वाढीला तिची वई पुरत नाहीं आणि कुंपण ओलांडून पलीकडे झेंप घेण्याची तिला इच्छा होऊं लागते. सखि, त्याचप्रमाणें आज नाहीं उद्यां, तुला बहर येईल आणि तूंही तसेंच करशील.

● तुलनेसाठीं पहा : गाथा क्र. ७६२.

१. लिहइ, लिह्यते. २. तृणोच्छेदः

७९७ कृशकटि : 797. Slender.

विलासिणिगुरुणिअंबो तीरउ चलणेहि दोहि उव्वहिउं ।
एआई उण मज्झो थणभारं कइ णु उव्वहइ ? ॥ 803 ॥

विलासिनीच्या विशाल नितंबांचा भार तिचे दोन चरण तोलूं शकतील, पण एकाच एका नाजुक कमरेला पृथुल अशा दोन स्तनांचा भार कसा सहन होईल ?

७९८ चांदणें : 798. Courtyard.

वारिज्जन्ती णवकोमुइ त्ति मा पुत्ति ! अंगणे सुवसु ।
मा ते अंवुपिसाओ चण्डो त्ति मुहं गसिज्जिहिइ ॥ 804 ॥

माझ्या मुली—माझें ऐक; उघड्या अंगणांत झोपूं नको. आज पौर्णिमा आहे. तुझें मुख हाच चंद्र आहे असें राहूला भासेल व तो तुला ग्राशिल !

● स्त्रियांनीं, विशेषतः अनुभवामुळें ज्यांची झोप सावध झालेली नाहीं अशा तरुणींनीं अंगणांत किंवा उघड्यावर झोंपूं नये; झोंपल्यास त्यांना यक्ष-किन्नर झपाटतात, अशी जुन्या लोकांची भोळी समजूत होती. यक्ष-किन्नरांची हमी कोण घेणार ? कधीं ते मनुष्यरूपानेंहि हिंडत असतात. गाढ झोंपेंत शरीरावर मनाचा ताबा नसतो आणि अशा वेळीं काय होईल व होणार नाहीं, याचा भरंवसा कोण देणार !

७९९ मधुबोल : 799. Sweet Words.

सुव्वंतो आसि परंपराइ, कहकह वि दिट्ठिमिलिओ सि ।
दे सुहअ ! किं पि जंपसु, पिअंतु कण्णाइ मे अमिअं ॥805॥

१. अज्जाए, वच्च: २. थणजुअभारं.

आजवर अनेक वेळां, अनेकांच्या तोंडून, मी तुझ्याबद्दल अनेक गोष्टी ऐकल्या आहेत. आज प्रथमच तुझी माझी दृष्टिभेट झाली. सुभग—बोल, कांहीं तरी बोल; आतां माझ्या कानांना अमृताचा लाभ होऊं दे.

८०० वाट पाहतांना तनु माझी सुकली : 800. Vigil.

विरहकिसिआ वराई, दिणाइ आसण्णगिम्हपरिणामाइं ।[1]
कढिणहिअओ पवासी, ण आणिमो कह समप्पिहिइ ॥806॥

विरहामुळें बिचारी अत्यंत कृश झाली आहे. ग्रीष्म ऋतु जवळ आल्यामुळें दिवस दीर्घ होत आहेत आणि तिचा कठिण हृदयी प्रवासी प्रियकर अद्याप परत आलेला नाहीं; याचा शेवट कसा होणार तेंच मला समजत नाहीं.

८०१ प्रसीद : 801. Solicitation.

रोआविअ म्ह माए ! अंगणपहिएअ दरपसुत्तेण ।
परिवत्तसु माणिणि माणिणि त्ति सिविणे भणन्तेण ॥807॥

अंगणांत झोंपलेला प्रवासी स्वप्नांत पुटपुटला, ' मानिनी, मानिनी, प्रसन्न हो. ' आई ग, त्यानें माझ्या डोळ्यांत पाणी आणलें.

● परक्या घरीं, अंगणांत पथारी. पथारी पसरण्यासाठीं त्याला अंगणांत जागा देण्यांत आली ती परकेपणा व्यक्त करण्याकरितां ! कीं सोयीसाठीं ? कारण घरांत मायलेकीच दिसतात. प्रवासी पुटपुटला तें कोणाला उद्देशून ?

1. श्रूयमाणो आशीः परंपरया.

झोप व स्वप्न हीं खरीं होतीं कीं लटकीं ? तो पुटपुटला तें तिला कसें ऐकूं गेलें ? ती जवळपास घोटाळत होती कीं काय ? तिच्या अंतःकरणांत अनुराग होता म्हणूनच तिच्या डोळ्यांत पाणी आलें; तृप्तीमुळें कीं अतृप्तीमुळें ?

८०२ चंद्रधनुष्य : 802. Moon-Bow.

माणंसिणीअ पइणा णअणकवोलाहरप्पहाभिण्णा ।
उज्जुअसुरचावणिहा वाहोआरा चिरं दिट्ठा ॥ 808 ॥

रुसलेल्या पत्नीच्या (उज्ज्वल) गालांवरून ओघळणाऱ्या अश्रूंवर पतीची दृष्टि खिळून राहिली; कारण त्यांमध्यें तिच्या डोळ्यांचा (गडद निळा), गालांचा (फिका पांढुरका) व ओंठांचा (लालसर) रंग प्रतिबिंबित झालेला दिसला आणि जणूं चंद्रधनुष्य प्रकटलें आहे असें भासलें.

● अलंकारकौस्तुभांत तद्गुणाचें उदाहरण : "परकीयगुणतिरोहितगुणस्य भानं तु तद्गुणः प्रोक्तः ।"

८०३ नागमोडी : 803. Scotched Snake.

सरहसविणिग्गआइ वि इच्छाइ तुमं ण तीअ सच्चाविओ ।
सीसाहअवलिअभुअंगवंकरच्छे हअग्गामे ॥ 809 ॥

डोकें ठेंचल्यामुळें वळवळ करणाऱ्या सापासारखा या भिकार खेड्यांतला रस्ता नागमोडी आहे. तुझ्या दर्शनासाठीं त्यावरून ती लगबगीनें धाऊन आली, पण तिला तूं दिसला नाहींस.

१. सहसा. २. भुजग.

८०४ चांडाल : 804. Behind the Bars.

सा तुह विरहे णिक्किव ! संधारिज्जइ सहीहि णिउणाहि ।
चंडालहत्थगअसउणिअ व्व जीए णिरालम्बा ॥ 810 ॥

निष्ठुरा, तिला कोणाचाही आधार नाहीं. केवळ निपुण मैत्रिणींच्या आश्वासनांवर विसंबून तुझ्या विरहांत ती जीव धरून राहिली आहे. चांडालाच्या हातीं सांपडलेल्या मैनेसारखी तिची अवस्था झाली आहे.

● चाण्डाल कोण ? निष्ठुर नायक कीं नायिकेला प्रतिबंधांत ठेवणारा तिचा पति ?

८०५ चोळी : 805. Cotton Pad.

कप्पासं कुप्पासन्तरम्मि तइ खित्तमित्ति भणिऊण ।
अत्ता ! वलाहिरेणं थणाण मह कारिआवत्था ॥ 811 ॥

तूं माझा कापूस चोळींत लपवलास अशी माझ्यावर तोहमत घेऊन, आत्याबाई–अहीरानें बलात्कारानें माझे स्तन धरले आणि माझी अशी अवस्था केली.

● या गाथेचा समावेश असती-मध्यें केलेला असल्यामुळें ह्या प्रकाराला तिचा विशेष विरोध असावा असें वाटत नाहीं. अहीराच्या आवेशातिरेकाचीं अवशिष्ट चिन्हें सासूनें पाहिलीं असावींत असा अंदेशा आल्यामुळेंच तिनें हें स्पष्टीकरण केलें असावें. रावणदार आडदांड अहीर असला तरी असा संशय घेण्याइतका चतुर दिसतो. ‘ तूं माझ्या अंगावर कापूस फेंकलास ’ अशी त्यानें तोहमत घेतली, असाही अर्थ होईल.

८०६ असंतुष्ट : 806. Dissatisfaction

गाईउ पंचखोरिम्भरीउ, चत्तारि पक्कलवइल्ला ।
संपण्णं वालावल्लरअं, सेवा सिवं कुणउ ॥ 812 ॥

पांच घागरी दूध देणारी गाय, चार पुष्ट बैल व सुपीक शेत, यांचें आकर्षण एखाद्या सेवकाला वाटेल, आम्हांस वाटणार नाहीं.

● वेबर सांगतो, या गाथेचा अर्थ नीट लागत नाहीं. त्यानें साधारणदेवाच्या टीकेतील उतारा दिला आहे : ' प्रणमत्युन्नतिहेतोर्जीवनहेतोर्वि मुञ्चति प्राणान् । दुःखीयति सुखहेतोः को मूढः सेवकादन्यः ॥ (हितोपदेश आपटे प्रतः २.२७). मूळ गाथेंतील उद्गार पुरुषाचेच आहेत असें नाहीं.

८०७ काळी मोहोर : 807. Seal.

अणुराअरअणभरिअं कंचणकलस व्व तरुणिथणवट्टं ।
तस्स च्चिअ मुहम्मि किआ मसिमुद्दा मअणराएण ॥ 813 ॥

तरुणीचे स्तन प्रेमाच्या रत्नांनीं भरलेल्या सुवर्णकुंभांसारखे आहेत. वाटतें कीं जणूं त्यांच्या मुखांवर मदनराजानें काळ्या मोहोरा केल्या आहेत.

● गर्भिणीचीं स्तनाग्रें कृष्णवर्ण होतात. स्तनांच्या मुखांवर मदनराजानें काळी मोहोर केल्यामुळें त्यांतलीं अनुरागरत्नें आतां प्रकट होणार नाहींत, तिची प्रीति आतां अप्राप्य आहे, अशी सूचना.

८०८ वैद्यराज : 808. Physician.

विज्ज ! पिआसा वहलइ, थणताओ, खणखणम्मि रोमंचो[1] ।
हिअए ण माइ अण्णं, लज्जापत्थेहि तेजिआ पाणा[2] ॥814॥

१. वारि. २. त्थणतइं.

वैद्यराज, तिच्या सारखी तहान लागत आहे; अंगाची सारखी लाही होते आहे; क्षणाक्षणाला अंगावर कांटा उभा रहात आहे; अन्नावर मुळींच वासना नाहीं; जीव सारखा कासावीस होत आहे.. (यांतून तुम्हीच तिला वांचवाल.)

● विज्ज=वैद्य किंवा विज्ञ. हे विज्ञ, तुझी प्रिया तुझ्यासाठीं तळमळत आहे-वगैरे .

८०९ अरसिक : 809. Conviction & Sentence.

गाहाण अ गेआण अ तंतीसद्दाण पोढमहिलाण ।
ताणं सो च्चिअ दण्डो, जे ताण रसं ण आणंति ॥815॥

ज्याला कवितेची गोडी नाहीं व संगीताची आवड नाहीं आणि प्रौढ महिलांच्या स्पर्शांतील माधुरी रुचत नाहीं त्याला त्याचें अरसिकत्व हीच शिक्षा.

● त्यानें कोणताही गुन्हा केला तरी त्याबद्दल त्याला वेगळी शिक्षा करण्याचें कारण नाहीं. जीवनांतल्या आनंदांची जो उपेक्षा करतो त्याला जीवनापासून अपेक्षा तरी कोणत्या असणार ! त्याचें अरसिकत्व हीच त्याला शिक्षा, जीवन व्यर्थ हीच त्याला शिक्षा.

८१० श्री : 810. Inquisitive.

विवरीअरअम्मि सिरी बम्हं दट्ठूण णाहिकमलत्थं ।
हरिणो दाहिणणअणं रसाउला झत्ति ढक्केइ ॥ 816 ॥
[विपरीतरते लक्ष्मीर्ब्रह्माणं दृष्ट्वा नाभिकमलस्थं ।
हरेर्दक्षिणनयनं रसाकुला झटिति छादयति ॥]

विपरीत रत करीत असतांना विष्णूच्या नाभिकमळांत बसलेला ब्रह्मदेव लक्ष्मीला दिसला. तेव्हां तिनें त्वरा करून हरीचा उजवा डोळा झांकला.

● विष्णूचा उजवा डोळा मिटला म्हणजे सूर्यास्त होतो आणि सूर्यास्त झाला म्हणजे कमळाच्या पाकळ्या मिटतात. आपला विलास ब्रह्मदेवाला दिसूं नये म्हणून लक्ष्मीनें एवढी घाई केली. नाभिकमल व त्यांत बसलेला चतुर्मुख ब्रह्मदेव यांची अडचण लक्ष्मीनें कशी सोसली असेल—हरि जाणे !

८११ महात्मे : 811. The Great.

लडहविलआण लोअण कडंक्खविक्खेवजणिअसंदावा ।
झिज्जन्ति महासत्ता, चिखुव्वेअणसहा होंति ॥ 817 ॥

सुंदर स्त्रियांच्या लाडिक नेत्रकटाक्षांनीं महात्म्यांनाही वेदना होतात; पण त्या ते सहन करतात आणि त्यांमुळें क्षीण मात्र होतात.

८१२ सदुपदेश : 812. Good Counsel.

तह हस जह ण हसिज्जसि, तह जंप जहा परप्पिअं होइ ।
तह जिअ जह लहसि जसं, तह मर जह ण उण संभवसि ॥818॥

असें हंसावें कीं आपलें हंसें होणार नाहीं; असें बोलावें कीं आपण लोकांना प्रिय व्हावें; असें जगावें कीं ज्यामुळें यश प्राप्त होईल; असें मरावें कीं पुन्हां जन्मच घ्यावा लागणार नाहीं.

८१३ अडचण : 813. Tarry a While.

छप्पअ गम्मसु सिसिरं पासाकुसुमेहि ताव, मा मरसु ।
जीअन्तो दक्खिहिसि अ पुणो वि रिद्धिं वसंतस्स ॥ 819 ॥

१. कटक्ख.

भ्रमरा, कुसुमांच्या मिटलेल्या पाकळ्यांच्या बंधनांत तूं हिंवाळ्याचा काळ कसा तरी काढ. जगला वांचलास तर वसंताची समृद्धि तुला पहावयास मिळेल.

● आज अडचण आहे, पुन्हां केव्हां तरी पाहूं, तिला सवड असेल तेव्हां मी तिला घेऊन येईन; दूतीची सूचना व आश्वासन. पति अकस्मात् घरीं परत आल्यामुळे उपपतीला रांजणांत लपविल्याची कथा ऋग्वेदांत आहे. येथें नायकाला फुलझाडांच्या ताटव्यात तर लपविला नसेल ? पासाकुसुम = पाशाकुसुम, पुष्पविशेष. वज्जालग्गांतील पाठ व छाया: छप्पय गमेसु कालं वासवकुसुमाइ ताव मा मुयसु । मन्न नियंतो पेच्छसि पउरा रिद्धी वसन्तस्स ॥ ६११ ॥ षट्पद गमयस्व कालं वासवकुसुमानि तावन्मा मुञ्च । मन्ये जीवन् पश्यसि प्रचुरर्द्धीर्वसन्तस्य ॥]

८१४ गजेंद्र :　　　　　　　814. Elephant

सव्वत्थ होइ ठाणं रासहमाहिसाण मेसवुसहाणं ।
भद्दगइंदाणमहो महावणं अहव महाराओ ॥ 820 ॥

गाढव, रेडा, मेंढा व बैल यांना कोठेंही राहतां येतें. भद्र गजराजाला मात्र फक्त महावनांत किंवा महाराजाकडे स्थान मिळतें.

● श्रेष्ठांचा स्नेह करावा तो त्यांच्या श्रेष्ठत्वासाठीं, उपयुक्ततेसाठीं नव्हे. वज्जालग्गांतील पाठ व छाया : गोमहिसतुरङ्गाणं पसूण सव्वाण जुज्जए ठाणं । दड्ढगाइन्दाण पुणो अह विञ्झो अह महाराओ ॥ १८९ ॥ गोमहिषतुरङ्गाणां पशूनां सर्वाणां युज्यते स्थानं । दग्धगजेंद्राणां पुनोऽथ विन्ध्योऽथ महाराजः ॥

८१५ सतीचा टेंभा :　　　　　　　815. Tower of Purity.

अव्वो ! ण आमि छेत्तं खज्जउ साली वि कीरणिवहेहिं ।
जाणन्ता अवि पहिआ पुच्छन्ति पुणो पुणो मग्गं ॥ 821 ॥

---

१. जामि. २. [illegible]त्तं. ३. कुराकालेहिं ४. संसग्गं.

अं हं, मी यापुढें शेतांत राखणीला जाणार नाहीं; मग पोपटांनी सारें भात खाऊन टाकलें तरी चालेल; कारण सारे वाटसरू रस्ता माहीत असून सुद्धां मार्ग कोणीकडून आहे असें पुन्हां पुन्हां मलाच विचारीत असतात.

● शेतांत राखणीला जा, असें आईनें सांगितलें, त्याला कन्येचें उत्तर. स्वतःच्या सतीत्वाचें प्रकटन; किंवा स्वदोषनिरसन; किंवा स्वरूप-कीर्तन ! पण लोक विचारीत होते तो रस्ता जाण्याचा कीं येण्याचा ! कीं जाणीचा ! कीं तिच्या घराचा ?

८१६ दयित दर्शन : 816. Lover.

अत्थक्कागअदिट्ठे[1] वहुआ[2] जामोदुअम्मि[3] गुरुपुरओ[4] ।
जूरइ णिवडंताणं[5] हरिसविसट्ट[6]वलआणं[7] ।। 822 ।।

[अकस्मादागतहृदये वधूका दयिते गुरुपुरतः ।
कुप्यति विगलद्भ्यो हर्षविकसद्भ्यो वलयेभ्यः ।।]

नवरा अकस्मात् घराकडे येत असलेला पाहून वधूला इतका आनंद झाला कीं तिच्या हातांतली कांकणें ओघळली. त्यावेळीं गुरुजन आजू-बाजूला होते, त्यांचा तिला राग आला.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून. तेथील पाठ वेगळा आहे व तो गाथाविषयाला अधिक पोषक आहे.

८१७ सुलोचना : 817. Black in White.

अच्छीइ तुज्झ सुंदरि ! बाहिरधवलेहि मज्झकसणेहि ।
एहहि को ण दमिओ पिसुणेहि व कण्णलग्गेहि ? ।। 823 ।।

१. अत्थक्क. २. हिअए. ३. दइअम्मि. ४. जण. ५. विअलंताणं. ६. विसट्टाण. ७. णिपतद्भ्यो.

सुंदरि, तुझ्या आकर्ण नेत्रांचें बाह्यांग पांढरें शुभ्र आहे आणि अंतरंग काळेंभोर आहे. चहाडखोर असेच असतात, बाह्यत: साधु व अंतर्यामी खल. ते केव्हांही प्रभूच्या कानांशीं लागू शकतात. त्यांच्या-प्रमाणें तुझे नेत्र कोणाला वश करणार नाहींत ?

<u>८१८ बिंब-प्रतिबिंब :</u> 818. Illusion.

एह ! इमीअ, णिअच्छह ! विम्हिअहिअआ सही पुलोएइ ।
अद्दाअम्मि कवोलं कवोलपट्टम्मि अद्दाअम् ॥ 824 ॥

ए, इकडे ये, हें बघ; ती आरशांत स्वत:चें सौंदर्य न्याहाळीत आहे. आरशांत तिच्या गालांचें प्रतिबिंब दिसत आहे आणि तिच्या गालांवर आरशाचें. हें पाहून तिच्या मैत्रिणी चकित झाल्या आहेत.

<u>८१९ चिमुरडी :</u> 819. Anticipation.

कइआ जाआ ? कइआ णु सिक्खिआ, माइआ ! हअकुमारी ?
तं तं जाणइ सव्वं, जं जं महिलाओ जाणन्ति ॥ 825 ॥

बाई, बाई, हिचें वय केवढें आणि हें सारें ही शिकली तरी कधीं ! आणि ह्या वयेला हें सारें शिकवलें तरी कोणीं ! एवढीशी चिमुरडी पोर, पण प्रौढ स्त्रियांना अनेक वर्षांच्या अनुभवानें जें समजतें तें सारें हिला ठाऊक आहे.

<u>८२० ग्राममण्डन :</u> 820. Village Beauty.

खंपपिट्ठधूसरत्थणि ! महुमअतंबच्छि ! कुवलआभरणे ! ।
कण्णकअचूअमंजरि ! पुत्ति ! तुए मंडिओ गामो ॥ 826 ॥

१. छण. २. बउल. ३. कण्ण.

... मुली, सणासाठीं पीठ कुटल्यामुळें तुझे स्तन धूसर झाले आहेत, मद्याचें सेवन केल्यामुळें तुझे नेत्र आरक्त झाले आहेत. अलंकारार्थ तूं कमळें धारण केलीं आहेस आणि कानावर आंब्याच्या मोहोराची मंजिरी ठेवली आहेस. सुंदरि, तूं आपल्या गांवाला शोभा आणली आहेस.

८२१ अधर : 821. Lower Lip.

मग्गिअलद्धे बलेमोडिचुंबिए अप्पणेण उवणीडे ।
एक्कम्मि पिआ अहरे अण्णण्णा होंति रसहेआ ॥ 827 ॥

जो वारंवार शोधण्यांत येतो व अधूनमधून सांपडतो, सांपडला (म्हणजे) जो बलात्कारानें चुंबिला जातो आणि जो कधीं कधीं स्वयंस्फूर्तानें पुढें येतो तो तुझा प्रिय अधर; तो एकच एक असला तरी त्यापासून अनेक रसांची प्राप्ति होते.

८२२ तृप्त : 822. Rapture.

उप्फुल्लोअणेणं कवोलवोसट्टमाणसेएणं ।
अहणंतेण वि भणिआ मुहेण से कज्जणिव्वुत्ती ॥ 828 ॥

तिनें शब्दानें सांगितलें नाहीं; पण तिचे प्रफुल्ल डोळे आणि गालांवरून ओघळणारे स्वेदबिंदु प्रकट करतात कीं ती तृप्त झालेली आहे.

८२३ प्रेमचिन्ह : 823. Love in Disguise.

जत्थ ण उज्जागरओ, जत्थ ण ईसा विसूरणं माणो ।
सब्भावचाडुअं जत्थ ण त्थि, णेहो तहिं ण त्थि ॥ 829 ॥

१. बलेमोड. २. विसर्पमाण. ३. हणिआ.

[यत्र नास्त्युज्जागरको यत्र नेर्ष्याखेदौ मानः ।
सद्भावचाटुकं यत्र नास्ति स्नेहस्तत्र नास्ति ।।]

जेथें जागरणें नाहींत व भांडणें नाहींत, असूया नाहीं व रुसवा नाहीं किंवा सद्भावपूर्ण मधुर शब्द नाहींत, तेथें स्नेहही नाहीं.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून.

८२४ पत्र व चित्र : 824. Spherical Painting.

मह पइणा थणजुअले पत्तं लिहिअं ति गव्विआ कीस ? ।
आलिहइ मई वि पिओ जइ से कंपो च्चिअ ण होइ ।।830।।

तुझ्या वक्षःस्थलावर तुझ्या पतीनें (प्रेम) पत्र लिहिलें म्हणून तूं एवढी चढून जाऊं नकोस. माझ्यावरील (प्रेमामुळें) माझ्या पतीचा हात थरकांपला नसता तर त्यानें माझ्या स्तनांवर प्रेमचित्र रंगवल असतें.

८२५ विदीर्ण : 825. Disaster.

कण्णे पडिअं, हिअए पडिअं विअ, ओ मए अमण्णाए ।
जामि त्ति तुज्झ वअणं-किं व ण सहिअं ! पवासस्स।।831।।

मी प्रवासाला जाणार हे तुझे शब्द कानीं पडले आणि माझें हृदय विदीर्ण झालें. मीच दुर्दैवी. असें कोणतें दुःख आहे कीं जें मी सहन केलें नाहीं (म्हणून तूं त्यांत ही भर घालीत आहस ?)

८२६ पृथुलनितंबिनी : 826. Gravitation.

समपंथपत्थिअस्स वि पहिअस्स खलंति पुढमादिअहम्मि ।
हिअअट्ठिअजाआगुरुणिअंबहारेण व पआइ ।। 832 ।।

पथिकाचा प्रवास नुकताच सुरू झाला आहे आणि तो ज्या प्रदेशांतून जात आहे तो सपाट आहे; तरीही त्याचीं पावलें (दमल्यासारखीं) अडखळत आहेत, कारण त्याच्या हृदयांत अधिष्ठित असलेल्या त्याच्या पृथुलनितंबिनी पत्नीचा भार जणू त्याला वाहावा लागत आहे.

८२७ गोत्राक्षर : 827. Repetition.

संदेसो वि ण लिहिओ लेहे पहिएण कत्थ घरतत्ती ? ।
अणवरअलिहिअगेहिणिगोत्तक्खरपूरिए पत्ते ।। 833 ।।

प्रवासी पतीनें पत्नीला पत्र पाठविलें, त्यांत संदेश असा कांहींच नव्हता. मग घरची स्थिति कशी काय आहे याची चौकशी त्यांत कोठून असणार ? त्यानें त्या पत्रांत फक्त आपल्या गृहिणीचें नांव पुनः पुनः लिहून पत्र भरून काढलें होतें.

८२८ घामाघूम : 828. Real Unreality.

उप्पेक्खागअदइअंगसंगमुच्चालिअविउणसेआए ।
वोलीणो वि ण णाओ पउत्थपइआइ हेमन्तो ।। 834 ।।

तिचा पति प्रवासी होता; तरी विरहाचा हिंवाळा केव्हां संपला हें तिच्या लक्षांतही आलें नाहीं; कारण तिनें मनोमय प्रियकर निर्माण केला होता आणि ती सारखी त्याच्या सहवासांत असल्यामुळें तिचें शरीर नेहमींच घामाघूम झालेलें असे.

८२९ स्वप्नसुख : 829. Dream.

सिविणअलद्धपिअअमपुलइउग्गमणिब्भरेहि अंगेहिं ।
परिरम्भणे सुहाइं पावउ, मा णं पबोहेह ।। 835 ।।

ती स्वप्नांत प्रियकराच्या आलिंगनाचें सुख अनुभवीत आहे, त्यामुळें तिचीं गात्रें पुलकित झालीं आहेत. तिला कोणी जागी करूं नका.

● मेघदूतांत (परांजपे प्रत : क्र. ९४) यक्ष मेघाला सांगतो, ' माझी प्रिया झोंपलेली असली तर तिची निद्रा मोडूं नको; कदाचित् त्या वेळीं स्वप्नांत ती माझ्या आलिंगनाचें सुख अनुभवीत असेल.'

८३० निःश्वास : 830. Suspiration.

विज्झाविज्झइ पईवं अब्भुट्ठुंतीऍ पहिअजाआए ।
पिअअमविओअदीहरणीसहणीसासरिञ्छोली ॥ 836 ॥

प्रवासी पतीच्या दीर्घ विरहामुळें दुर्बल झालेली त्याची पत्नी सारखे निःश्वास टाकते. यामुळें ती दिवा पेटवूं लागली कीं त्याची ज्योत विझून जाते.

८३१ तीर्थ : 831. Holy Water.

जं पीअं मंगलवासणाऍं पत्थाणपढमदिअहम्मि ।
बाहसलिलं ण चिट्ठइ तं चिअ विरहे रुवंतीए ॥ 837 ॥

पति प्रवासाला गेला त्या दिवशीं तिनें मंगल पात्रांतलें तीर्थ घेतलें. तेव्हांपासून बाहेरलें असें पाणी ती प्यालीच नाहीं; कारण विरहांत तिचे अश्रु कधीं थांबलेच नाहींत.

८३२ निस्तेज : 832 Pallid.

उक्कण्ठाणिच्छाआ सव्वं उण परिअणं रुआवेइ ।
आअंबिरेहि अज्जा फ़ुसिअपरुण्णेहि अच्छीहि ॥ 838 ॥

आर्येचें मुख निस्तेज झालें आहे; रडून रडून आणि अश्रु पुसून डोळे लाल झाले आहेत. ती भोंवतालच्या परिजनांनाही रडवीत आहे.

८३३ शिरीष : 833 Evening Breeze.

जह दिअहविरामो णवसिरीसगंधुध्दुराणिलग्घविओ।
पहिअघरिणीअ ण तहा तवेइ तिव्वो वि मज्झण्हो ॥ 839 ॥

शिरीष कुसुमांनीं सुगंधित झालेल्या संध्याकाळच्या वाऱ्यामुळें विरहिणीला होतो तेवढा ताप भर दुपारच्या कडक उन्हानें होत नाहीं.

८३४ कल्पित कथा : 834.Tales of Imagination.

चिरपवसिअदइअकहा णिउणाहि सहीहि विरहसहणत्थम्।
अलिआ अवि अवराहा वहूऍ कमसो कहिज्जंति॥ 840 ॥

पुष्कळ दिवस प्रवासाला गेलेल्या दयिताच्या वधूला विरह सहन करतां यावा म्हणून तिच्या निपुण मैत्रिणी प्रवासी प्रियकराच्या कल्पित कथा तिला क्रमशः सांगतात.

८३५ लेखणी : 835 Pen.

जं जं पउत्थपइआ पिअअमणामक्खरं लिहइ लेहे।
तं तं तल्लेहणिआणुमारगालिओ पुसइ सेओ ॥ 841 ॥

प्रवासी पतीचीं स्त्री त्याला लिहावयाच्या पत्रांत ज्या ज्या वेळीं त्याच्या नांवाचीं अक्षरें लिहिते त्या त्या वेळीं तिला घाम येतो व तो लेखणीवरून ओघळल्यामुळें लेख अस्पष्ट होतो.

८३६ ध्यान : 836. Meditation.

अच्छउ णिमीलिअच्छी, मा मा वारेह, पिअअमासाए ।
तेण विणा किं पेच्छउ उम्मिल्लेहिं वि अच्छीहिं ॥ 842 ॥

प्रियकराची भेट व्हावी म्हणून ती डोळे मिटून ध्यानस्थ बसली आहे. तिचें निवारण करूं नका; तिनें डोळे उघडलेच तर ती प्रियकराशिवाय कोणाकडे पाहणार !

८३७ विरहगीत : 837. Song of Separation.

दीहुण्हा णीसासा, रणरणओ रुज्जगग्गिरं गेअं ।
पिअविरहे जीविअवल्लहाण एसो च्चिअ विणोओ ॥ 843 ॥

अंतर्यामीं व्याकुल झालेल्या व दीर्घ नि:श्वास टाकणाऱ्या विरहिणी रुदनामुळें रुद्ध झालेल्या स्वरांत विरहगीतें गातात. ज्यांना जगण्याची इच्छा असते त्या या उपायानें विरहाचा काळ कंठतात आणि तगतात.

८३८ मागणी : 838. Entreaty.

जइ देव्व ! तुं पसण्णो मा करिहिसि मज्झ माणुसं जम्म ।
जइ जम्मं, मा पेम्मं, जइ पेम्मं, मा जणे दुलहे ॥ 844 ॥

दैवा, तूं मजवर प्रसन्न असलेस तर माझें मागणें एक; मला पुन्हां मनुष्यजन्म देऊं नकोस. दिलासच तर कोणाच्या प्रेमांत गुंतवूं नकोस आणि प्रेम बावयाचेंच असलें तर निदान तें अप्राप्य अशा व्यक्तीबद्दल देऊं नकोस.

● वेबरने टीकेंत समानार्थी गाथा दिली आहे : रे संकर ! मा सिजसि, अह सिजसि, मा देहि माणुसं जम्म । अह जम्मं मा पेम्मं, अह पेम्मं मा विओअं म्हे ॥ अलंकाररत्नाकरांत अतिशय अलंकाराचें उदाहरण.

८३९ उन्हाळ्यांतल्या रात्री : 839. Summer Nights.

राईण भणइ लोओ जा किल गिम्हम्मि होंति मडहाओ ।
मह उण दइएण विणा ण आणिमो कीस वड्ढन्ति ॥ 845 ॥

लोक सांगतात कीं उन्हाळ्यांतल्या रात्री लहान असतात; पण अनुभव मात्र असा आला कीं प्रियकराच्या विरहांत त्या फार मोठ्या होतात.

८४० अयन : 840. Solstice.

एक्के अअणे दिअहा, वीए रअणीओं होन्ति दीहाओ ।
विरहाअणो अपुव्वो, एत्थ दुवे च्चेअ वड्ढन्ति ॥ 846 ॥

एका अयनांत दिवस मोठे असतात आणि दुसऱ्या अयनांत रात्री; पण विरहाच्या वर्षाचें वैशिष्ट्य असें कीं त्यांतील दोन्ही अयनांतील दिवस व रात्रीही मोठ्या असतात.

८४१ रसायन : 841. Aphrodisiac.

चिरजीवित्तणकंखिरि ! मा तम्म, रसाअणेहि अचिरेहि ।
विरहं पवज्ज, जाअंति जेण जुअदीहरा दिअहा ॥ 847 ॥

चिरकाल जगण्याची इच्छा करणाऱ्या स्त्रिये, चित्त अस्थिर करणाऱ्या रसायनांचें विरहकाळांत सेवन करावें, म्हणजे दिवस युगासारखे दीर्घ होतात आणि पुष्कळ दिवस जगल्याचें श्रेय मिळतें.

८४२ शेजारीण : 842. Neighbour.

रुअइ रुअंतीए मए, ओहिदिणे गणइ, झिज्जइ अई व ।
पिअविरहे मामि! सअज्झिआएँ णेहो च्चिअ अपुव्वो ॥848॥

माझ्या प्रियकराच्या विरहामुळें मी रडतें, तशीच माझी शेजारीणही रडते; विरहाचे दिवस माझ्याप्रमाणें तीही मोजते; माझ्याबरोबर तीही कृश होते; खरोखर, तिचा स्नेह अपूर्व आहे.

● सहृदयतेचें कारण शेजसंबंध, केवळ शेजारधर्म हें नसावें.

८४३ गळामिठी : 843. Caress.

कण्ठग्गहणेण सअज्झिआए अब्भागओवआरेण ।
वहुआएँ पइम्मि वि आगअम्मि सामं मुहं जाअं ॥ 849 ॥

तिकडे शेजारणीनें प्रियकर घरीं येतांच त्याच्या गळ्यांत विळखा घातला हें दृश्य पाहून इकडे वधूचें मुख म्लान झालें; तरी बरें. हिचा पति घरींच होता !

८४४ मृणालिनी : 844. Torment.

चंदो वि चंदवअणे! मुणालवाहालए! मुणालाइं ।
इंदीवराइ इंदीवरच्छि! तावेन्ति तुह विरहे ॥ 850 ॥

१ सआहिआए.

चंद्रानने, तुझें मुख चंद्रासारखें आहे; तुझे नेत्र नीलकमलांसारखे आहेत आणि बाहुलता कमळाच्या देंठांसारख्या आहेत. यामुळें तुझ्या विरहांत चंद्र, मृणाल व कमळें तापदायक वाटतात.

८४५ आज्ञाधारकः 845. Obedient.

गुरुअणपरवस पिअ ! किं भणामि तुह मंदभाइणी अहअं ।
अज्ज पवासं वज्जसि, वच्च, सअं चेअ मुणसि करणिज्जं ॥851॥

[गुरुजनपरवश प्रिय किं भणामि त्वां मन्दभागिनी खल्वहम् ।
अद्य प्रवासं व्रजसि व्रज स्वयमेव श्रोष्यसि करणीयम् ॥]

प्रियकर, तुम्हीं वडीलधाऱ्यांच्या आधीन आहांत. मी मन्दभागिनी; मी तुम्हांला काय सांगणार ? आज तुम्ही प्रवासाला निघणार आहांत ना ! जा, खुशाल जा; इकडे मी काय करीन किंवा काय होईल तें तुमच्या कानीं येईलच.

● छाया काव्यप्रकाशावरून. कालाधिष्ठित अर्थव्यञ्जकतेचें उदाहरण. ही गाथा उदाहरणचंद्रिकेंतील असल्याचें काव्यप्रदीपकारानें नमूद केलें आहे.

८४६ वसुन्धरा : 846. Wide World.

वित्थिण्णं महिवेढं, विउलणिअम्बाओ पीणथणिआओ ।
लब्भन्ति विसालच्छीओ सुहअ ! जुवईओ मा तम्म ! ॥852॥

सुभग, पृथ्वी विशाल आहे. विपुलनितंबिनी, पृथुलस्तनी व विशालाक्षि अशा अनेक तरुणी तुला भेटतील; (ही प्राप्त होत नाहीं, म्हणून) उगाच खिन्न होऊं नको.

● बहुरत्ना वसुंधरा.

१ वच्चसि. २ मुणसि.

८४७ आत्मनिंदा : 847. Self Reproach.

कज्जं विणा वि विअलंतपेम्मराअं तुमं णिअच्छन्ती ।
हिअआसंकिअणिजदोसदुम्मणा तामइ वराई ॥ 853 ॥

कांहीं कारण नसतां तुझ्या प्रीतींत अंतर पडल्यामुळें आपलेंच कांहीं तरी चुकलें असेल अशा समजुतीनें बिचारी दु:खित झाली आहे व स्वत:लाच दोष लावून घेत आहे. ती तुझ्या दर्शनासाठीं उत्सुक आहे.

८४८ हेलपाटा : 848. Bewildered.

दूई ण एइ, चंदो वि उग्गओ, जामिणी वि वोलेइ ।
सव्वं सव्वत्तो च्चिअ विसंठुलं, कस्स किं भणिमो ?॥854॥

चंद्र उगवला, रात्र उलटत आहे; भोंवतालचें वातावरण अस्थिर झालें आहे. दूती अद्याप परत आली नाहीं. माझी व्याकुलता मी कोणाला आणि कशी सांगूं ?

८४९ हेलकावा · 849. Twixt Life & Death.

दूई गआ चिराअइ, किं सो मइ पास मेहिइ ण वे त्ति ।
जीविअमरणन्तरसण्ठिआएँ अंदोलए हिअअं ॥ 855 ॥

दूती गेली त्याला किती तरी वेळ झाला ! यापुढें प्रियकर इकडे येईल किंवा नाहीं या विचारानें माझें हृदय आंदोलन पावत आहे, जणूं जीवन व मरण यामध्यें हेलकावत आहे.

८५० चेष्टा : 850. Teaser.

सो णा गओ त्ति पेच्छइ परिहासुल्लाविरीएँ दूईए ।
णूमंतीअ पहरिसो ओसहइ गण्डपासेसु ॥ 856 ॥

'बघ, तो आतां येणारच नाही,' असें दूतीनें तिला चेष्टेनें सांगितलें; पण हें सांगतांना लपवून ठेवलेला आनंद जणूं दूतीच्या गालांवरून ओसंडत होता.

८५१ सवाल : 851. Questions.

कह णु गआ ? कह दिट्ठो ? किं भणिअं ? किं व तेण पडिभणिअं ? ।
एअं चिअ ण समप्पइ पुणरुत्तम् जंपमाणीए ॥ 857 ॥

[कथं नु गता कथं दृष्टः किं भणितं किं च तेन प्रतिपन्नम्
एवमेव न समाप्यते पुनरुक्तं जल्पमानायाः ॥]

अग, तूं गेलीस कशी ? भेट कुठें झाली ? तूं काय म्हणालीस ? मग त्यानें काय उत्तर दिलें ? तिचे प्रश्न संपेनातच आणि नंतर ती तेच तेच प्रश्न पुनः पुनः विचारूं लागली.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून.

८५२ उत्सुक : 852. Trepidation.

दूईमुहअंगुलोइरीएँ किं भणिहिइ त्ति अज्झाए ।
पिअसंगमललिअमणोरहाएँ हिअअं थरथरेइ ॥ 858 ॥

प्रियकराच्या समागमाविषयींच्या मनोहर कल्पना तिच्या मनांत रंगत होत्या. संकेत ठरविण्यासाठीं गेलेली दूती परत आली तेव्हां तिच्या मुखचंद्राकडे पाहून तिनें काय निरोप आणला असेल याचा ती अंदाज करूं लागली तेव्हां आर्येचें हृदय थरारलें.

८५३ असंबद्ध : 853. Incoherent.

अप्पाहिआइ तुह तेण जाइ ताई मए ण मुणिआइ ।
अज्जुण्हस्सासपरिक्खलंतविसमक्खरपआइं ॥ 859 ॥

तुला पोंचविण्यासाटीं कांहीं निरोप त्यानें मला सांगितला खरा, पण मला कांहीं तो उमजला नाहीं, कारण ऊष्ण निःश्वासामुळें त्याचा कण्ठ रुद्ध झाला होता आणि तो जें बोलला तें अगदीं असंबद्ध होतें.

८५४ दूती गेली, सवत आली : 854. Treachery.

साहेन्ती सहि ! सुहअं खणे खणे दूमिआ सि मज्झ कए ।
सब्भावणेहकरणिज्जसरिसअं दाव विरइअं तुमए ॥ 860 ॥

[साधयन्ती सखि सुभगं क्षणे क्षणे दूनासि मत्कृते ।
सद्भावस्नेहकरणीयसदृशं तावद् विरचितं त्वया ॥]

माझ्या भाग्यशाली प्रियकराला माझ्यासाठीं अनुकूल करण्याकरिता तूं किती त्रास सहन केलास ! सखी, सद्भाव व स्नेह यांना साजेल असेंच वर्तन तूं केलेंस.

---

१. शासती, शंसंती.

● छाया काव्यानुशासनावरून. सखी गेली ती दूती म्हणून आणि सवत झाली ती सवत होऊन. मैत्रीण होती ती वैरीण झाली, हे उमजलें अपराध्याच्या खाणाखुणांवरून. हीं चिन्हें लपविण्याची कितीही खटपट केली तरी जाणत्यांना तीं पटतातच.

८५५ अद्वैत : 855. Identity.

जं तुह कज्जं तं चिअ कज्जं मज्झ त्ति जं सआ भणासि ।
ओ दूइ सच्चवअणे ! अज्ज सि पारं गआ तस्स ॥ 861 ॥

सखी, आजवर आपण एकमेकींमध्यें मुळींच भेदभाव मानला नाहीं. जें काम माझें तें तुझें आणि जें तुझें तें माझें, अशा आपण वागलों. (म्हणूनच मी तुला दूती म्हणून पाठविलें.) दूती, आता खरें सांग, (माझ्या प्रियकराशीं तूं आतां रममाण होऊन आली आहेस कीं नाहीं !) आज आपल्या प्रेमाची पराकाष्ठा झाली.

८५६ युद्धस्य कथा : 856. Twig.

णवलअपहरुत्तत्थाऍ[1] तं कअं हलिअवहुआए[2] ।
जं अज्ज वि जुवइजणो घरे घरे सिक्खिउं महइ ॥ 862 ॥

[पतिनामग्रहणपूर्वकप्रहारत्रस्तया तत्कृतं किमपि हलिकस्नुषया ।
यदद्यापि युवतिजनो गृहे गृहे शिक्षितुं भ्रमति ॥]

वेलीच्या फोकानें शेतकरी पत्नीला फोडून काढूं लागला; त्याच्या आवेशामुळें बिचारी घाबरून गेली. पुढें जें जें झालें तें जाणण्याची व शिकण्याची इच्छा घरोघरींच्या तरुणींना असते.

---

१. उद्धाइ. २. सोण्हाए.

● अर्थ सरस्वतीकण्ठाभरणावरून. साहित्यमीमांसेतील पाठः हमफरूळ-फोमअणुबेजापतक्कणं किंबिहळिअसुंहए । खज्जअविंदुबहजंपो णेरे घरे विकरुडम्महइ ॥

८५७ हरिद्रा :   857. Under the Tree.

घण्णो सि रे हलिद्दअ ! हलिअसुआपीणथणभरुच्छंगे ।
पेच्छन्तस्स वि पइणो जह तुह कुसुमाइ णिवडन्ति ॥ 863 ॥

हरिद्रा वृक्षा, तूं धन्य आहेस. कारण तुझीं पानें प्रथम शेतकऱ्याच्या मुलीच्या पुष्ट स्तनांवर पडतात आणि नंतर तिच्या मांडीवर विश्रांति घेतात; आणि हें सारें पतीच्या देखत.

● हरिद्रावृक्षाखालीं तिचा पति शेतकऱ्याच्या मुलीला घेऊन बसला होता. पतीचा अपराध दिसल्यावर पत्नीनें काढलेले उद्गार. टीकाकार सांगतात, हीही तिकडे संकेतासाठींच गेली होती. हिचा अपराध लपला आणि त्याचा उघडकीस आला.

८५८ इंद्र :   858. Idol.

सच्चं चिअ कट्ठमओ सुरणाहो, जेण हलिअधूआए ।
हत्थेहि कमलदलकोमलेहि छिक्को ण पल्लविओ ॥ 864 ॥

[सत्यमेव काष्ठमयः सुरनाथो येन हलिकदुहित्रा ॥
हस्तैः कमलदलकोमलैः स्पृष्टो न पल्लवितः ॥]

खरोखर, हा इंद्र अगदीं लांकडासारखा आहे. शेतकऱ्याच्या मुलीनें आपल्या कमलकोमल करांनीं त्याला स्पर्श केला, तरी त्याला पालवी फुटली नाहीं.

---

१ छित्तो.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून. हें चित्र आपण असतें तर स्त्रियांच्या स्पर्शानें निर्जीव मूर्तीही सजीव झाली असती, मृत काष्ठ पल्लवित झालें असतें.

८५९ सहगमन : 859. In Death We Meet.

एमेअ अकअपुण्णा अप्पत्तमणोरहा विवज्जिस्सम् ।
जणवाओ वि ण जाओ, तेण समं हलिअउत्तेण ॥ 865 ॥

[एवमेवाकृतपुण्याप्राप्त मनोरथा विपत्स्ये ।
जनवादोऽपि न जातस्तेन समं हलिकपुत्रेण ॥]

शेतकऱ्याच्या मुलाबरोबर मी कोणतेंही सुख भोगलें नाहीं. माझे मनोरथ अतृप्त राहिले. तरीही मी सहगमन करणार. त्याच्यावर माझें प्रेम होतें असा बोभाटाही झालेला नाहीं. आतां हें सार्‍यांना समजलें तरी कोणाला अपवाद घेतां येणार नाहीं.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून.

८६० कुलस्त्री : 860. Wife.

लज्जापज्जत्तपसाहणाइ परतत्तिणिप्पिवासाइं ।
अविणअदुम्मेहाइं धण्णाण घरे कलत्ताइं ॥ 866 ॥

[लज्जापर्याप्तप्रसाधनानि परतृप्तिनिष्पिपासानि ।
अविनयदुर्मेधांसि धन्यानां गृहे कलत्राणि ॥]

लज्जा हेंच कुलस्त्रियांचें प्रसाधन होय. पतीशिवाय इतर पुरुषांबद्दल त्या निरभिलाष असाव्यात. अविनयाच्या मूर्खपणापासून त्या अलिप्त असाव्यात. अशा स्त्रिया धन्य होत आणि त्यांचीं घरेंही.

---

१. चिता, भर्तृ.

● छाया दशरूपकावरून. गृहकार्यपराङ्मुख, निर्लज्ज, चपल, अविनीत वधूला सासूचा उपदेश. कुलस्त्रियांचा शृंगार उद्धत नसावा; इतरांना प्रसन्न करून घेण्याची इच्छा त्यांना नसावी; त्यांचें अंतकरण मोहांपासून अलिप्त असावें. अशा स्त्रिया धन्य होत; त्यांचे पति सुखी असतात.

८६१ कौटुम्बिक सौख्य : 861. Happiness.

हसिअमविआरमुद्धं, भमिअं विरहिअविलाससच्छाअं ।
भणिअं सहावसरलं, धण्णाण घरे कलत्ताणं ॥ 867 ॥

[हसितमविकारमुग्धं भ्रमितं विरहितविलाससुच्छायम् ।
भणितं स्वभावसरलं धन्यानां गृहे कलत्राणाम् ॥]

ज्या घरांतील स्त्रिया निर्विकारपणें हंसतात, निष्पापपणें हिंडतात, मोकळ्या मनानें बोलतात व अकृत्रिमपणें वागतात तीं कुटुंबें खरोखर धन्य होत.

● छाया दशरूपकावरून. तुझें हंसणें छद्मी आहे, बोलणें बोंचक आहे, वागणें कृत्रिम आहे; तुझें अंतःकरण स्वच्छ नाहीं, तुझा स्वभाव सरळ नाहीं; मग तुझ्यापासून मला सुख कसें लाभणार ?

८६२ आख्यानांतील नायिका : 862. Envy.

पइणा वण्णिज्जन्ते अक्खाणअसुंदरीएँ रूवम्मि ।
ईसामच्छरगरुअं घरिणी हुंकारअं देइ ॥ 868 ॥

पति पत्नीला आख्यान सांगत होता. गोष्टींतल्या नायिकेच्या सौंदर्याचें त्यानें वर्णन केलें तेव्हां त्याच्या पत्नीनें ईर्ष्यामत्सरानें भरलेला हुंकार दिला.

---

१ विचार. २ स्वभावललितम् .

८६३ कुलस्त्रीचा क्रोध : 863. Anger.

वाहिज्जन्ति ण कस्स वि, रोत्तूणं णेअ पाअडिज्जन्ति ।
माणविआरा कुलपालिआएँ हिअए विलोवेन्ति ॥ 869 ॥

कुलस्त्रीचा क्रोध कोणाजवळ बोलून दाखविला जात नाहीं; तो रुदनाच्या रूपांतही प्रकट होत नाहीं; तो तिच्या हृदयांतच विरून जातो.

• ● अपराधी पतीवर क्रुद्ध झालेल्या स्त्रीला सखीचा उपदेश. बोलूं नको, रडूं नको, पतीच्या अपराधाची वाच्यता होईल असें कांहींही करूं नको.

८६४ विरहिणी : 864. Disconsolate.

अहिअं सुण्णाई णिरंजणाई वइरिकरुण्णपुसिआइ ।
विरहुक्कण्ठं कुलपालिआइ साहन्ति अच्छीइं ॥ 870 ॥

तिनें डोळ्यांत अंजन घातलेलें नाहीं. एकान्तांत रडून रडून तिचे डोळे कोरडे झालेले आहेत. सुजलेले आहेत; तिची दृष्टि शून्य आहे. कुलीन विरहिणीची उत्कण्ठा व दुःख ते व्यक्त करतात.

८६५ कुलबालिका : 865. Alibi.

कुलपालिआएँ पेच्छह ! जोव्वणलाअण्णविब्भमविलासा ।
पवसन्ति व्व पवसिए, एन्ति व्व पिए घरं एन्ते ॥ 871 ॥

[कुलबालिकायाः पेक्षध्वं यौवनलावण्यविभ्रमविलासाः ।
प्रवसन्तीव प्रवसिते आगच्छन्तीव प्रिये गृहमागते ॥]

---

१. बालिआए. २. विलाप्यन्ते, विलीयन्ते.

ही कुलीन स्त्री पहा; पति प्रवासाला जातो तेव्हां तिचें यौवन व लावण्य आणि विभ्रम व विलास त्याच्याबरोबर जातात आणि तो घरीं परतला कीं त्याच्याबरोबर परत येतात.

छाया दशरूपकावरून. कुलीनं विरहिणींचे विभ्रम दृष्टीस पडत नाहींत, इतकेंच नव्हे, त्या तरुण व सुंदर आहेत किंवा कसें, याचाही संभ्रम पडतो. वज्जालग्गांतील (क्र. ४६७) पाठ : दुसरी ओळ : सव्वे वि अग्गचलिया पियम्मि कयनिच्छए गन्तुं ॥ सर्वेऽप्यग्रचलिताः प्रिये कृतनिश्चये गन्तुम् ॥

८६६ पतिव्रता :　　866. Tipsy.

पइपुरओ च्चिअ रभसेण चुम्बिओ देवरो अडअणाए ।
मह वअणं मइरागंधिअं ति हाआ तुहं भणइ ॥ 872 ॥

' तुमचे भाऊ म्हणतात कीं माझ्या तोंडाला अजून मद्याचा वास येत आहे. भाऊजी, तुम्हीच वास घेऊन पहा आणि सांगा, ' असें बोलून स्वैरिणीनें आपल्या पतीच्या देखत दीराचें आवेशानें चुंबन घेतलें.

८६७ असती :　　867. Propaganda.

तह अडअणाएँ रुण्णं पइमरणे बाहरुद्धकण्ठीए ।
अणुमरणसंकिणो जह जारस्स वि संकिअं हिअअं ॥ 873 ॥

नवरा मेला तेव्हां असतीनें रुद्ध कण्ठानें एवढा आक्रोश केला कीं या दुःखानें ही मरते कीं काय अशी तिच्या जारालाही धास्ती वाटली.

८६८ थरकांप :　　868. Flutter.

वाणीरकुडंगुड्डीणसउणिकोलाहलं सुणंतीए ।
घरकम्मवावुडाए बहूऍ सीअन्ति अंगाइं ॥ 874 ॥

[वानीरकुञ्जोड्डीनशकुनिकोलाहलं शृण्वन्त्याः ।
गृहकर्मव्यापृताया वध्वाः सीदन्त्यङ्गानि ॥]

घरकामांत व्यग्र असलेल्या वधूनें वेळूच्या कुञ्जांतला पोपटांचा फडफडाट व चीत्कार ऐकला आणि तिचें अंग थरकापलें.

● छाया काव्यप्रकाशावरून. चंद्रालोकावरील राकागम व्याख्येंत व्यञ्जनेचें उदाहरण. साहित्यदर्पणांत सांगितलें आहे: ‘ भ्रातृवधूं प्रति ननान्दुरुपहासच्छलेनोक्तिरियम् । ’ काव्यप्रदीपकार सांगतात: ‘ अत्र दत्तसंकेतः कश्चिल्लतागहनं प्रविष्ट इति व्यङ्ग्यम् । ’ वधूनें वेळूच्या वनांत संकेत दिला होता, पण घरकामामुळें तिला तिकडे जातां आलें नाहीं; प्रियकराच्या चाहुलीमुळें पोपटांनीं केलेला चीत्कार कानीं आला तेव्हां संकेतभङ्गामुळें ती शहारली.

८६९ सासुरवासी : 869. Respite.

णोल्लेइ अणोल्लमणा अत्ता मं घरभरम्मि सअलम्मि ।
खणमेत्तं जइ संझाएँ णवर ण व होइ वीसामो ॥ 875 ॥

[नुदत्यनार्द्रमनाः श्वश्रुर्मां गृहभारे सकले ।
क्षणमात्रं यदि सन्ध्यायां भवति न वा भवति विश्रामः ॥]

दुष्ट सासू दिवसभर माझ्याकडून घरकाम करून घेत असते; क्षणाचीही उसंत मिळत नाहीं. संध्याकाळीं मात्र कधीं थोडा वेळ विश्रांति मिळते न मिळते.

● छाया काव्यप्रकाशावरून. सून शेजारणीशीं बोलत आहे. विषय नेहमीं-चाच, सासुरवासाचा. बोलतां बोलतां संध्याकाळीं संकेत ठरविण्याची सूचना. अलंकाररत्नाकरांत सूक्ष्मालंकाराचें उदाहरण: “ सूक्ष्मार्थस्य सूचनं सूक्ष्मम् । ’

---

१ अणद्द.

८७० माझ्या माहेरीं : 870. Tryst

ठाणे ठाणे वलिआ, वलणे वलणे सवेडसकुडुंगा ।
ण गओ सि अम्ह गामं दिअर ! ण दिट्ठा तुए मुरला ।।876।।

भाउजी, तुम्ही अजून आमच्या गांवीं गेलां नाहीं आणि आमची मुरला नदी पाहिली नाहीं. तिला किती किती वळणें आहेत आणि प्रत्येक वळणाशीं बांबूंचीं बेटें आहेत.

● माझ्याबरोबर चला, तीं सारीं ठिकाणें मी तुम्हांला दाखवीन. अशीं सोईस्कर ठिकाणें तिच्या सासरच्या गांवीं नसावींत; असलीं तरी तीं अद्याप तिला माहीत नसावींत; भाऊजींनीं तरी तीं तिला दाखवावींत कीं नाहीं !

८७१ स्वयंसिद्धा : 871. Ready & Willing.

महुएहि किं व वालंअ ! हरसि णिअंबाहि जइ वि मे सिअं ।
साहामि कस्स रण्णे ? दूरे गामो, अहमेका ।। 877 ।।

[मधुकैः किं वा पान्थ यदि हरसि निवसनं नितम्बात् ।
शास्मि कस्यारण्ये ग्रामः दूरेऽहमेकाकिनी ।।]

वेड्या, माझ्याजवळचीं मधुकाचीं फुलेंच काय नितंबावरलें नेसतें वस्त्र जरी ओढलेंस तरी मी सांगणार कोणाला ! येथून गांव फार दूर आहे आणि येथें मी अगदीं एकटी आहे.

● छाया काव्यानुशासनावरून. साहित्यमीमांसेतील पाठ : मह एहि किंव पन्थअ जइ रहसि णिअस्सणं णिअं वा । ओहो साहेमि कस्सरण्णे गामो दूरं अहं एक्का ।।

१. पथिक. २. निवसनं. ३. हरसि. ४. अरण्यात कसा ... .

८७२ स्वर्गनिर्माण : 872. Heaven in Hell.

कालक्खरदूसिक्खिअ धम्मिअ ! रे णिंबकीडअसरिच्छ ।
दोण्ण वि णिरआणिवासो समअं जइ होई तहि होदु ॥ 878 ॥

[कालाक्षरदुःशिक्षित बालक रे लग मम कण्ठे ।
द्वयोरपि नरकनिवासः समकं यदि भवति तद्भवतु ॥]

हे धार्मिक, तूं दुःशिक्षित आहेस. तूं लिंबावरल्या किड्यासारखा आहेस. काय व्हावयाचें असेल तें होऊं दे; नरकांत जाऊं, पण दोघेंही बरोबर जाऊं.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून. तेथील पाठ थोडा वेगळा आहेः कालाक्खरदुस्सिक्खिअ बालअ रे लग्ग मज्झ कण्ठम्मि । दोण्ह वि णरअणि-वासो समअं जइ होइ ता होउ ॥ गाथाकारांचा तथाकथित धार्मिकांवर व घरकोंबड्यांवर विशेष रोष आहे. भोजदेवाचा टीकाकार जगद्धर सांगतो: बालक, तूं स्वतःला सुशिक्षित म्हणवितोस, पण तूं फक्त अक्षरें गिरविलीं आहेस; तूं शास्त्राचें अध्ययन केलें आहेस, पण तुला ज्ञानाचें रहस्य समजलेलें नाहीं. काय म्हणतोस ? ‘ परस्य दारान्मनसापि नेच्छेत् । ’ तूं सुशिक्षित नाहींस, दुःशिक्षित आहेस. तूं शास्त्रांचें कोरडें अध्ययन केलें आहेस. मी तुला जीवनाचें रहस्य शिकवितें. ये, माझ्या गळ्यांत मिठी घाल, मग तुला शास्त्रवचनांची आठवणही होणार नाहीं. काय होईल ? आपण दोघेंही नरकांत जाऊं ? हरकत नाहीं; तेथेंही आपण स्वर्ग निर्माण करूं !

८७३ खडकाळें : 873. Gathering Clouds.

पंथअ ! ण एत्थ संथरमत्थि मणं पत्थरत्थले गामे ।
उण्णअपओहरे पेक्खिऊण जइ वसइ ता वससु ॥ 879 ॥

[पथिक नात्र संस्तरमस्ति मनाक् प्रस्तरस्थले ग्रामे ।
उन्नतपयोधरं प्रेक्ष्य यदि वससि तद्वस ॥]

पथिका, हें खेडें खडकाळ आहे. तुला झोंपण्यासाठीं येथें बिछाना मिळणार नाहीं; पण आभाळांत ढग जमूं लागले आहेत ते पहा आणि तुला येथें मुक्काम करावयाचा असेल तर रहा बापडा.

● छाया काव्यप्रकाशावरून. स्वयंदूती नायिका. संध्याकाळीं मुक्कामासाठीं जागा शोधणाऱ्या पांथस्थाला उद्देशून असच्चरितेचे उद्गार; खेड्यांतल्या गांवढळांना त्यांचें रहस्य कसें समजणार ! उन्नत पयोधर आभाळांत आहेत, तसेच येथेंही आहेत; मात्र आम्हां गरीबांचे घरीं बिछाना नाहीं; पटत असेल तर पथारी पसरा. वज्जालग्गांतील पाठः कह लब्भइ सत्थरयं (स्वस्थरतं) अम्हाण य पहिय पामरघरम्मि । उन्नयपयोहरे पेछिऊण जइ वससि ता वससु ॥ ४९४ ॥ साहित्यदर्पणांत 'वस्तुरूपशब्दशक्त्युद्भवाचें उदाहरण. काव्यप्रदीपकार सांगतातः "स्वयंदूती 'द्व्यर्थैः पदैः पिशुनयेच्च रहस्यवस्तु' इति कामशास्त्रस्थितिमनुसृत्य पथिकमाह—पन्थिअ इति ।"

८७४ आत्मार्पण : 874. Pitcher.

विहलक्खंणं[1] तुमं सहि ! दट्ठूण कुडेण तरलतरदिट्ठिं ।
वारप्फंसमिहेण[2] अ अप्पा गरुओ त्ति पाडिय विहिण्णो ॥ 880 ॥

[विह्वलां[3] खलां त्वां सखि दृष्ट्वा कुडेन तरलतर दृष्टिम् ।
द्वारस्पर्शमिषेण आत्मा गुरुक इति पातयित्वा विभिन्नः ॥

सखि, श्रमानें तूं व्याकुळ झाली आहेस आणि तुझी नजर भिरभिरत आहे, हें तुझ्या माथ्यावरल्या घड्याच्या लक्षांत आलें. आपण फार जड आहोंत हें जाणून तुझा भार हल्का करण्यासाठीं दाराचा धक्का लागल्याचें निमित्त साधून तो आपण होऊन भग्न झाला.

---

१ विहलंखलं. २. मिसेण. ३. विशृङ्खलां.

● छाया काव्यप्रकाशावरून. योग्य वेळेपूर्वी पाणवठ्यावर तिनें ज्याची वाट पाहिली होती तो घराजवळ कुटमळतांना दिसतांच तिची नजर भिरभिरली, मानेचा तोल गेला व घडा दाराच्या बाहीवर आपटून फुटला. घडा तिच्या माथ्यावर होता, म्हणून त्याला तिच्याहून लांबवरचें दिसत होतें; घरांत खाष्ट सासू असल्यामुळें आत्मार्पणाशिवाय तिला पुन्हां पाणवठ्यावर जाण्याची संधि मिळणार नाहीं हें जाणून तो आपण होऊन कलंडला ! अलंकाररत्नाकरांत अपन्हुति व उद्भेद अलंकाराचें उदाहरण.

८७५ सबब : 875. Voluntary Statement.

अइपिउॅलं[1] जलकुम्भं घेत्तूण समागअम्हि सहि तुरियम् ।
समसेअसलिलणीससणीसहा वीसमामि खणम् ॥ 881 ॥

[अतिपृथुलं[2] जलकुम्भं गृहीत्वा समागताऽस्मि सखि त्वरितम् ।
श्रमस्वेदसलिलनिःश्वासनिःसहा विश्राम्यामि क्षणम् ॥]

सखे, पाण्याचा हा फार मोठा भरला घडा घेऊन मी घाईघाईनें येथवर आलें; या श्रमामुळें मी दमलें आहे; मला घाम आला व धाप लागली आहे. क्षणभर येथेंच बसून मी विश्रांति घेतें.

● छाया काव्यप्रकाशावरून. तूं एवढी घामाघूम कशानें झालीस, हें कांहीं तिला कोणी विचारलें नव्हतें. वाटेंत भेटलेल्या सखीला हें तिनें आपण होऊन सांगितलें आहे; कारण श्रमाच्या सबबीखालीं तिला आपल्या चोरट्या प्रेमव्यवहाराचीं बाह्य चिन्हें लपवायचीं होतीं. या गाथेंत वक्त्रीचें वक्र चारित्र्य व्यङ्ग्य धर्तीनें सूचित केलेलें आहे.

---

1. विउलं. 2. विम्हलं.

८७६ गुप्तप्रेम : 876. Secret Love.

अणुमरणे हसइ जणो, रोत्तुं वि ण लब्भइ जहेच्छं।
ता एत्थ किं करिस्सं चोरिअरमणे विवज्जन्ते ? ॥ 882 ॥

प्रियकर मरण पावला—तरी मला मन मोकळें करून रडतांही येत नाहीं; कारण त्याची माझी प्रीति गुप्त होती; त्याच्या नांवानें मी सती गेलें तर लोक मला हंसतील. मी करूं तरी काय !

८७७ मनकवडे : 877. Telepathy.

मा पुत्ति ! वंकमणिअं जंपेसु पुरओ तुमं छइल्लाणं।
हिअएण जं च मणिअं, तं पि हआसा विआणन्ति ॥ 883 ॥

मुली, या चतुर लोकांसमोर सांकेतिक बोलूं नको. हे इतके हुषार आहेत कीं ते मनांतले विचारही ओळखतात.

● वज्जालग्गांतील पाठ व छाया: मा पुत्ति वङ्कवङ्कं जम्पसु पुरओ छइल्लोयाणं हिअए। जं च निहित्तं तं पि हयासा मुणन्ति सुबुद्धीए ॥ २८२ ॥ मा पुत्रि वक्रवक्रं जल्प पुरतः छेकलोकानां हृदये। यच्च निहितं तदपि हताशा जानन्ति स्वबुद्ध्या ॥

८७८ वक्रोक्ति : 878. Warning.

वंकभणिआइ कत्तो, कत्तो अद्धच्छिपेच्छिअव्वाइ ?।
ऊसासिउं पि ण तीरइ छंउल्लपरिवारिए गामे ॥ 884 ॥

येथें व्यङ्ग्य उक्तीचा काय उपयोग ? येथें अर्धोन्मीलित दृष्टीनें पहावयाचें तरी कसें ! चतुर माणसांनीं भरलेल्या या गांवांत निःश्वासाचीही चोरी.

---

१. चतुर-छइल्लबहुले ग्रामे.

● मैत्रिणीनें विचारलें, येथें आल्यापासून तुला एकदी विरक्ति कशी आली ? या प्रश्नाचें उत्तर.

८७९ पुतळा : 879. Renewal.

तत्थ वि होंति सहीओ पुत्तलि ! मा रुवसु जत्थ दिण्णा सि ।
तत्थ वि णिउंजलीला, तत्थ वि गिरिवाहिणी गोला ॥ 885 ॥

पुतळा तूं रडतेस कशाला ? तुला जेथें दिलेली आहे तेथेंहि तुला मैत्रिणी मिळतील, आणि निकुञ्जांत क्रीडा करतां येईल. डोंगरांतून वाहणारी गोदावरी तेथेंही आहेच.

● प्रथम सासरीं जाणाऱ्या वधूला माहेरगांवच्या मैत्रिणींचें आश्वासन. पुतळा हें विशेषनाम पुत्तलि, पुत्री यावरून आलें असावें.

८८० अधरव्रण : 880. Sore.

कस्स व ण होइ रोसो दट्ठूण पिआऍ सव्वणं अहरम् ।
सभमरकमलग्घाइरि ! वारिअवामे ! सहसु एण्हिं ॥ 886 ॥

[कस्यैव न भवति रोषो दृष्ट्वा प्रियायाः सव्रणमधरम् ।
सभ्रमरपद्माघ्राणशीले वारितवामे सहस्वेदानीम् ॥]

प्रियेच्या अधरावरील व्रण पाहून कोणाला राग येणार नाहीं ? आंत भ्रमर असलेलें कमल तिनें हुंगलें, तेव्हां त्यानें तिच्या ओंठाचा चावा घेतला.

● छाया अलंकाररत्नाकरावरून. शोभाकरमित्रानें व्याजोक्तीचें उदाहरण म्हणून ही गाथा उध्दृत केली आहे. 'उद्भेदप्रच्छादनं व्याजोक्तिः ।' संशय

१ पउमग्घाइणि.

व्यक्त झाला न झाला तोंच समयसूचक सखीला ऐन वेळीं मुग्यांची सबब सुचली.

८८१ आपद्धर्म : 881. In Default.

छप्पत्तिआ वि खज्जइ णिप्पत्ते पुत्ति ! एत्थ को दोसो ? ।
णिअपुरिसे वि रमिज्जइ परपुरिसविवज्जिए गामे ॥ 887 ॥

मुली, दुसरीं पानें मिळत नाहींत तेव्हां षट्पर्णालाही पान मानावें लागतें. त्यांत दोष नाहीं. एकाद्या गांवांत परपुरुष प्राप्त होण्यासारखा नसला तर पतीशीं रममाण होण्यांत कांहीं दोष नाहीं.

● पाइअसद्दमहण्णवांत ' छप्पत्तिआ ' या देशी शब्दाचा अर्थ ' चपाती, रोटी, फुलका ' असा दिलेला आहे. पक्वान्नांचे अभावीं रोजच्या चपातीवर भागाविण्यांत दोष नाहीं, असा अर्थ होऊं शकेल.

८८२ परपुरुष : 882. Presumption.

अमुणिअपरपुरिससुहो जंपउ जं किं पि अण्णओ लोओ ।
णिअपुरिसेहि वि अम्हे परपुरिसो त्ति च्चिअ रमामो ॥ 888 ॥

परपुरुषाचें सुख ज्यांनीं अनुभविलेलें नाहीं त्यांना काय म्हणाव-याचें असेल तें म्हणूं द्या. आम्हांला तर रतिप्रसंगीं पतीलाही परपुरुष कल्पिल्यावांचून समाधान होत नाहीं.

८८३ मंडईत चक्कर : 883. Shopping.

माए ! घरोवअरणं अज्ज खु णत्थि त्ति साहिअं तुमए ।
ता भण किं करणिज्जं ? एमेअ ण वासरो ठाइ ॥ 889 ॥

[मातर्गृहोपकरणमद्य खलु नास्तीति साधितं त्वया ।
तद्भण किं करणीयमेवमेव न वासरः स्थायी ॥]

आई, घरांतलें सामानसुमान संपलें आहे असें तूं म्हणत होतीस ना ? सांग, काय करावयाचें आहे तें लवकर सांग, कारण आतां दिवस फार वेळ राहणार नाहीं.

● छाया काव्यप्रकाशावरून. भाजीपाला, लांकूडफांटा आणावयाच्या निमित्तानें संध्याकाळीं भटकण्यासाठीं मुलीला बाहेर पडावयाचें होतें, त्याकरितां तिनें आज्ञाधारक कामसूपणाचा आविर्भाव धारण केला आहे.

८८४ गोयूथिका : 884. Frenzy.

सच्छंदरमणदंसणसंवड्ढिअगरुअवम्महविलासम् ।
सुविअड्ढवेसविलआ रमिअं को वण्णिउं तरइ ? ॥ 890 ॥

विदग्ध वेश्यांच्या संभोगामुळें होणाऱ्या आनंदाचें वर्णन कोण करूं शकणार ? भोंवतालीं चाललेल्या विलासक्रीडांमुळें त्यांचें रतिकौशल्य अधिकच उत्तेजित होतें.

● एक पुरुष अनेक स्त्रियांशीं क्रीडा करीत आहे, किंवा, सामुदायिक रतीचा प्रसंग आहे, अशा वेळीं सर्वांचें कौशल्य द्विगुणित होतें, असा कामशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. या गाथेतील वर्णन गोयूथिकेचें असावें.

८८५ उच्छृंखल : 885. Profligacy.

सामण्णसुंदरीणं विब्भममावहइ अविणओ च्चेअ ।
धूमो वि ह पज्जालिआणं महुरो होइ सुरामिदारूणं ॥ 891 ॥

1 अविदग्धवेश्यावनिता.

{ सामान्यसुंदरीणां विभ्रममावहत्यविनय एव ।
धूम एव प्रज्वलितानां बहु मतः सुरभिदारूणाम् ॥]

सौंदर्य सामान्य असलें तरी नखरेबाज निर्लज्जपणा भरपूर असला म्हणजे स्त्रिया विशेष आकर्षक दिसतात. चंदनाच्या खोडापेक्षां त्याच्या धुराचाच सुगंध दूरवर दरवळतो.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून. 'सामान्य-सुंदरी' हा प्रयोग वेश्यांना उद्देशून केलेला असावा. निर्लज्ज स्त्रिया कामाग्नीनें चेतल्या म्हणजे बेफाम आविर्भावांमुळें त्यांची आकर्षकता विशेष वृद्धिंगत होते.

८८६ पराशरसूत्र : 886. Aphorisms.

अव्वो ! कालस्स गई, सो वि जुआ सरसकव्वदुल्ललिओ ।
पढइ परासरसई अम्हे वि णिअं पइं गमिमो ॥ 892 ॥

कालाचा महिमा अगाध आहे; पहा : रसभरित काव्यें लिहिणारा हा तरुण आतां पराशरसूत्रांचें अध्ययन करीत आहे आणि आम्ही, आम्ही आमच्या पतींकडे वळत आहोंत.

८८७ मानदेवता : 887. Adoration.

पणमह माणस्स, हला ! चलणे, किं देवएहि अण्णेहिम् ?
जस्स पसाएण पिओ घोलइ पाअन्तपासेसु ॥ 893 ॥

सख्यांनो, मानदेवतेची आराधना करा. काय करावयाच्या आहेत इतर देवता ! या देवतेच्या कृपाप्रसादानें प्रियकर आपल्या पायांशीं लोळण घेत येतो.

१. लोळवा.

८८८ रुसवा : 888. Sulk.

अणुणअपसरं पाअपडनूसवं रभसचुम्बणसुहेल्लिं ।
एआइ अ अण्णाइ अ अवसो व्व कओ फलइ माणो ॥894॥

अनुनयाचा विस्तार, पादवंदनाचा उत्सव, आवेशपूर्ण चुंबनांची सुखद क्रीडा हीं व अशीं अनेक अन्य फळें रुसव्याला येतात; मग तीं अपेक्षित असोत वा नसोत.

८८९ अस्त्र : 889. Infallible.

जइ पुत्तलि ! बहुएहिं अणुणअसोक्खेहि आत्थि दे कज्जं ।
ताव रुअ, गेण्ह माणं, खणमेत्तं तम्मि सुहआम्मि ॥ 895 ॥

मुली, अनुनयामुळें प्राप्त होणाऱ्या बहुविध सुखांची अपेक्षा असेल तर तूं अश्रूंचें अस्त्र काढ, मान धारण कर, म्हणजे तीं तुला क्षणार्धांत प्राप्त होतील.

८९० अपूर्व : 890. Extraordinary.

आणा अणालवंतीएँ कीरए, दीसए पराहुत्तो ।
णिंताम्मि णीससिज्जइ, पुत्ति ! अपुव्वो क्खु दे माणो ॥896॥

प्रियकराशीं तूं बोलत नाहींस, पण त्याच्या मर्जीप्रमाणें वागतेस; तो पराङ्मुख झाला कीं त्याच्याकडे टक लावून पाहतेस आणि तो बाहेर गेला कीं सारखे उसासे टाकतेस. मुली, तुझा रुसवा कांहीं अपूर्वच दिसतो

● अशा अर्धवट उपायांनीं तूं त्याला वठणीवर किंवा शरण आणूं शकणार नाहींस.

८९१ निश्चय : 891. Resolution.

जं जं भणह, सहीओ ! आम करिस्साम सव्वहा तं तं ।
जइ तरइ रुम्भिउं मह धीरं समुहागए तम्मि ॥ 897॥

[यद् भणथ तत् सख्य आम करिष्यामि तत् यथा सर्वम् ।
यदि त्वरध्वं रोद्धुं मे धैर्यं संमुखागते तस्मिन् ॥]

सख्यांनो, तुम्ही जें जें सांगाल तें तें मी करीन; पण प्रियकर समोर आला म्हणजे माझा निश्चय डगमगणार नाहीं असा कांहीं उपाय काढा.

● छाया काव्यानुशासनावरून. अनुमान (प्रश्नादप्युत्तरं यत्र) किंवा परिसंख्या (पृष्टेऽपृष्टे वा अन्यापोहपरोक्तिः) अलंकार.

८९२ मतवाला : 892. Gallant.

अच्छिअइ दिट्ठिणिब्भच्छिओ वि, विहुओ वि लग्गए सिअए ।
पहओ वि चुम्बइ बला, अलज्जए कह णु कुप्पिस्सम् ? ॥899॥

(त्यानें दूर व्हावें म्हणून) त्याच्याकडे रागानें पाहिलें कीं तो उलट माझ्या आणखी जवळ येतो; दूर लोटलें कीं वक्षाला झटूं लागतो; आणि फटकारलें कीं चुम्बनच घेतो. सांग, अशा निर्लज्जावर रागावूं तरी कशी ?

८९३ हिम : 893.Snow.

हिमजोअचुण्णइत्थाओ जस्स दप्पं कुणन्ति राईओ ।
कह तस्स पिअस्स मए तीरइ माणो इला ! काउम् ? ॥899 ॥

सखे, हिंवाळ्यांतल्या रात्रीच्या थंडीमुळें उद्दृट झालेल्या प्रियकरावर मी कशी रुसूं !

● कारण हिंवाळ्यांतल्या रात्री मोठ्या आणि थंडीमुळें अंगांत हुडहुडी भरलेली. वेबर सांगतो, दक्षिणेंत जन्मलेल्या या गाथेंतील 'हिमयोगचूर्ण' हा प्रयोग अगदीं विलक्षण आहे; कारण येथें बर्फ पडत नाहीं. प्राचीन काळीं येथें दाट जंगल होतें, अर्थात् पाऊस व थंडी यांचें प्रमाण अधिक असलेंच पाहिजे. पाण्यावर बर्फाचा तवंग येण्याइतकें कडक हिंव इकडे अलीकडेही अधून मधून पडतें.

८९४ गेंडा : 894. Rhino.

किं भणह मं, सहीओ ! करेहि माणं ति, किं थ माणेण ? ।
सब्भावबाहिरे तम्मि मज्झ माणेण वि ण कज्जम् ।। 900 ।।

सख्यांनों, काय सांगतां काय ! मी ! आणि त्याच्यावर रुसूं ! आणखी रुसण्याचा उपयोग काय ! त्याच्या अंगीं सद्भाव नाहीं आणि रसिकताही नाहीं. अशावर रुसायचें कसें ! आणि कशासाठीं !

८९५ विसंगति : 895. Absurd.

जइआ पिओ ण दीसइ भणह हला ! कस्स कीरए माणो ? ।
अह दिट्ठम्मि वि माणो ? ता तस्स पिअत्तणं कत्तो ? ।। 901 ।।

[यदा प्रियो न दृश्यते भणत हला कस्य क्रियते मानः ।
अथ दृष्टेऽपि मानस्तत्तस्य प्रियत्वं कुतः]

सखे, प्रियकर दृष्टीसमोर नसतो तेव्हां कोणावर रुसायचें ! आणि तो दृष्टिसमोर असतो तेव्हां त्याच्यावर कसें रुसायचें ! आणि अशा वेळीं रुसायचें तर तो प्रियकर कसला !

● छाया सरस्वतीकंठाभरणावरून.

८९६ माज्ञा : 896. Accused.

जाणिमि कआवराइं, जाणिमि अलिआइ् भणइ सअलाइ् ।
अणुणेंते उण जाणे कआवराई व अप्पाणं ॥ 902 ॥

तो अपराधी आहे, हें मला माहीत आहे. (आपण निर्दोषी आहोंत, असें) तो सांगतो, तें खोटें आहे, हेंही मला ठाऊक आहे. पण तो माझें सांत्वन करूं लागतो, तेव्हां मात्र वाटूं लागतें कीं खरी अपराधी मीच आहे.

८९७ सराईत गुन्हेगार : 897. Habitual Offender.

अवराहसहस्साइं मरिमो हिअएण तम्मि अंद्दिट्ठे ।
दिट्ठम्मि उण, पिअसही ! एक्कं पि हु णं ण संभरिमो ॥903॥

तो समोर नसतो तोंपर्यंत त्याचे सहस्रावधि अपराध माझ्या मनांत थैमान घालीत असतात. पण त्याची माझी दृष्टभेट झाली कीं त्या अनंत अपराधांपैकीं एकही मला आठवत नाहीं.

१. अद्दंसण.

८९८ सान्निध्य : 898. Freedom of Speech.

भण भण जं जं पडिहाइ तुज्झ, तं तं सहामिमो अम्हे ।
असहत्तणं च जीअं च वल्लभे दोइ ण घडंति ॥ 904 ॥

बोल, बोल, काय वाटेल तें बोल तें; सारें आम्ही सहन करूं. सहनशीलतेचा अभाव आणि प्रियकराचें सान्निध्य यांचा सहवास अशक्य आहे.

८९९ परकायाप्रवेश : 899. Transmigration.

एअं[1] चिअ मह णामं? भण भण दे सुहअ ! किं विलक्खो सि ? ।
पडिहाइ जं ण तुज्झ वि, ममं पि किं तेण णामेण ॥ 905 ॥

अस्सें, हें माझें नाव आहे काय? बोल, बोल; कां ? गोंधळलास सा ? सुभग, माझें नांव तुला आवडत नसलें तर मलाही त्याचा त्याग करतां येईल.

● गोत्रस्खलन. त्यानें तिला भलत्याच नांवानें हांक मारली. तें लक्षांत आलेंच नाहीं अशी बतावणी करून तिनें आश्वासन दिलें कीं तूं तुझ्या आवडीचें नांव मला ठेवलेंस, तें मलाही फार आवडलें. एवढ्यानें तुझें समाधान होईल ना ? सहनशील, वासवदत्तेहून सहनशील.

९०० धुंदी : 900. Stupor.

सुहअ ! मुहुत्तं सुप्पउ, जं ते पडिहाइ तं पि भण्णिहिसि ।
अज्ज ण पेच्छंति तुहं णिद्दागरुआइ अच्छीइ ॥ 906 ॥

सुभग, जागरणामुळें डोळे जड झालेले असल्यामुळें तुला अजून नीट दिसत नाहीं आणि धड बोलतांही येत नाहीं. आणखी थोडी झोंप घे आणि मग जें बरें दिसेल तें बोल.

---

१ एअ चिअ एम छो ?

९०१ प्रतिकार :　　**901. Retaliation.**

मा वेलवेसु बहुअं पुत्तअ ! अलिएहि गोत्तेहि ।
एसा वि जाणइ च्चिअ परिहासुम्मिस्सभणिआइं ॥907॥

मुला, तूं तुझ्या पत्नीला भलत्याच नांवानें हांक मारीत आहेस. तिला अशी चिडवूं नकोस. तुझी चेष्टा करण्याइतकी बुद्धि तिलाही आहे

● खरा प्रकार आईनें ओळखला होता, पण ही सारी चेष्टामस्करी चाललेली आहे अशी आपली समजूत झाली असल्याची बतावणी करून या अनुचित प्रसंगाला ती वेगळें वळण लावण्याचा प्रयत्न करीत आहे.

९०२ चण्डिका :　　**902. Fury.**

अइ चण्डि ! किं ण पेच्छसि ? जइ सो वाहरइ अण्णगोत्तेण ।
अह दे इच्छइ मच्छरपणाच्चिअच्छं मुहं दट्ठुं ॥ 908 ॥

हे चंडिके, मत्सरानें ग्रस्त झालेल्या व गरगर फिरणाऱ्या डोळ्यांमुळें तुझ्या मुखाला येणारी शोभा पाहण्याच्या इच्छेनें त्यानें तुला मुद्दाम दुसऱ्याच नांवानें संबोधिलें, हें तुला कसें कळत नाहीं !

९०३ टकमक :　　**903. Gaze.**

वेआरिज्जसि, मुद्धे ! गोत्तक्खलिएहि मा खु तं रुवसु ।
किं व ण पेच्छइ अण्णइ एद्दहमेत्तेहि अच्छीहिं ॥ 909 ॥

वेडे, त्यानें तुला अन्य नांवानें हांक मारली म्हणून एवढें का रडावयाचें ! तो डोळे विस्फारून तुझ्याकडे टकमक पहात आहे, तें तुला दिसलें नाहीं का !

९०४ मंचक : 904. Couch.

सोत्तुं सुहं ण लब्भइ, अव्वो पेम्मस्स वंकविसमस्स ! ।
दुग्घाडिअमंचअस्स व खणे खणे पाअपडणेण ॥ 910 ॥

प्रेमाची गति वक्र आणि विषम असते. तो (माझी मनधरणी करण्या-साठीं) क्षणोक्षणीं व जागोजाग माझ्या पायां पडला, यामुळें मंचकावरील शय्या (प्रेमाच्या मार्गाप्रमाणें) उंचसखल झाली. यामुळें दोन घटका सुखानें झोंप घेईन म्हटलें तर तें कांहीं जमत नाहीं.

९०५ विन्मुख : 905. Confusion.

एक्कसअणम्मि सुमुही विमुही गरुएण माणबंधेण ।
सिविणकलहम्मि होंती परम्मुही सम्मुही जाआ ॥ 911 ॥

आम्ही दोघें एकाच आंथरुणावर झोंपलों होतों; पण सुमुखि माझ्यावर खूप रागावलेली असल्यामुळें माझ्याकडे पाठ करून झोंपली होती. नंतर स्वप्नांतही ती माझ्याशीं भांडली; त्यावेळीं तिनें पुन्हां कुशी पालटल्यामुळें ती विन्मुख होती, ती आयतीच सन्मुख झाली !

● आणि मग ! मग काय विचारतां ! स्वप्नांतही मी तुमच्याशीं भांडलें व त्यामुळें तोंड फिरवलें हें जागी झाल्यावर तिनेंच त्याला सांगितलें असलें पाहिजे !

९०६ संस्तव ः　　906. Habit.

वड्डउ ता तुह गव्वो, भण्णेसि रे जह विहंडणं वअणं ।
सच्चं ण एइ णिद्दा तुह विणा, देहि ओआसं ॥ 912 ॥

वाढूं दे, तुझा उद्धटपणा आमखी वाढूं दे. बोल, मनाला येईल तें बोल. पण हें पहा, तूं शेजारीं असल्याशिवाय मला झोंपच येत नाहीं; तुझ्या बिछान्यावर मला थोडीशी जागा दे.

९०७ अंकुर ः　　907. Germination.

कअविच्छेओ सहिभंगिभणिअसब्भाविआवराहाए ।
झडि आपल्लवइ पुणो णअणकवोलेसु कोवतरू ॥ 913 ॥

तिच्या सखीनें तुझा अपराध तिला अलंकारिक भाषेंत सांगितला, तरी तिला त्याची स्पष्ट जाणीव झाली. तिच्या रागाचा वृक्ष उन्मळून पडला होता, त्याला एकाएकीं नवे अंकुर फुटले आणि तिचा क्रोध तिच्या नेत्रांत व गालांवर व्यक्त झाला.

९०८ अश्रुसिंचन ः　　908. Rejuvenation.

उम्मूलन्ति व हिअअं अणुणिज्जंतीओ माणवंतीओ ।
संभरिअमण्णुणिब्भरबाहभरोत्थंभिअमुहीओ ॥ 914 ॥

मानिनीचा अनुनय केला जात असतांना प्रियकराच्या अपराधांच्या आठवणीमुळें तिच्या डोळ्यांतून अश्रु वहात आहेत आणि त्यांच्या सिंचनामुळें तिच्या हृदयांतील प्रीतीला नवे अंकुर फुटत आहेत.

---

१. इण्णसि.

९०९ बोभाटा : 909. Notoriety.

ण वि तह तक्खणसुअमण्णुदुक्खविअणाओ वि रुवंति ।
जह दिट्ठम्मि पिअअमे अणुणिज्जंतीओ तरुणीओ ॥ 915 ॥

प्रियकराच्या दुर्वर्तनाचा बोभाटा कानीं येतो त्यावेळीं होतें त्याहून अधिक दुःख त्यानंतर तो दृष्टीस पडतो व अनुनय करूं लागतो तेव्हां स्त्रियांना होतें आणि त्याची चीड येते.

● कारण त्यावेळीं त्यांना त्याच्या खोटेपणाचा प्रत्यय येतो आणि आपल्या जीवनाच्या वैफल्याची जाणीव होते.

९१० लत्ताप्रहार : 910. Kick.

हिअए रोसुक्खित्तं पाअपहारं सिरेण पत्थंतो ।
ण हओ दइओ माणंसिणीए, थोरंसुअं रुण्णं ॥ 916 ॥

[हृदये रोषोद्गीर्णं पादप्रहारं शिरसि प्रार्थयमानः ।
तथैवेति प्रियो मनस्विन्या स्थूलाश्रु रुदितं ॥]

(ती त्याच्यावर इतकी चिडली होती कीं) मनांतल्या मनांत तिनें त्याचें मस्तक लाथेच्या ठोकरीनें आमाळांत उडविलें होतें; पण प्रियकरानें तिच्या पायांवर डोकें ठेवून प्रत्यक्ष लत्ताप्रहाराची याचना केली तेव्हां तिनें तें ठोकरलें नाहीं किंवा दूर लोटलें नाहीं; एवढेंच नव्हे, तर तिच्या डोळ्यांतून टपोरे अश्रु ओघळूं लागले

● छाया वज्जालग्गावरून.

---

१. रोसुग्घुण्णं.

९११ मदिराचषक : 911. Wine-Glass.

पिअअमविइण्णचसअं अचक्खिअं पिअसहीएँ देंतीए ।
अभणंतीएँ वि माणंसिणीएँ कहिओ च्चिअ विरोहो ॥ 917 ॥

चषकांतील मदिरेचा आस्वाद घेण्यापूर्वीच प्रियकरानें तो प्रियसखीच्या हातीं दिला; तेव्हां मानिनी एक शब्दही बोलली नाहीं आणि केवळ मौनानें तिनें त्याच्या अनुनयाला असलेला आपला विरोध प्रकट केला.

● तिच्या हातीं चषक देतांना तोही कांहीं बोलला नव्हता, पण या कृतीनें त्यानें तिला विनंति केली कीं पहिला घोंट तूं घे, नंतर मी घेईन; तिला तें मानवलें नाहीं.

९१२ लभ्यांश : 912. Recompense.

वच्चिहिइ सो घरं से, लहिहिइ ओआसमेहिइ सआसं ।
भणिहिइ जं भणिअव्वं, पच्चुत्तं किं णु पाविहिइ ? ॥ 918 ॥

ती त्याच्या घरीं जाईल, संधि साधील आणि जें कांहीं सांगावयाचें आहे तें सांगेल; तिला प्रत्युत्तर काय मिळेल बरें ?

९१३ चंद्रकला : 913. Waning Moon.

तणुआइआ वराई दिअहे दिअहे मिअंकलेहे व्व ।
बहलपओसेण तुए णिसंस ! अंधारिअमुहेण ॥ 919 ॥

निर्दया, तुझ्या मनांत तिच्याविषयीं गाढ द्वेष भरलेला आहे आणि ती सन्निध असतांना तुझें मुख काळवंडलेलें असतें. हें पाहून बिचारी दिवसानुदिवस (कृष्णपक्षींच्या) चंद्रकलेप्रमाणें झुरत आहे.

९१४ विशालाक्षि : 914. Phase.

दावंतेण तुह मुहं भुमआभंगम्मि होन्त णवसोहं ।
अकएण उवकअं अज्ज मणुआ मज्झ, पसिअच्छि ॥ 920 ॥

तूं आज माझ्यावर निष्कारण रागावलीस, पण त्यामुळें मला एक अनपेक्षित लाभ झाला. हे विशालाक्षि, क्रोधाविष्ट झाल्यामुळें तूं भृकुटिभङ्गानें सज्ज असा दृष्टिक्षेप केलास तेव्हां मला एक अभिनव आकर्षक अशी शोभा दिसली.

९१५ भृकुटिभंग : 915. Pose.

भिउडी ण कआ, कडुअं ण लविअं, अहरअं ण पज्जुट्ठं ।
उवऊहिआ ण रुण्णा - एएणवि जाणिमो माणं ॥ 921 ॥

मीं तिला आलिंगिलें, तेव्हां तिनें भुंवई' चढविली नाहीं, कटु वचनें केलीं नाहींत, ओंठ उडवले नाहींत किंवा अश्रु ढाळले नाहींत. यावरूनच मीं ओळखलें कीं ती रुसली आहे.

९१६ अबोली : 916. Dumb.

किं पि ण जंपसि कामं, भणिअं च करेसि तं तहा तुरिअं ।
हिअअं रोसुग्घेअं ति तुज्झ विणओ च्चिअ कहेइ ॥ 922 ॥

कामाशिवाय बोलत नाहींस व सांगितलेलें काम त्वरित करतेस. तुझा हा विनयच सांगतो कीं तुझ्या हृदयांतला क्रोध अद्याप नष्ट झालेला नाहीं.

९१७ हा राग सोड, सोड : 917. Displeased.

परिपुच्छिआ ण जंपसि, चुंबिज्जंती बला मुहं हरसि ।
परिहासमाणविमुहे ! पसिअच्छि ! मणं म्ह दूमेसि ॥ 923 ॥

कांहीं विचारलें तर तूं बोलत नाहींस, बलात्कारानें चुंबन घेतलें तर ओंठ चुकवतेस. हे विशालाक्षि, रुसण्यामुळें तूं विन्मुख झाली आहेस आणि यामुळें आम्हांला पीडा होत आहे.

९१८ यौवन : 918. Passing Show.

अइ पीणत्थण उत्थंभिआणणे ! सुअणु सुणसु मह वअणं ।
अथिरम्मि जुज्जइ ण जोव्वणम्मि माणो पिए काउं ॥ 924 ॥

हे सुतनु, पीनस्तनी, उन्मुखि, माझें वचन ऐक. तारुण्य अस्थिर आहे, म्हणून प्रियकरावर रुसणें योग्य नाहीं.

९१९ शिशिरयामिनी : 919. Long Nights.

तरलच्छि ! चंदवअणे ! थोरथ्थणि ! करिअरोरु ! तणुमज्झे ! ।
दीहा ण समप्पई सिसिरजामिणी, कह णु दे माणो ॥ 925 ॥

तुझें मुख चंद्रासारखें आहे, कटि सूक्ष्म आहे आणि मांड्या हत्तीच्या सोंडेसारख्या आहेत. तुझे स्तन थोर आहेत. हिंवाळ्यांतल्या दीर्घ रात्री अद्याप संपलेल्या नाहींत. तूं मान कां सोडीत नाहींस !

---

१. उच्छिआ, उक्खिआ. २. प्रसृताक्षि.

९२० भुजंग : 920. Cobra.

सुहआ वि सुंदरी वि हु तरुणी वि हु माणिणि त्ति आ पुत्ति !।
चंदणलेहि व्व हुअंगदूमिआ किं णु दूमेसि ॥ 926 ॥

तूं तरुण आहेस, सुंदर आहेस, तुझें वय सुखोपभोगांचें आहे. चंदनाच्या झाडाभोंवतीं भुजंगाचा विळखा असावा तसा तुझ्या ठायीं मानानें प्रवेश केला आहे. तूं मान धारण करून आमचा छळ कां करतेस ?

९२१ सफल : 921. What Else ?

पडिवक्खस्स वि पुरओ समुहं भणिआ सि तेण : पसिअ त्ति ।
अवलंबिअस्स माणिणि ! माणस्स अ किं फलं अण्णं ॥ 927 ॥

सवतींच्या देखत त्यानें ' प्रसन्न हो ' म्हणून तुझी प्रार्थना केली. मानिनि, मानधारणापासून तुला आणखी कोणत्या फलाची अपेक्षा आहे ?

९२२ उमाळा : 922. Masquerade.

कोट्टसि चलिअवलए हत्थे, मुंचेसि अहमुही बाहम् ।
पडिरुंभसि णीसासे, बहुअं ते माणविण्णाणम् ॥ 928 ॥

तूं मान खालीं घालून अश्रु ढाळीत आहेस, हुंदके दाबून टाकीत आहेस; तुझ्या हातांतलीं कंकणें गळून पडत आहेत. तूं रुसली आहेस— आणि हें लपविण्याचा तूं कितीही प्रयत्न केलास तरी तो व्यर्थ आहे.

---

१. लतेव. २. तापिता. ३. ढक्कोसि, ढंकेसि. ४. प्रतिरुणत्सि.

९२३ अवडंबर : 923. Ostentation.

कज्जं विणा वि कअमाणडंबरा पुलअभिण्णसव्वंगी ।
उज्जल्लालिंगणसोक्खलालसा पुत्ति ! मुणिआ सि ॥929॥

मुली, तूं हें रुसल्याचें अवडंबर कां मांडलें आहेस ? पहा, तुझें शरीर रोमांचांनीं पुलकित झालेलें आहे आणि तुला आलिंगनसुखाची तीव्र इच्छा झालेली आहे असें स्पष्ट दिसत आहे.

९२४ स्वप्नांतही अप्राप्य : 924. Misfortune.

हंहो ! किं व ण दिट्ठं हला ! मए जीविअं धरन्तीए ।
सो मं अणुणेइ पिओ अहं पि अणुणिज्जिमि हआसा ॥930॥

सखि, मी दुर्दैवी; मी जीव धरून राहिलें आहे आणि मी काय काय पाहिलें नाहीं ! प्रियकर माझा अनुनय करीत आहे आणि मी अनुनय करून घेत आहे !

● विरहजन्य निद्रानाशामुळें हें सुख मला आतां स्वप्नांतही मिळत नाहीं.

९२५ बहुवल्लभ : 925. Competition.

तो सोक्खं, ताव रई, ता रणरणअस्स ण त्थि ओआसो ।
जा दुक्खेक्कणिहाणे ण होइ बहुवल्लहे पेम्मं ॥ 931 ॥

ज्याला पुष्कळ प्रियकरणी आहेत अशा वल्लभावर जोंवर आपलें प्रेम जडलेलें नाहीं तोंवरच आनंद व सौख्य हीं प्राप्त होतात आणि हळहळीला अवसर मिळत नाहीं. बहुवल्लभांवर प्रेम हें दुःखाचें भाण्डार !

९२६ अंतर्ज्ञानी : 926. Mediation.

माणद्धरिएहि गंतुं ण तीरए, सो ण एइ अवराही ।
को वि अपत्थिअहिअअण्णो वेज्जं मंतं व आणेज्ज ॥ 932 ॥

मी मान धारण केलेला असल्यामुळें मनधरणी करण्याकरितां प्रिय-कराकडे जाऊं शकत नाहीं आणि तो अपराधी असल्यामुळें आपण होऊन इकडे येत नाहीं; मनकामना जाणण्याचें अंतर्ज्ञान असलेला कोणी त्याला इकडे आणील काय ?

● अर्थ नीट लागत नाहीं.

९२७ स्फटिकपात्र : 927. Crystal Glass.

उव्वहइ दइअगहिआहरोट्ठझिज्जंतकोवगअराअं ।
पाणोसरन्तमइरं व फलिह[1]चसअं मुहं बाला ॥ 933 ॥

तरुणीच्या मुखावरील रागाची लाली ओसरली आहे – कारण प्रिय-करानें तिचा अधर धरून जणुं स्फटिकपात्रांतली आरक्त मदिरा पिऊन टाकली आहे !

९२८ आवेश : 928. Assault.

गाढालिंगणरहसुज्जुअम्मि दइए लहुं समोसरइ ।
माणंसिणीएँ माणो पेल्लण[2]भीओ व्व हिअआहि ॥ 934 ॥

[गाढालिङ्गनरभसोद्यते दयिते लघु समुपसरति ।
मनस्विन्या मानः पीडनभीत इव हृदयात् ॥]

---

१. स्फटिक. २. पीलनभीतम्.

प्रियेला गाढ आलिंगन देण्यासाठीं प्रियकर आवेशानें सरसावला तेव्हां जणूं चेंगरून जाण्याच्या भातीनें प्रियेच्या हृदयांतील मान एकाएकीं ओसरला.

● छाया काव्यप्रकाशावरून. उत्प्रेक्षेचें उदाहरण.

९२९ मानपर्वत : 929 Thunderbolt

तुङ्गो थिरो विसालो जो सहि ! मे माणपव्वओ रइओ ।
सो दइअदिट्ठिवज्जासणीऍ घाए वि ण पहुंतो ।। 935 ।।

तुङ्गः स्थिरो विशालो यो रचितो मानपर्वतस्तस्या ।
स दयि दृष्टिवज्राशनेर्घातमेव न प्राप्तः ।।

सखि; उंच, स्थिर व विशाल असा मानाचा पर्वत मी उभारला आहे खरा, पण प्रियकराच्या एका दृष्टिक्षेपाच्या वज्रपातानें त्याचें चूर्ण होऊन जाईल.

● छाया वज्जालग्गावरून.

९३० चलविचल : 930. Agitation.

सहि ! विरइऊण माणस्स मज्झ धीरत्तणेण ओआसं ।
पिअअमदंसणविहंलक्खणम्मि सहसे त्ति तेण ओसरिअं ।। 936 ।।

[सखि विरचय्य मानस्य मम धीरत्वेनावकाशम् ।
प्रियदर्शनविश्रृंह्खलक्षणे सहसैव तेनापसृतम् ।।]

---

१. आसासम्. २. विहलंखलक्खणम्मि. ३. विम्हलक्षणे.

सखि, मी मोठ्या धीरानें मान धारण केला होता, पण प्रियकराचें दर्शन झालें तेव्हां एवढी चलबिचल झाली कीं माझा मान एकाएकीं ओसरला.

● छाया काव्यप्रकाशावरून. उत्प्रेक्षा वा विभावना.

९३१ श्यामः — 931. Wounds and Scars.

णहमुहपसाहिअंगो णिद्दाघुम्मंतलोअणो ण तहा ।
जह णिव्वणाहरो सामलंग ! दूमेसि मह हिअअं ॥ 937 ॥

[**नखमुखप्रसाधिताङ्गो निद्राघूर्णल्लोचनो न तथा ।**
यथा निर्व्रणाधरः श्यामलाङ्ग दूनयसि मम हृदयम् ॥]

हे श्याम, तुझ्या अंगावरील नखक्षतांचें प्रसाधन किंवा जागरणामुळें घुमणारे तुझे लोचन पाहून माझें मन व्यथित होत नाहीं; पण तुझ्या ओंठावर व्रण नाहीं असें दिसलें कीं माझें हृदय विदीर्ण होतें.

● छाया काव्यानुशासनावरून. कोणावरही कां होईना, जोंवर तूं प्रेम करीत आहेस, तोंवर तुला पुन्हां प्राप्त करून घेण्याची मला आशा वाटते. माझ्या मनांत मत्सर नाहीं, आशा आहे, धीर आहे. तूं विरक्त झालास तर मात्र माझा धीर तग धरणार नाहीं.

९३२ प्रतिबिंबः — 932. Replica.

पच्चक्खमंतुकारअ ! जइ चुंबसि मे इमे हअकवोले ।
ता मज्झ पिअसहीए विसेसओ कीस तण्हाओ ? ॥ 938 ॥

---

१. मुह.

निर्लज्जा, तुझा अपराध प्रत्यक्षपणें माझ्या प्रत्ययास आला आहे. इकडे तूं माझ्या दुर्दैवी गालाचें चुंबन घेतलेंस आणि तिकडे माझ्या प्रिय सखीचे गाल ओले झाले; तुमचें एकांमेकांवर प्रेम नसते तर असें कां होतें !

● नायिकेच्या आरसपानी गालावर पलीकडे उभ्या असलेल्या सखीच्या मुखाचें प्रतिबिंब उमटलें होतें, त्याचें तो चुंबन घेत होता. नायकाचें धाष्ट्य विदग्ध सखीच्या ध्यानांत आलें तेव्हां ती घामाघूम झाली आणि तिची ही अवस्था दृष्टोत्पत्तीस आली तेव्हां नायिका मत्सरग्रस्त झाली.

९३३ गाल : 933. Cheek.

तइआ मह गंडत्थलणिमिअं दिट्ठिं ण णेसि अण्णत्तो ।
एण्हिं स च्चेअ अहं ते अ कवोला ण सा दिट्ठी ॥ 939 ॥

[तदा मम गण्डस्थलनिमग्नां दृष्टिं न नयस्यन्यत्र ।
इदानीं सैवाऽहं तौ च कपोलौ न सा दृष्टिः ॥]

तेव्हां तुझी अनिमिष नजर माझ्या गालावर एकाग्र झाली होती. आतां मी तीच आहे आणि माझे गालही तेच आहेत, पण त्यांकडे तुझी दृष्टि वळत ही नाहीं.

● छाया काव्यप्रकाशावरून. त्याची नजर तेव्हां हिच्या गालावर एकाग्र झाली होती कारण त्यावेळीं त्यांवर तिच्या सखीचें प्रतिबिंब उमटलें होतें. बिंब अप्राप्य असलें म्हणजे प्रतिबिंबावर तहान भागवावी लागते. आतां प्रतिबिंबही नव्हतें, म्हणून ही अनासक्ति.

९३४ पर्यवसान : 934. Sequence.

ताणँ गुणग्गहणाणं ताणुक्कंठाणँ तस्स पेम्मस्स ।
ताणँ भणिआणँ सुंदर ! एरिसअं जाअमवसाणं ॥ 940 ॥

[तेषां गुणग्रहणानां तासामुत्कण्ठानां तस्य प्रेम्णः ।
तेषां भणितानां सुन्दर ईदृशं पर्यवसानम् ॥]

तें गुणग्रहण, ती उत्कण्ठा, ती प्रीति आणि तीं वचनें – हे सुंदर, त्या सर्वांचें पर्यवसान हें असें झालें !

● छाया काव्यप्रकाशावरून.

९३५ मनधरणी : 935. Propitiation.

अलिअकुविअं पि कअमंतुअं व मं जेसु सुहअ ! अणुणेंतो ।
ताण दिअहाण हरसे रुआमि, ण उणो अहं कुविआ ॥ 941 ॥

पूर्वी मी रुसण्याचें ढोंग करीत असें, माझा रुसवा खरा नाहीं हें माहीत असूनही तूं जीव तोडून माझा अनुनय करीत असस आणि मी मान सोडीत नसे; त्या दिवसांची आठवण होऊन मला रडूं येत आहे. प्रियकरा, आतां तूं राग सोड आणि माझ्याकडे परत ये.

● तुझ्या अपराधामुळें मी आतां तुझ्यावर खरोखरीच रागावलें आहे, तरीहि मीच तुझी मनधरणी करीत आहे. प्रियकरा, तूं कितीही अपराध केलेस तरी मी तुझ्यावर रागावणार नाहीं किंवा कोणत्याही निमित्तानें रुसणार नाहीं; तूं माझा त्याग करूं नको म्हणजे झालें.

९३६ अपराध : 936. Offence.

आम, तुह णावराहो, पिअअम ! मे लोअणाण इह दोसो ।
माणासहम्मि बहुलेहि वासिओ जेहि हिअअम्मि ॥ 942 ॥

१. भणितानाम् सुंदर ईदृश एव अवसानः ।

प्रियतम, तुझा कांहींही अपराध नाहीं; अपराध माझ्या डोळ्यांचा, कीं त्यांनीं मान माहीत नसलेल्या माझ्या हृदयांत तुझ्यासारख्या चंचल वृत्तीच्या व्यक्तीला प्रवेश करूं दिला. दुर्दैव माझें कीं तुझ्यावर माझें प्रेम आहे.

९३७ अबोल : 937. Grievance.

को सुहअ ! तुज्झ दोसो ? हअहिअअं णिट्ठुरं मज्झ ।
पेच्छसि अणिमिसणअणो जंपसि विणअं ण जंपसे पिट्ठं ॥943॥

सुभग, तुझा काय दोष ? माझेंच दुष्ट हृदय निष्ठुर आहे. तूं अनिमिष नजरेनें पाहतोस, विनयानें बोलतोस; पण कांहीं विचारलें कीं त्याबद्दल मात्र बोलत नाहींस.

९३८ नाटक : 938. Histrionics.

वच्च ! मह च्चिअ एक्काएँ होंतु णीसासरोइअव्वाइं ।
मा तुज्झ वि तीएँ विणा दक्खिण्णहअस्स जज्जंतु ॥ 944 ॥
[व्रज ममैवैकस्य भवन्तु निःश्वासरोदितव्यानि ।
मा तवापि तया विना दाक्षिण्यहतस्य जनिषत ॥]

माझे अश्रू व हुंदके माझ्या स्वतःच्यासाठींच आहेत; ते माझ्यापुरतेच राहूं द्या. तुम्ही जा, मन मानेल तिकडे जा; मला औपचारिक दाक्षिण्याची जरूर नाहीं.

● छाया ध्वन्यालोकावरून. गोत्रस्खलनामुळें शाठ्य व्यक्त झालेल्या नायकाची खण्डितेकडून निर्भर्त्सना. अलंकाररत्नाकरांत विध्याभासाचें उदाहरण: ' अनिष्टविधानं विध्याभासः ।

९३९ विट : 939. Pimp.

अणुवत्तंतो अम्हारिसं जणं आहिजाईए ।
चिंतेसि उणो हिअए अणाहिजाई सुहं जअइ ॥ 945 ॥

छातीवर हात ठेवून सांग, असेंच आहे कीं नाहीं ! वैदग्ध्याचा आव आणून आमच्यासारख्यांच्या व्यवसायाचा तूं चांगला फायदा घेत असल्यामुळें स्वतः संपन्न नाहींस तरी तुला जीवनाची चिंता नाहीं.

९४० ललाट-लेख : 940. Finger Prints.

हुं ! निल्लज्ज ! समोसर ! तं चिअ अणुणेसु, जीएँ दे एअं ।
पाअंगुट्ठालत्तअरसेण तिलअं विणिम्मविअं ॥ 946 ॥

[हुं निर्लज्ज समपसर तामेवानुनय यस्यास्त एतत् ।
पादाग्राङ्गुष्ठालक्तकेन तिलकं विनिर्मितम् ॥]

हुंः, निर्लज्जा, बस कर. जिच्या पादांगुष्ठावरील आळित्याच्या स्पर्शानें तुझ्या ललाटावर हा तिलक उमटला तिचाच अनुनय कर.

● छाया सरस्वतीकण्ठाभरणावरून. ईर्ष्येचें उदाहरणः 'ईर्ष्यामाहुः समानेषु मानदानाद्यमर्षणम् ॥' आळित्याच्या छटेवरून तिनें त्याच्या अपराधाप्रमाणेंच त्याचें रहस्यही ओळखलें कीं काय !

९४१. ती, ती, ती : 941. Favouritism.

सा वसइ तुज्झ हिअए, स च्चिअ अच्छीसु, सा अ सिविणेसु ।
अम्हारिसाण सुंदर ! ओआसो कत्थ पावाण ? ॥ 947 ॥

१. अनाभिजात्या सुखं जीयते. २. स्वप्नेषु.

[सा वसति तव हृदये सैवाक्ष्णोः सैव वचनेषु ।
अस्मादृशीनां सुन्दर अवकाश : कुत्र पापानाम् ॥]

ती तुझ्या हृदयांत ठाण मांडून बसली आहे. तुझ्या डोळ्यांत तीच दिसते. तुझ्या बोलण्यांतही वारंवार तिचाच उल्लेख येतो. स्वप्नांतही तुझ्याबरोबर तीच असते. हे सुंदर, सांग आमच्यासारख्या पापिणींना कोठें जागा आहे ?

● छाया काव्यप्रकाशावरून. काव्यप्रकाशांत व काव्यप्रदीपांत विशेष अलंकाराचें उदाहरण. अलंकाररत्नाकरांतील व्याख्या : 'अनाधारमाधेयमेकमनेक गोचरं सम्भाविताद्धिकस्य विरुद्धस्य वा सम्पत्तिश्च विशेषः ।'

९४२ सुशिष्या : 942. Pupil.

तण्हा मे तुज्झ पिअत्तणस्स, कह तं ति णो हि जाणामो ।
दे सुहअ ! तुमं चिअ सिक्खवेसु जह दे पिआ होमि ॥ 948 ॥

हे सुभग—तुझें प्रेम संपादन करण्याची माझी इच्छा आहे, पण तें कसें मिळवावें तें मला कळत नाहीं. प्रियकरा, मी तुझी प्रिया कशी होऊं शकेन तें तूंच मला शिकव.

९४३ पुष्पा : 943 Lust.

मालिणवसणाण किअवणिआणं आपंडुगंडपालीणं ।
पुप्फवईआण कामो अंगेसु कआउहो वसई ॥ 949 ॥

पुष्पवतीचीं वस्त्रें मलिन असतात, ती दूर दूर असते व तिचे गाल फिकट असतात; तरी जणुं तिच्या अंगप्रत्यंगांत अनंग सर्व आयुधांसह सज्ज होऊन वास करतो.

● साहित्यमीमांसेतील पाठः अकिंचणजणकअवे भिआण आपस्तु गीढ वाडीण । पुप्फवईअण कामो अम्मो सुमकाउहो वसइ ॥

९४४ तीन दिवस : 944. Cross Objection.

पुप्फवइअ म्हि, बालअ ! मा छिवसु ! अदीहराउसो होसि ।
अज्जं चेअ मरिज्जउ ! मअच्छि ! किं कालहरणेण ॥ 950 ॥

ती:—बेट्या, (माझी प्राप्ति एवढ्यांत होणार नाहीं); मी पुष्पवती आहे; मला शिवूं नको, नाहींतर तुझें आयुष्य क्षीण होईल.

तो:—हरिणाक्षी, मी आजच मेलों तरी चालेल — पण कालहरण करूं नको.

९४५ अलका : 945. Curls.

वाणिअअ ! हत्थिदंता कत्तो अम्हाण वग्घकत्तीओ ।
जाव लुलिआलअमुही घरम्मि परिसक्कए सोण्हा ! ॥ 951 ॥

[वाणिजक हस्तिदन्ताः कुतोऽस्माकं व्याघ्रकृत्तयः ।
यावल्लुलितालकमुखी गृहे प्रतिवसति स्नुषा ॥]

वाणीबुवा, आतां आमच्याकडे हस्तिदंत किंवा व्याघ्रचर्म कसें मिळणार ! भुरभुरत्या कुरळ्या केसांच्या नव्या सूनबाई घरांत आल्या आहेत ना !

● अथवा काव्यप्रकाशावरून, अलंकारमहोदधीत उत्तर अलंकाराचें उदाहरण : " तदुत्तरं भवेत् यत्र प्रश्नोन्नयनमुत्तरात् । असकृद् या सति प्रश्ने

१. सज्जए, सुक्कए, वट्टए.

यस्तत्सम्भाव्यमुत्तरम् ॥ " अलंकाररत्नाकरांत नियमाचें उदाहरण: ' अर्थः निषेधार्थोऽपि विधिर्नियमः । ' वज्जालग्गांतील पाठ व छाया : ' उत्तुङ्ग थोर थणवट्टसालसा जं वहू सुवइ । ' उत्तुङ्ग पृथुस्तनपट्टसालसा यद्वधूः स्वपिति । '

९४६ हंसीः

946. Swanny.

गण्हंति पिअअमाण वअणाहि हंसीओ विसलआइं ।
हिअआइं व कुसुमाउहबाणकआणेअरंधाइं ॥ 952 ॥

हंसी प्रियकराच्या चोंचींतून कमळाचे तंतु काढीत नसून जणूं कुसुमायुधाच्या शरांनीं विद्ध झालेल्या त्याच्या हृदयाचेंच ग्रहण करीत आहे.

● साहित्यमीमांसेतील पाठः ' गण्हंति पिअअमापिं अ अमाअवअणा हि विसळअआइं । हिअआइं वि कुसुमाउहसाणकआणेअरंधाइं ॥ '

९४७ हंस :

947. Exaltation.

हंसाण सरेहिं सिरी, सारिज्जइ अह सराण हंसेहिं ।
अण्णोण्णं चिअ एए अप्पाणं णवर गरुअंति ॥ 953 ॥

[हंसानां सरोभिः श्रीः सार्यते अथ सरसां हंसैः ।
अन्योन्यमेवैते आत्मानं केवलं गरयन्ति ॥]

हंसांमुळें सरोवराची शोभा वृद्धिंगत होते आणि सरोवरामुळें हंसांची. तीं परस्परांच्या शोभेंत भर घालतात आणि स्वतःचाही गौरव वाढवितात.

● छाया काव्यप्रकाशावरून. काव्यप्रदीपांत अन्योन्य अलंकाराचें उदाहरण : ' क्रियया तु परस्परम् । वस्तुनोर्जननेऽन्योन्यम् । '

१. सवृद्धावन्ते, २. गुरू कुर्वंति.

९४८ आंतबाहेर : 947. In & Out.

अणुदिअहकआभोआ जह जह थणआ विणिंति कुमॅरीए ।
तह तह लद्धोआसो व्व वम्महो हिअअमाविसइ ॥ 954 ॥

कुमारीचे स्तन वृद्धिंगत होऊन जों जों बाहेर येत आहेत तों तों मन्मथ संधि साधून तिच्या हृदयांत प्रवेश करीत आहे.

● स्तूपाच्या अंतर्यामीं पवित्र वस्तु असते तशी स्तनांच्या अंतर्यामीं हृदयांतली प्रीति !

९४९ पुष्पसंकेत : 949. Notation.

केसा पण्डुरच्छाआ असईसंगेण चम्म जज्जरिअं ।
चिच तुह सोहग्गं ! गोदा दूइत्तणं कुणई ॥ 955 ॥

उनाड स्त्रियांच्या संगतींत माझे केस पिकले आणि शरीर जर्जर झालें. पण तुझ्या सद्भाग्यासारखें दृश्य मी आजवर पाहिलें नाहीं. प्रत्यक्ष गोदावरी तुझें दूतीकर्म करीत आहे.

● परिस्थितीच्या प्रभावामुळें पुष्पें अर्पण करणें अगर संकेत ठरविणें अशक्य होतें; म्हणून गोदावरीच्या पात्रांत फुलांचा द्रोण सोडून त्यानें किंवा तिनें प्रेम व्यक्त केलें किंवा संकेत ठरविला. प्राचीन व मध्ययुगीन वाङ्मयांत पुष्पसंकेत विख्यात आहे. फुलांचा पुडा पात्रांत सोडतांना पहाणारांना वाटलें कीं कांहीं व्रत चाललें आहे व तो उचलून घेतांना पाहणारांना वाटलें कीं तो यदृच्छेनें वाहत आलेला आहे. बाह्यतः विसंगत अशा ह्या घटनांच्या अंतर्यामींची संगति जाणत्यांनीं ओळखली

९५० मन्दभागिनी : 950. Circumstantial Evidence.

णिण्णिइं दोब्बल्लं चिंता अलसत्तणं सणीससिअं ।
मह मंदभाइणीए कए सहि ! तुमं वि अहह ! परिभवइ ॥ 956 ॥

[औन्निद्र्यं दौर्बल्यं चिन्ताऽलसत्वं सनिःश्वसितम् ।
मम मन्दभागिन्याः कृते सखि अहह त्वामपि परिभवति ॥]

सखि — तुला (काल रात्रीं) जागरण घडल्यासारखें दिसतें. काले डोळे, दुबळें शरीर, व्यग्र मुद्रा आणि आळसलेली हालचाल; शिवाय तूं दीर्घ उसासे टाकीत आहेस. अरेरे — आणि हें सारें माझ्यासाठीं — या मन्दभागिनीसाठीं !

● छाया काव्यप्रकाशावरून. संकेत ठरविण्यासाठीं नायिकेनें दूतीला प्रियकराकडे पाठविलें—आणि मधल्यामध्यें दूतीच नायकाशीं रममाण होऊन कांहीं सबब घेऊन परत आली, तिला उद्देशून नायिकेचे उद्गार. निरोप नेण्याआणण्याचे श्रम नाहीं तरी तिला झालेलेच होते; त्याबद्दल आभार आणि तिच्या अपकृत्याबद्दल निर्भर्त्सना.

९५१ गृहपतिदुहिता : 951. Hypnotism.

णिअदइअदंसणूसुअ[2] पंथिअ ! अण्णेण वच्चसु पहेण ।
घरवइधूआ[3] दुल्लंघवाउरा ठाइ हअगामे ॥ 957 ॥

[निजदयितादर्शनोत्क्षिप्त[4] पथिकान्येन व्रज पथा ।
गृहपतिदुहिता दुर्लङ्घ्यवागुरेह हतग्रामे ॥]

---

१ औण्णिइं. २. उक्खित्त. ३. गहुआ. ४. उत्सुक.

पथिका, तूं तुझ्या पत्नीच्या दर्शनासाठीं उत्सुक झाला आहेस. तूं दुसऱ्या मार्गानें जा. या दुष्ट गांवांतल्या गृहपतीला एक मुलगी आहे. तिच्या जाळ्यांतून निसटणें तुला अशक्य होईल.

● छाया काव्यानुशासनावरून. साहित्यमीमांसेतील पाठ : णि अदइ दंसणक्खितपथ्थाहिअअण्णेण मच्छसुवहेण। गहवइधू आ दुल्लंघमा उरा इह अअं गामे ॥

९५२ वृषभ : 952. Bull.

आसाइअमण्णाएण जेत्तिअं, ता तुह ण बहुआ धिई।
उवरमसु वुसह ! एण्हि, रक्खिज्जइ गेहवइखेत्तं ॥ 958 ॥

[आस्वादितमज्ञातेन यावत्तावदेव धीधीनाम्।
उपरम वृषभेदानीं रक्ष्यते गृहपतिक्षेत्रम् ॥]

वृषभा, तूं या शेतांत कोणालाही नकळत आडमार्गानें येऊन तांदूळ खात असतोस. आतां तूं परत जा; कारण मालक शेतांत राखणीला आहे.

● छाया सरस्वतीकंठाभरणावरून. प्राचीन संस्कृत वाङ्मयांत क्षेत्र हा शब्द स्त्री, पत्नी या अर्थानें अनेकदां योजलेला आढळतो. शेत धन्याच्या मालकीचें, केवळ कसणाऱ्याच्या मालकीचें नव्हे, त्याचप्रमाणें स्त्री पतीच्या मालकीची. गुंड शेतकरी शेजाऱ्याच्या शेतांत बहुधा त्याच्या गैरहजेरींत बैल घालून अतिक्रमण करती, तीच न्याय येथेंही. परक्षेत्रांत आडमार्गानें घुसणाऱ्या वृषभाच्या निमित्तानें उपपतीला सूचना कीं धनी घरीं आहे, आल्या मार्गानें परत जा. कीं शेतांत बैल घुसल्याची हूल उठवून घरधन्याला रानांत रवाना करण्याची ही युक्ति आहे ? छायेचा भिन्न पाठ: आस्वादितमज्ञातेन यावत्तावदेव बन्धय धृतिम्। उपरमस्व वृषभाद्य रक्ष्यते गृहपतिक्षेत्रम्॥

९५३ कंकणरव : 953. Rhythm.

उच्चिणसु पडिअकुसुमं मा धुण सेहालिअं, हलिअसुण्हे ।
ऐस अवसाणविरसो ससुरेण सुओ वलअसद्दो ॥ 959 ॥

[उच्चिनु पतितानि कुसुमानि मा धुनीः शेफालिकां हालिकस्नुषे ।
एष ते विषमविरावः श्वशुरेण श्रुतो वलयशब्दः ॥]

शेतकऱ्याच्या सुने, फक्त (जमिनीवर) पडलेलीं फुलें गोळा कर; परसांतल्या शेफालिकेला हलवूं नको, कारण त्यामुळें तुझ्या कंकणांचा आवाज होईल व तो विसंवादी स्वर तुझ्या सासऱ्याला ऐकूं जाईल (आणि त्याचा परिणाम अनिष्ट होईल.)

● छाया कल्पालोकावरून. परसांतल्या शेफालिकेच्या कुंजात सुनबाई प्रियकराबरोबर क्रीडा करीत होत्या आणि सखी पहारा करीत होती. नायिकेच्या कंकणांचा स्वर ऐकूं येतांच सखी धोक्याची सूचना देते; मैत्रिणीच्या सासऱ्याला आपला शब्द ऐकूं गेला तरी त्याला भलताच संशय येऊं नये म्हणून शेफालिकेचें झाड फुलांसाठीं हलवूं नकोस, ही वाच्य आणि तुझीं कांकणें वाजत आहेत, ही व्यङ्ग्य सूचना. मोठ्या कष्टांनीं जोपासना केलेल्या शेफालिकेला कोणी नुसता धक्का लावलेलाही सासऱ्याला खपत नसे. हलत्या झाडाचा ध्वनि ऐकून तो चिडेल, हा वाच्य अर्थ आणि पुरेशी खबरदारी घेतली नाहीस तर रतिक्रमव्यञ्जित कङ्कणशिञ्जित त्याला ऐकूं येईल हा व्यङ्ग्य व अभिप्रेत अर्थ. एक टीकाकार सांगतो : अत्र स्वतस्सिद्धार्थशक्तिमूलो विधिनिषेधरूपेण वस्तुना निषेधरूपो वस्तुध्वनिः उच्चिनु मा धुनु इति विधिनिषेधाभ्याम् वलयशब्दो न कर्तव्य इति निषेधस्य प्रतीतेः ।

१. सेहालिअं. २. अह दे विसअविरामो. ३. अवसाणविरसा: ४. विराव:

९५४ पाण्या निघाली, सुंदरी : 954. Earthen Pitcher.

पविसंती घरदारं विवलिअवअणा विलोइऊण पहं।
खंधे मोत्तूण[2] घडं हा हा णट्ठो त्ति रुआसि ! सहि किं ति ?॥960॥

[प्रविशन्ति गृहद्वारं विवलितनयना विलोक्य पन्थानम्।
स्कन्धे गृहीत्वा घटं हा हा नष्ट इति रोदिषि सखि किमिति ॥]

दारांतून घरांत प्रवेश करतांना मान वळवून तिनें मागें पाहिलें आणि खांद्यावरला पाण्याचा घडा सोडून देऊन ती म्हणाली, ' हाय, हाय, गेला !' तेव्हां सखि म्हणाली, 'आतां रडूं नको, (लौकर दुसरा घडा घे आणि पाणी आणावयाला पुन्हां पाणवठ्याकर जा. ')

● छाया काव्यप्रकाशावरून. हेतु अलंकार. प्रियकर पाणवठ्याकडे जातांना दिसला, तिकडे पुन्हां जाण्याला निमित्त हवें, म्हणून नायिकेनें खांद्यावरला घडा सोडून दिला. श्रीजयदेवाच्या चंद्रलोकावरील श्रीमागा-भट्टाच्या राकागम व्याख्येतील पाठः प्रविशन्ती गृहद्वारं तत्पन्थानं विलोक्य च। किं रोदिषि घटे नष्टे हाहेतिवचनात्सखि ॥

९५५ अडवणूक : 955. Manoeuvre.

मा पंथ रुंधसु ! पहमवेहि बालअ ! असेसिअहिरीअ।
अम्हे अणिरिक्काओ, सुण्णं घरअं व अक्कमेसि ॥ 961 ॥

[मा पन्थानं रुधः अपेहि बालक अप्रौढ अहो असि अह्रीकः।
वयं परतन्त्रा यतः शून्यगृहं मामकं रक्षणीयं वर्तते ॥]

हे पथिका, माझा मार्ग अडवूं नकोस; वेड्या, दूर हो; निर्लज्जा, जणूं मी परित्यक्ता आहे व माझें घर मोकळें आहे, अशा रीतीनें तूं चढाई करीत आहेस.

१. नअणा. २ घेत्तूण. ३. अम्हेअ णिरिक्काओ सुण्णघरं रक्खिअव्वं णो।

● छाया ध्वन्यालोकावरून. तेथील प्राकृत पाठ थोडा वेगळा आहे. मला रस्त्यांत अडवूं नकोस, आजूबाजूला ये जा आहे, येथें घड बोलतांही येणार नाहीं, घरीं ये, घरीं कोणीही नाहीं, अशी सूचना. मध्ययुगीन स्त्री-वेदांत निर्भर्त्सना संकेताचीं अनेक उदाहरणें आढळतात. समाजाच्या नीतिमत्तेवर नियंत्रण ठेवूं पाहणाऱ्या पाद्र्यामार्फत निर्भर्त्सना—संकेतानें प्रियकराला भिंतीलगतच्या वेलीवरून माडीवर येण्याचा मार्ग सांगितल्याचें उदाहरण इटालियन शतयामिनींत आढळतें.

९५६ प्रहर : 956. Interval.

सुव्वइ समागमिस्सइ तुज्झ पिओ अज्ज पहरमेत्तेण ।
एमेअ किं ति चिट्ठसि ? ता सहि ! सज्जेसु करणिज्जं ॥962॥

[श्रूयते समागमिष्यति तव प्रियोऽद्य प्रहरमात्रेण ।
एवमेव किमिति तिष्ठसि तत् सखि सज्जय करणीयम् ।

तुझा नवरा आज एका प्रहराच्या आंत येथें येणार आहे, असें मी (आतांच) ऐकलें. सखि, तूं अशी बसली आहेस कशी ! कांहीं तयारी करशील कीं नाहीं !

● छाया काव्यप्रकाशावरून. सुनेजवळ सासू बसलेली होती आणि दूती तर संकेत ठरवून आली होती; सुनेला घराबाहेर काढावयाची कशी ? दूती सांगते, अजून प्रहरभर वेळ आहे, तेवढ्यांत सहज संकेतस्थानीं जाऊन येतां येईल; भाजीपाला किंवा कांहीं तरी सामानसुमान आणावयाच्या सबबीखालीं आहेस तशीच घरांतून बाहेर पड, अशी सूचना. दुसरा टीकाकार सांगतो, आतां सवड राहिली नाहीं. तूं स्वयंपाकाच्या तयारीला लाग, अशी सूचना.

९५७ पाहुणी आली घरा : 957. Out House.

सव्वपाहुणिआ देअरजाया, ए सुहय ! [1]किं ति दे हणिदा !
रुअइ घरोपंतफलिघिघरम्मि, अणुणिज्जउ वराई ॥ 963 ॥

[स्वस्यप्रा[2]घुणिका देवर जायया सुभग किमपि ते भणिता ।
रोदिति पश्चाद्भा[3]गवलभीगृहेऽनुनीयतां वराकी ॥]

भाउजी, आपल्याकडे सणासाठीं पाहुणी आली आहे ना, तिला तुमची पत्नी कांहीं तरी बोलली असावी असें वाटतें; कारण परसांतल्या प्रियङ्गु लतेच्या मांडवांत पाहुणी रडत बसली आहे. सुभग, तिकडे जाऊन बिचारीचें सांत्वन तरी करा.

● अर्थ काव्यप्रकाशावरून. संभोग ही सांत्वनांतील सूचना असें मानलें तर अविवक्षितवाच्य आणि सांत्वन हाच संभोग असें मानलें तर विवक्षितान्यपरवाच्य. तुमच्या अनुरक्तीमुळें डोईजड झालेली पाहुणी जाऊ-बाईंना कांहीं उर्मट बोलली असावी म्हणून त्या तिकडे रडत बसल्या आहेत, असाही या गाथेचा अर्थ होणें शक्य आहे. पाहुणीवर प्रेम असेल तर तिचें सांत्वन करा, पत्नीवर प्रीति असेल तर तिचा अनुनय करा. ध्वन्यालोकांत व चंद्रालोकावरील रमागम टीकेंत शंकराचें उदाहरण. फळिणीवर या प्रयोगावरून लतामंडपालाही घर म्हणत होते असें दिसतें.

९५८ भूमिगत : 958. Alcove.

पुप्फघरोवमिअभूमिघरअसाहंतरूप (?) विण्णवणं ।
गोलाअडविअडकुडंगमहुअ .... ॥ 964 ॥

---

1. पओहरत्थहीघरम्मि. २. प्राहुणिका. ३. शल्य.

गोदावरीच्या कांठावरील मधूकाच्या मोहोरलेल्या शाखा पुष्पांच्या भारानें नम्र होऊन जमिनीला टेंकल्या आहेत. हे वृक्ष असें सुचवितात कीं येथें चांगलें संकेतस्थान आहे.

● मूळ गाथा अपूर्ण.

९५९ बाहेर कडी, आंत सवंगडी : 959. Locked.

गृहिणिप्रवेशितजारे गृहे गृहे (गृहिणी ?) स्थापिता ।
मिलितावदति (असती ?) जावउ पश्चाद् गृहिणी गृहस्थश्च ॥965॥

गृहस्थानें आपल्या बायकोला घरांत कोंडून ठेवलेलें दिसतें. पण तिनें प्रियकराला आधींच घरांत आणून ठेवलेलें असल्यामुळें त्यांना अनायासें (संकेतस्थानाची) सोय उपलब्ध झाली.

● मूळ गाथा अपूर्ण व अशुद्ध.

९६० आंदोलन : 960. Vaccilation.

एक्कत्तो रुअइ पिआ अण्णत्तो समरतूरणिग्घोसो ।
पेम्मेण रणरसेण अ भडस्स डोलाइअं हिअअम् ॥966॥

[एकतो[1] रोदिति प्रियान्यतः समरतूर्यनिर्घोषः ।
प्रेम्णा रणरसेन च भटस्य दोलायितं हृदयं ॥]

एकीकडे प्रिया रडत आहे आणि दुसरीकडे रणदुंदुभि वाजत आहेत. प्रेम व रणोत्साह यांमध्यें योद्धयाचें हृदय दोलायमान होत आहे.

● छाया दशरूपकावरून.

---

१. एकन्तो.

९६१ मस्करी : 961. Banter.

केलीगोत्तक्खलणे विकुप्पए केअवं अआणन्ती ।
दुट्ठ उअसु परिहासं ! जाआ सच्चं चिअ परुण्णा ॥967॥

[केलीगोत्रस्खलने विकुप्यति कैतवमजानन्ती ।
दुष्ट पश्य परिहासं जाया सत्यमिव प्ररुदिता ॥]

दुष्टा, तुझ्या मस्करींचा परिणाम पहा. केवळ थट्टा म्हणून तूं गोत्रस्खलनाचा खेळ केलास; तिला तुझी लबाडी समजली नाहीं; तिला तें खरेंच वाटलें, म्हणून बिचारी रडत बसली आहे.

● छाया दशरूपकावरून.

९६२ ज्योति : 962. Flame.

दे आ पसिअ णिअत्तसु मुहससिजोण्हाविलुत्ततमणिवहे ।
अहिसारिआणँ विग्घं करोसि अण्णाणँ वि हआसे ! ॥968॥

[दैवाद्दृष्ट्वा नितान्तसुमुखशशिज्योत्स्नाविलुप्ततमोनिवहे ।
अभिसारिकाणां विघ्नं करोष्यन्यासां विहताशे ॥]

प्रिये, प्रसन्न हो, परत फीर. तुझ्या मुखचंद्राच्या प्रकाशामुळें अंधकार नष्ट होत आहे आणि अन्य अभिसारिकांच्या संकेतांत विघ्न येत आहे.

● छाया दशरूपकावरून.

९६३ प्रजापति : 963. Erotic.

अण्णं लडहत्तणअं अण्ण च्चिअ का इ वत्तणच्छाआ ।
सामा सामण्णपआवइओ रेह च्चिअ ण होइ ॥ 969 ॥

[अन्यत्सौकुमार्यं अन्यैव च काऽपि वर्तनच्छाया ।
श्यामा सामान्य प्रजापतेः रेखैव च न भवति ॥]

श्यामलेच्या अंगाची कांति व कोमलता अद्वितीय आहे. सर्वसामान्य प्रजापतींनेंच हिला निर्माण केली असावी असें वाटत नाहीं.

● छाया काव्यप्रकाशावरून. वर्तन = रंग, शरीराचा वर्ण; रेखा = कृति, निर्मिति हे प्रयोग लक्षांत घेण्याजोगे आहेत. काव्यप्रदीपांत व अलंकार-सर्वस्वांत अतिशयोक्तीचें उदाहरण: 'अध्यवसित प्राधान्ये त्वतिशयोक्तिः ।'

९६४ अग्रणी : 964. Idler.

अलसंसिरोमणि धुत्ताणं अग्गिमो पुत्ति ! धणसमिद्धिमओ ।
इअ भणिएण णअंगी पप्फुल्लविलोअणा जाआ ॥ 970 ॥

[अलसशिरोमणि धूर्तानामग्रिमः पुत्रि धनसमृद्धिमयः ।
इति भणितेन नताङ्गी प्रफुल्लविलोचना जाता ॥]

हा आळशांचा शिरोमणि आहे आणि धूर्तांचा अग्रणी आहे. मुली, त्याची धनसमृद्धि अपरंपार आहे. हें ऐकतांच हिचे नेत्र प्रफुल्ल झाले व तिनें मान नम्र केली.

● छाया काव्यप्रकाशावरून. प्रथमार्धांत धात्री पुत्रीला सांगते, हा आतां येथेंच मुक्काम करणार असें दिसतें, पण सांभाळ, फार लबाड आहे आणि कंजूष आहे; उत्तरार्धांत पुत्री अभिनयानें उत्तरते, ठीक आहे, पाहून घेईन.

---

१. लडहत्तणअं. २. अन्याल्टमत्वं. ३. अरस. ४. इत्युक्ति समुपाकर्ण्य फुल्ले तस्या विलोचने ॥

९६५ प्रसादः 965. Subsidy.

उल्लोल्लकरअरअणक्खएहिँ तुह लोअणेसु मह दिण्णं।
रत्तंसुअं पसाओ, कोवेण पुणो इमे ण अक्कमिआ ।। 971 ।।

[आर्द्रार्द्रकररदनक्षतैस्तव लोचनयोर्मम दत्तम्।
रक्तांशुकं प्रसादः कोपेन पुनरिमे नाक्रान्ते ॥]

माझे डोळे जे लाल झाले आहेत ना, ते रागामुळें किंवा रडण्यामुळें नव्हे; तुमच्या शरीरावर असलेलीं ताजीं नख व दंत क्षतें जिनें तुम्हांला अर्पिलीं तिनेंच माझ्या नेत्रांना हा रक्तांशुकाचा प्रसाद दिलेला आहे.

● छाया काव्यप्रकाशावरून. काव्यप्रदीपांत अपन्हुतिबद्ध उत्तरालंकार. श्रीजयदेवाच्या चंद्रालोकावरील श्रीगागाभट्टाच्या राकागम टीकेंत (चौखम्बाः पृ. १४२) विभावनालङ्कारध्वनि.

९६६ अपकीर्तिः 966. Defamation.

ए! एहि दाव सुंदरि! कण्णं दाऊण सुणसु वअणिज्जं
तुज्झ मुहेण किसोअरि! चंदो उअमिज्जइ जणेण ।। 972 ।।

[अयि एहि तावत्सुंदरि कर्णं दत्त्वा शृणुष्व वचनीयम्।
तव मुखेन कृशोदरि चन्द्र उपमीयते जनेन ।।]

ए, इकडे ये, सुंदरी, मी काय सांगतें ती नीट लक्ष देऊन ऐक; कृशोदरी, हे (अज्ञ लोक) तुझ्या मुखाला चंद्राची उपमा देत आहेत.

---

१. ओल्लोल्ल.

● छाया काव्यप्रकाशावरून. श्री. भिडे यांचे भाषांतर (अलंकारांचे निरूपणः पृ १८५) पद्यः " मूर्ख भाषण याहून सांग सुंदरि ! काय तें। चंद्राश तव वक्त्राची उपमा देति लोक ते ॥ " काव्यानुशासनांत (पृ. २१६) समानार्थी वचन दिलें आहे: " एमे अ जणो तिस्सा देइ कवोलोवमाइ ससिबिम्बम् । परमत्थविआरे उण चन्दो चन्दो च्चिअ वराओ ॥ काव्य-प्रदीपांत प्रतीप अलंकाराचें उदाहरण: " आक्षेप उपमानस्य प्रतीपमुपमेयता । तस्यैव यदि वा कल्प्या तिरस्कारनिबन्धना ॥ "

९६७ अभिनय : 967. Pantomime.

एद्दहमेत्तत्थणिआ एद्दहमेत्तेहि अच्छिवत्तेहिं ।
एद्दहमेत्तावत्था एद्दहमेत्तेहि दिअहेहिं ॥ 973 ॥

[एतावन्मात्रस्तनिका एतावन्मात्राभ्यां अक्षिपत्राभ्याम् ।
एतावन्मात्रावस्था एतावन्मात्रैर्दिवसैः ॥]

तिचे स्तन एवढे (विशाल) आहेत आणि तिचे नेत्र एवढे (विस्तृत) आहेत. मात्र इतक्या थोड्या दिवसांत ही या स्थितीप्रत प्राप्त झाली आहे.

● छाया काव्यप्रकाशावरून. अभिनय अलंकार. नायिकेची उमर छोटी आहे तरी तिच्या अंगप्रत्यंगांत यौवनाचा संचार झाला आहे. मात्र नायकाच्या विरहामुळें ती अत्यावधींत कृश झाली आहे. अभिनयोऽत्र स्तन-प्रदर्शने हस्तस्य दाडिमफलाकारः अक्षिप्रदर्शने तस्य कमलदलानुकृतिः अवस्थाप्रदर्शने तत्तुल्यसूचकम् उत्थापिततर्जनीकरस्य हस्तस्य हस्वत्वतः दिवसप्रदर्शने च उत्थापित चतुरङ्गुलीको हस्तः ।

९६८ पांचजन्य : 968. Couch.

करजुअगहिअ जसोआत्थणमुहविणिवेसिआहरपुडस्स ।
संभरिअपंचजण्णस्स णमह कण्हस्स रोमंचं ॥ 974 ॥

[करयुगगृहीतयशोदास्तनमुखविनिवेशिताधरपुटस्य ।
संस्मृतपाञ्चजन्यस्य नमत कृष्णस्य रोमाञ्चम् ॥]

कृष्णानें पांचजन्य शङ्ख मुखाला लावला तेव्हां त्याला यशोदेच्या स्तनाची आठवण झाली व त्याच्या अंगावर रोमाञ्च उभे राहिले. त्याला नमन असो.

● छाया काव्यप्रकाशावरून. नवकवींही याच्या फारसे पुढें गेलेले नाहींत. काव्यप्रदीपांत स्मरण अलंकाराचें उदाहरण "यथानुभवमर्थस्य दृष्टे तत्सदृशे स्मृतिः । स्मरणं" कृष्ण यशोदेचें स्तनपान करूं लागला तेव्हां पूर्वजन्मीं धारण केलेल्या पांचजन्य शंखाची त्याला आठवण झाली, असाही अर्थ टीकाकारांनीं घेतला आहे.

९६९ प्रश्नोत्तर : 969. Epigram.

का विसमा ? देव्वगई, किं दुलहं ? जणो गुणग्गाही ।
किं सोक्खं ? सुकलत्तं, किं दुक्खं ? जं खलो लोओ ॥ 975 ॥

[का विषमा दैवगतिः किं लब्धव्यं यज्जनो गुणग्राही ।
किं सौख्यं सुकलत्रं किं दुःखं यत्खलो लोकः ॥]

दुर्गम काय ? दैवगति; दुर्लभ काय ? गुणग्राही जन. सौख्य कोणतें ? सुपत्नी. दुःख कोणतें ? खलांचा सहवास.

● छाया काव्यप्रकाशावरून. उत्तर अलंकार.

९७० अस्पर्शः 970. Untouchable.

किवणाणँ धणं, णाआणँ फणमणी, केसराइँ सीहाणं ।
कुलबालिआणँ त्थणआ कुत्तो छिप्पंति अमुआणं ? ।। 976 ।।

[कृपणानां धनानि नागानां फणमणयः केसराः सिंहानाम् ।
कुलपालिकानां स्तनाः कुतः स्पृश्यन्तेऽमृतानाम् ।।]

कृपणाचें धन, नागफणीवरील मणि, सिंहाची आयाळ आणि कुलीन स्त्रियांचे स्तन, यांना स्पर्श करूनही कोण जिवंत राहूं शकेल ?

● छाया काव्यप्रकाशावरून. दीपक अलंकार. किंवा नाग, सिंह वगैरे सजीव आहेत तोंवर त्यांचे मणि, आयाळ इत्यादींना स्पर्श करण्याला कोण धजावेल ?

९७१ जयश्री : 971. Victory.

केसेसु वलामोडिअ तेण समरम्मि जअस्सिरी गहिआ ।
जह कंदराहि विहुरा तस्स दढं कण्ठअम्मि सण्ठविआ ।।977।।

[केशेषु बलाद्वामोट्य तेन समरे जयश्रीर्गृहीता ।
यथा कन्दराभिर्विधुरास्तस्य दृढं कण्ठे संस्थापिताः ।।]

समरांगणांत बलात्कारानें केश धरून त्यानें जयश्रीला स्वाधीन करून घेतलें; हें पाहून गिरिकंदरांनीं त्याच्या शत्रूंच्या गळ्यांत मिठ्या घातल्या.

● छाया काव्यप्रकाशावरून. उत्प्रेक्षा अशी कीं जणूं हें दृश्य पाहून कंदरांच्या वृत्ति उद्दीपित झाल्या आणि त्या त्याच्या शत्रूंच्या गळीं पडल्या. काव्यहेतु असा कीं तो विजयी झालेला पाहतांच त्याच्या शत्रूंनीं गिरिकंदरांचा आश्रय घेतला.

---

१. छिप्पन्ति.

९७२ सुजन : 972. Saints and Sinners.

खलववहारा दीसन्ति दारुणा जह वि, तह वि धीराणं ।
हिअअवअस्सबहुमआ ण हु ववसाआ विमुज्झन्ति ॥ 978 ॥

[खलव्यवहारा दृश्यन्ते दारुणा यद्यपि तथापि धीराणाम् ।
हृदयवयस्यबहुमता न खलु व्यवसाया विमुह्यन्ति ॥]

खलांचे दारुण व्यवहार दिसले तरी अंतर्यामींच्या प्रेरणा जाणून सुजन धीर सोडीत नाहींत (व दुष्टांवरही उपकारच करतात).

● छाया काव्यप्रकाशावरून.

९७३ गुणदोष : 973. Romeo.

जं परिहरिउं तीरइ मणं पि ण सुंदरत्तणगुणेण ।
अह णवर मस्स दोसो पडिवक्खेहिँ पिं पडिवण्णो ॥ 979 ॥

[यं परिहर्तुं तीर्यते मनागपि न सुन्दरत्वगुणेन ।
अथ केवलं तस्य दोषः प्रतिपक्षैरपि प्रतिपन्नः ॥]

त्याच्या अंगीं असलेल्या सौंदर्यामुळें त्याला टाळणें अशक्य आहे आणि त्याचा हा दोष त्याच्या प्रतिपक्षानेंही मान्य केलेला आहे.

● छाया काव्यप्रकाशावरून. ही गाथा आनन्दवर्धनाच्या विषमबाण-लीलेंतील आहे असें चौखम्बा सूचींत नमूद केलेलें आहे.

९७४ हिरमुटी : 974. Retreat.

जस्स रणंतेउरए करे कुणंतस्स मंडलग्गलअं ।
रस सम्मुही वि सहसा परम्मुही होइ रिउसेणा ॥ 980 ॥

[यस्य रणान्तःपुरे करे कुर्वतो मण्डलाग्रलताम् ।
रससंमुख्यपि सहसा पराङ्मुखी भवति रिपुसेना ॥]

पतीनें अंतःपुरांत पट्टराणीला आलिंगन दिलें म्हणजे इतर स्त्रिया रससन्मुख असल्या तरी पतीला पराङ्मुख होतात; त्याचप्रमाणें वीरानें रणांगणांत हातीं तरवार धरली म्हणजे शत्रुसेना शूर व सज्ज असली तरी ती त्याला पराङ्मुख होते.

● छाया काव्यप्रकाशावरून. मण्डलाग्रलता ही नायिका व रिपुसेना ही प्रतिनायिका. नायकानें नायिकेला हाती धरलेलें पाहून प्रतिनायिका विमुखी झाली आहे.

९७५ संक्रमण : 975. Transmission.

जस्सेअ वणो तस्सेअ वेअणा, भणइ तं जणो अलिअं
दंतक्खअं कवोले वहूऍ, विअणा सवत्तीणं ॥ 981 ॥

[यस्यैव व्रणस्तस्यैव वेदना भणति तज्जनोऽलीकम् ।
दन्तक्षतं कपोले वध्वाः वेदना सपत्नीनाम् ॥]

ज्याला जखम होते, त्यालाच तिच्या वेदना जाणवतात, असें लोक सांगतात, पण तें खरें नाहीं. दंतव्रण असतो वधूच्या गालावर आणि त्याच्या वेदना मात्र जाणवतात तिच्या सवतींना.

● छाया काव्यप्रकाशावरून.

९७६ मधुसागर : 976. Ocean.

जह गहिरो, जह रअणणिब्भरो, जह अ णिम्मलच्छाओ ।
तह किं विहिणा एसो सरसपाणिओ जलणिही ण किओ ? ॥982॥

१. वेअणा. २. जलणिहीणिओ.

[यथा गम्भीरो यथा रत्ननिर्भरो यथा च निर्मलच्छायः ।
तथा किं विधिना एषः सरसपानीयो जलनिधिर्न कृतः ॥]

एवढा गंभीर व निर्मल कान्तिमान् रत्नाकर विधीनें निर्माण केला, तो त्यानें गोड्या पाण्याचा कां केला नाहीं ?

● छाया काव्यप्रकाशावरून. समासोक्ति व अप्रस्तुतप्रशंसा या अलंकारांचे संमिश्रणामुळें संकर अलंकार; काव्यप्रदीपांत संदेह संकर.

९७७ सरस्वती : 977. Muse.

जा ठेरं व हसन्ती कइवअणंबुरुहबद्धविणिवेसा ।
दावेइ भुअणमंडलमण्णं विअ जअइ सा वाणी ॥ 983 ॥

[या स्थविरमिव हसन्ती कविवदनाम्बुरुहबद्धविनिवेशा ।
दर्शयन्ति भुवनमण्डलमन्यदिव जयति सा वाणी ॥]

कवीच्या मुखकमलांत विराजमान झालेली सरस्वती जणूं प्रतिसृष्टि-निर्मितीच्या अभिनिवेशानें प्रजापतीला हंसत आहे. अशा सरस्वतीचा जय असो.

● छाया काव्यप्रकाशावरून.

९७८ सुरसुरी : 978. Infatuation.

जोण्हाइ महुरसेण अ विइण्णतारुण्ण उच्छुअमणा सा ।
वुड्ढा वि णवोढा व्व परवहू अह हरइ तुह हिअअं ॥984॥

[ज्योत्स्नया मधुरसेन च वितीर्णतारुण्योत्सुकमनाः सा ।
वृद्धाऽपि नवोढेव परवधूरहह हरति तव हृदयम् ॥]

अरेरे, ज्योत्स्ना व मदिरा यांच्या प्रभावामुळें चढलेला तारुण्याचा उन्माद आला आहे आणि एखाद्या नवोढा परवधूप्रमाणें तिनें तुझें हृदय हरण केलें आहे.

● छाया काव्यप्रकाशावरून.

९७९ केतकीच्या बनांत : 979. Lotharis.

ढुंढुंण्णंतो मरिहिसि कंटअकलिआइ केअइवणाइं ।
मालइकुसुमसरिच्छं भमर ! भमंतो ण पाविहिसि ॥985॥

[ढुण्ढुलायमानो मरिष्यसि कण्टककलितानि केतकीवनानि ।
मालतीकुसुमसदृशं भ्रमर भ्रमन्नपि प्राप्स्यसि ॥]

भ्रमरा, तूं (धुंद होऊन) केतकीच्या बनांत भटकत आहेस. तेथले कांटे बोंचून तूं मरशील मात्र. येथें तुला मालतीसारखें फूल कांहीं प्राप्त होणार नाहीं.

● छाया काव्यप्रकाशावरून. केतकीचा बांधा दमदार व रंग चमक असतो व मादक सुगंध दूरवर दरवळतो; पण केवड्याला कांटे असतात व बनांत विषारी सर्प असतात. वेश्येप्रमाणें केतकी आकर्षित करील, उत्तेजित करील पण संतुष्ट करणार नाहीं, समाधान देणार नाहीं. मालती ही सात्त्विक कुलवधू; हिचा बांधा नाजूक, कांति कोमल, गंध मंद; उत्तेजित करणार नाहीं पण शांत समाधान देईल.

९८० प्रदोषरजनी : 980. Psychosis.

णवपुण्णिमामिअंकस्स सुहअ ! को तं सि ? भणसु मह सच्चं
का सोहग्गसमग्गा पओसरअणि व्व तुह अज्ज ? ॥ 986 ॥

१. ढुण्ढाल्लन्तो. २. अन्वेषयन्.

[नवपूर्णिमामृगाङ्कस्य सुभग कस्त्वमसि भणतु मम सत्यम् ।
का सौभाग्यसमग्रा प्रदोषरजनीव तवाद्य ॥]

सुभग, पौर्णिमेच्या चंद्राशीं तुझें काय नातें आहे? चंद्राची जशी संध्या तशी तुझी हल्लींची प्रिया कोण, तें ही मला सांग.

● छाया काव्यप्रकाशावरून.

९८१ रानी : 981. Call of the Wilds.

णिहुअरमणम्मि लोअणपहम्मि पडिए गुरुअणमज्झम्मि ।
सअलपरिहारहिअआ वणगमणं चेअ महइ वहू ॥ 987 ॥

[निभृतरमणे लोचनपथे पतिते गुरुजनमध्ये ।
सकलपरिहारहृदया वनगमनमेवेच्छति वधूः ॥]

आजूबाजूला वडीलधारीं माणसें वावरत असतांना तिचा गुप्त प्रियकर तिच्या दृष्टीस पडला. लगेच घरकामावरलें तिचें लक्ष उडालें आणि वधू रानांत जाण्यासाठीं तळमळूं लागली.

● छाया काव्यप्रकाशावरून. विरक्तीमुळें नव्हे, अनुरक्तीमुळें तिच्या मनांत वनगमनाची इच्छा उत्पन्न झाली; बाह्यतः लांकूडफांटा गोळा करण्यासाठीं, वस्तुतः प्रियकराला भेटण्यासाठीं.

९८२ मोहिनी : 982. Temptress.

तं ताण सिरिसहोअररअणाहरणम्मि हिअअमेक्करसं ।
बिंबाहरे पिआणं णिवेसिअं कुसुमबाणेण ॥ 988 ॥

[तत्तेषां श्रीसहोदररत्नाभरणे हृदयमेकरसम् ।
बिम्बाधरे प्रियाणां निवेशितं कुसुमबाणेन ॥]

दैत्यांना कौस्तुभ रत्नाबद्दल वाटणारी आसक्ति एकाएकीं ओसरली आणि मदनाच्या प्रभावामुळें त्यांचें लक्ष प्रियांच्या बिंबाधरांच्या ठायीं केंद्रित झालें.

● छाया काव्यप्रकाशावरून. समुद्रमंथनाचे वेळीं विष्णूनें मोहिनीचें रूप धारण केलें, तेव्हां दैत्यांची आसक्ति तिच्या ओंठांवर एकाग्र झाली. असाही अर्थ लावणें शक्य आहे कीं तिच्या दर्शनामुळें ते इतके मोहवले कीं त्यांना आपआपल्या प्रियांची आठवण झाली. एक टीकाकार सांगतो कीं त्यांचें लक्ष प्रथम कौस्तुभ धारण करणाऱ्या हरीवर केंद्रित झालें होतें आणि नंतर तें सकलरत्नसारतुल्य बिंबाधराचे ठायीं गुंतलें. काव्यप्रकाशांत पर्याय अलंकाराचें उदाहरण : " एकं क्रमेणानेकस्मिन् पर्याय. । " ही गाथा आपल्या विषमबाणलीलेंतील असल्याचें आनंदवर्धनानें ध्वन्यालोकांत (निर्णयसागर: पृ. १३६) नमूद केलें आहे.

९८३ अनुग्रह : 983. Benediction.

ताला जाअन्ति गुणा जाला दे सहिअएहिँ घेप्पन्ति ।
रइकिरणाणुग्गहिआइँ होन्ति कमलाइँ अ कमलाइँ ॥ ९८३ ॥

[तदा जायन्ते गुणा यदा ते सहृदयैर्गृह्यन्ते ।
रविकिरणानुगृहीतानि भवन्ति कमलानि कमलानि ॥]

सहृदयांनीं गुणांचें ग्रहण केलें म्हणजेच गुणांची ओळख पटते. कमळांना कमलत्व प्राप्त होतें, कारण त्यांवर सूर्यकिरणांचा अनुग्रह होतो.

● छाया काव्यप्रकाशावरून. ही गाथा आपल्या विषमबाणलीलेंतील असल्याचें आनंदवर्धनानें ध्वन्यालोकांत (निर्णयसागर:-पृ. ७५) नमूद केलें आहे.

९८४ म्लान :

984. Wan.

तुह वल्लहस्स गोसम्मि आसि अहरो मिलाणकमलदलो ।
इअ णववहुआ सोऊण कुणइ वअणं महीसमुहं ।। 990 ।।

[तव वल्लभस्योषसि आसीदधरो म्लानकमलदलम् ।
इति नववधूः श्रुत्वा करोति वदनं महीसंमुखम् ।।]

पहांटे तुझ्या वल्लभाचा ओंठ कोमेजलेल्या कमळाच्या पाकळी-सारखा दिसला, असें कोणीसें नववधूला सांगितलें. हें ऐकतांच तिनें मान खालीं वळवली.

● छाया काव्यप्रकाशावरून. कमल पहांटें उमलतें तें येथें कसें कोमेजलें ! वधूनें पहिल्याच भेटींत त्यांचीं इतकीं चुंबनें घेतलीं व तीं एवढ्या असोसीनें कीं त्यामुळें बिचाऱ्याचे ओठ पांढरे फटक पडले !

९८५ प्रार्थना :

985. Prayer.

मह देसु रसं धम्मे, तमवसमासं गमागमा हर णे ।
हरवहु ! सरणं तं चित्तमोहमवसरउ मे सहसा ।। 991 ।।

[महदेसुरसंधम्मे तमवसमासंगमागमाहरणे ।
हरबहुसरणं तं चित्तमोहमवसरउमे सहसा ।।]

प्राकृत गाथेचा अर्थ :

हे हरवधू पार्वती, मी तुला शरण आहे. मला धर्मात स्वारस्य वाटूं दे; पुण्यावर माझी प्रीति राहूं दे. माझी जन्ममरणाची इच्छा नष्ट कर. माझा मोह नष्ट कर आणि मला आश्रय दे.

संस्कृत छायेचा अर्थ :

हे उमे, विश्वेवरील माझ्या भक्तांचें रक्षण कर; कारण विचारांना-मुळेंच परमेश्वराशीं एकरूप होतां येतें आणि माझ्या चित्तावरील मोहाचें पटल दूर कर.

● त्याच अक्षरांची मांडणी संस्कृत व प्राकृत भाषांत केलेली आहे, यामुळें त्यांच्या अर्थांत बराच फरक पडतो.

संस्कृतपक्षे हे उमे-गौरि मम आगमाहरणे-विद्योपार्जने तं समासक्तं अवरक्ष, अवसरे तं चित्रमोहं सहसा हर, आगमाहरणे कीदृशे, महदे - उत्सवदायके सम्बोधनविशेषणमप्येतत्। कीदृशं समासक्तम् सुरैः - देवैः सन्धानं मिलनं यस्मात्तादृशम्, चित्तामोहम्, बहु - अनेकधा सरणं - प्रसरणं यस्य तम्, बहु सरणं - संसारो यस्मादिति वाऽर्थः।

अत्र प्राकृतपक्षे - हे हरवधु - पार्वति, त्वं शरणं मम, धर्मे रसं देहि - पुण्ये प्रीतिमुत्पादय, नोऽस्माकं गमागमान्-संसारात्, तमोवशामाशां हर, मे चित्तमोहः सहसा - झटिति अपसरतु दूरीभवत्वित्यर्थः।

ही गाथा आनन्दवर्धनाच्या देवीशतकांतील आहे असा चौखम्बा सूचींत उल्लेख आहे.

९८६ मदनराज : 986. Cupid.

राईसु चंदधवलासु ललिअमाप्फालिऊण जो चावं।
एक्कच्छत्तं च्चिअ कुणइ भुअणरज्जं विअंम्भन्तो ॥ 992 ॥

[रात्रीषु चंद्रधवलासु ललितमास्फाल्य यश्चापम्।
एकच्छत्रमिव करोति भुवनराज्यं विजृम्भमाणः ॥]

चांदण्या रात्रीं मदनराज आपलें सुंदर पुष्पधनुष्य धारण करून भ्रमण करतो आणि जणूं अखिल भुवनावर एकछत्री राज्य प्रस्थापित करतो.

● छाया काव्यप्रकाशावरून. गंगाभट्टाच्या रसागम व्याख्येतील छायेचा पाठ (चौखम्बाः पृ. ११९) थोडा वेगळा आहे. निशासु चंद्रगौरासु प्राप्य यौवनमादरात्। तनोत्यनङ्गो भुवनराज्यमेकातपत्रितम्॥

९८७ जयलक्ष्मी : 987. Nike.

लहिऊण तुज्झ बाहुप्फंसं जीए स को वि उल्लासो ।
जअलच्छी तुह विरहे ण हुज्जला दुब्बलाणं सा ।। 993 ।।

[लब्ध्वा तव बाहुस्पर्शं यस्याः स कोऽप्युल्लासः ।
जयलक्ष्मीस्तव विरहे न खलुज्ज्वला दुर्बला ननु सा ।।]

तुझ्या बाहूंचा स्पर्श हाच जिचा उल्हास ती जयलक्ष्मी आतां तुझ्या विरहामुळें दुर्बल व विव्हल झाली आहे.

● छाया काव्यप्रकाशावरून. समरांगणीं पतन पावलेल्या वीराच्या पत्नीचे उद्गार. काव्यप्रदीपांत समासोक्तीचें उदाहरणः 'परोक्तिर्भेदकैः श्लिष्टैः समासोक्तिः ।'

९८८ स्नेह : 988. Pearls.

वारिज्जन्तो वि उणो संदावकअत्थिएण हिअएण ।
थणहरवअस्सएण विसुद्धजाई ण चलइ से हारो ।। 994 ।।

[वार्यमाणोऽपि पुनः संतापकदर्थितेन हृदयेन ।
स्तनभरवयस्येन विशुद्धजातिर्न चलत्यस्या हारः ।।]

तिच्या गळ्यांत शुद्ध सोन्यामोत्यांचा हार होता. प्रियकराच्या गाढ आलिंगनामुळें तो रुतत होता; म्हणून ती वारंवार त्याला बाजूला सारीत होती. पण हाराचा स्तनांशीं गाढ स्नेह असल्यामुळें तिच्या हालचालींबरोबर तो हलत होता, पण ढळत नव्हता.

● छाया काव्यप्रकाशावरून. कुलीन स्नेहाला विपत्काल प्राप्त झाला असला व त्याच्यापासून उपसर्ग होत असला तरीही सज्जन त्याचा त्याग करीत नाहींत. टीकाकार सांगतात, या गाथेंत विपरीत रताची सूचना आहे !

९८९ काव्यानंद : 989. Heart's Content.

सअलकरणपरवीसामसिरिविअरणम्म सरसकव्वस्स ।
दीसइ अह व णिसुम्मइ सरिसं अंसंसमेत्तेण ॥ 995 ॥

[सकलकरणपरविश्रामश्रीवितरणं न सरसकाव्यस्य ।
दृश्यतेऽथवा श्रूयते सदृशमंशांशमात्रेण ॥]

सरस काव्य सर्व इंद्रियांना पूर्ण सुख व स्वास्थ्य देतें. याच्या अंशामात्राएवढेंही सुख देण्याची शक्ति दुसऱ्या कशांतही नाहीं.

● छाया काव्यप्रकाशावरून.

९९० आगंतुक : 990. Obtrusion.

सहि ! णवणिहुवणसमरम्मि अंकवालीसहीएँ णिविडाए ।
हारो णिवारओ च्चिअ उच्छेरन्तो, तदो कहं रमिअं ? ॥996॥

[सखि नवनिधुवनसमरेऽङ्कपालीसख्या निबिडया ।
हारो निवारित एव उद्‌घृण्वन् ततः कथं रमितम् ॥]

सखि, प्रथम व अभिनव सुरत संग्रामात प्रियकराच्या गाढ आलिंगनामुळे तुझा हार तुटला. या एकान्तांत जणूं तो आगंतुक असल्यामुळेंच तो तूं काढून टाकलास. आतां सांग, प्रियकराच्या संगतींत, अगदीं एकान्तांत, तूं काय काय केलेंस, काय काय झालें, तें सारें सारें सांग.

● छाया काव्यप्रकाशावरून.

---

१. णिसम्मइ. २. निशाम्यते. ३. पाली. ४. उच्चेरन्ती, तरसंतो.

९९१ लुटारू ललना : 991. Medusa.

सो णत्थि एत्थ गामो जो एअं महमहन्तलाअण्णं ।
तरुणाणं हिअअलुडिं परिसक्कंतिं णिवारेइ ॥ 997 ॥

[स नास्ति अत्र ग्रामे य एवां महमहल्लावण्याम् ।
तरुणानां हृदयलुण्टाकीं परिष्वक्कमाणां निवारयति ॥]

ह्या सुंदरीचें यौवन ओसंडून चाललें आहे. अनुरूप नायकाच्या अभावीं ती उंडारली आहे. ही तरुणांचीं हृदयें लुटीत आहे. तिला आवरील असा कोणी या गांवांत तरी नाहीं.

● छाया काव्यप्रकाशावरून. संसृष्टि.

९९२ सैल अंबाडा : 992. Braid.

सो सुद्धसामलंगो धम्मिल्लो, कलिअललिअणिअदेहो ।
तीए खंधाहि वलं गहिअ सरो सुरअसंगरे जअइ ॥ 998 ॥

[स मुग्धश्यामलाङ्गो धम्मिल्लः कलितललितनिजदेहः ।
तस्याः स्कन्धाद्बलं गृहीत्वा स्मरः सुरतसङ्गरे जयति ॥]

सुगन्धी गजरा घातलेला तिचा काळाभोर खोपा सैल होऊन बलात्कारानें तिच्या स्कंधाचें ग्रहण करता झाला व अधिकच मनोहर दिसूं लागला; यामुळें श्यामल कान्तीच्या मदनाला नवें सौंदर्य प्राप्त झालें. सुरत संग्रामांत विजयी होणाऱ्या मदनाचा जय असो.

● छाया काव्यप्रकाशावरून. सैल झालेला अंबाडा पाहून नायकाची आसक्ति पुन्हां जागृत झाली.

---

१. स्फुरल्लावण्यम्. २. हृदयलुण्ठनं परिसर्पन्तीं. ३. मुद्ध. ४. कहिअ. ५. सुद्ध. ६. लब्ध्वा .

९९३ राजनिष्ठा : **993. Loyalty.**

होमि वहत्थिअरेहो णिरंकुसो अह विवेअरहिओ वि ।
सिविणे वि तुमम्मि पुणो पत्तिहि ! भात्त ण सुमरामि ॥ 999 ॥

[भवाम्यपहस्तितरेखो निरङ्कुशोऽथ विवेकरहितोऽपि ।
स्वप्नेऽपि त्वयि पुनः प्रतीहि भक्तिं न प्रमोक्ष्यामि ॥]

हे राजन्—मीं मर्यादा सोडल्या आहेत; मी उच्छृङ्खल आहे, धर्माधर्मविचारशून्य आहे; तरीही, अगदीं खरें सांगतों, तुमची अवज्ञा करण्याची कल्पना माझ्या स्वप्नांतही येणार नाहीं.

● छाया काव्यप्रकाशावरून.

९९४ वसंत : 994. Cupid's Companion.

सज्जेइ सुरहिमासो ण ओपणेइ जुअइजणलक्खसंहे ।
अहिणअसहआरमुहे णअपल्लवपत्तणे अणंगसरे ॥ 1000 ॥

[सज्जयति सुरभिमासो न तावदर्पयति युवतिजनलक्ष्यमुखान् ।
अभिनवसहकारमुखान्नवपल्लवपत्रलाननङ्गस्य शरान् ॥]

सपल्लव आम्रमंजिरीचीं अग्रें आहेत असे शर अनङ्गसखा वसन्त सज्ज करतो, पण त्यांचें लक्ष्य जें युवतिजन, त्यांवर ते सोडीत मात्र नाहींत.

● छाया ध्वन्यालोकावरून. साहित्यदर्पणांत श्री विश्वनाथ कविराज सांगतात: "अत्र वसन्तः शरकारः, कामो धन्वी, युवतयो लक्ष्यम्, पुष्पाणि शरा इति कविप्रौढोक्तिसिद्धं वस्तु प्रकाशीभवन्मदनविजृम्भणरूपं वस्तु व्यनक्ति।"

१. भमामि. २. अप्पेइ दाव. ३. मुहे. ४. चावनवति. ५. सहान.

९९५ कदली : 995. Self Sacrifice.

ताण पुरओ य मरीहं कयलीथंभाण सारिसपुरिसाणं ।
जे अत्तणो विणासं फलाइं दिंता न चिंतंति ॥

सज्जन कदलीस्तंभासारखे असतात. दुसऱ्यांना फळें देण्यामुळें होणाऱ्या आत्मनाशाची ते चिंता करीत नाहींत. त्यांना नमन असो.

● श्री. टॉने यांचें इंग्रजी भाषांतर.

No disrespect should be shown to those men who are like banana stems,

Who when bearing fruit do not regard their own destruction.

९९६ सरस-नीरस : 996. Wet and Dry.

जह सरसे तह सुक्के वि पायवे धरइ अणुदिणं विंझो ।
उच्छंगसंगयं णिग्गुणं वि गरुया न मुंचंति ॥

सरस झाडांप्रमाणेंच शुष्क झाडेंही विन्ध्य पर्वत अहोरात्र धारण करतो. जो आपल्या मांडीवर वाढला तो अगदीं निर्गुण असला तरी थोर त्याचा त्याग करीत नाहींत.

● श्री. टॉने यांचें इंग्रजी भाषांतर :

The Vindhyas supports every day dry trees as well as trees full of sap,

The great do not abandon one who has been reared in their lap, though he be worthless.

९९७ सुखदुःख : 997. Difference.

सरिसे माणुसजम्मे दहइ खलो सज्जणो सुहावेइ ।
लोह च्चिय सन्नाहो रक्खइ जीयं असी हरइ ॥

सज्जन व दुर्जन, दोघेही माणसेंच; सज्जन सुख देतात आणि खल दाह करतात. चिलखत व तलवार, दोन्हीं लोहाचींच; तें जीविताचें रक्षण करतें व ती जीव घेते.

९९८ अद्वितीय : 998. Sandal Wood.

सयलजणाणंदयरो सुक्कस्स वि एस परिमलो जस्स ।
तस्स नवसरसभावंमि होज्ज किं चंदणदुमस्स ॥

चंदनवृक्ष सर्वांना आनन्दित करतो. शुष्क झाला तरी त्याचे अंगीं सुगंध असतो. अशा या गुणांत त्याची बरोबरी कोण करणार ?

९९९ दशकोटि : 999. Bounty.

हारो वेणीदंडो खट्टुग्गलियाइं तहय तालु वि ।
सालाहणेण गहिया दहकोडीहिं च चउगाहा ॥

हार, वेणीदण्ड, खट्टुग्गलिय व तालु या शब्दांनीं सुरुवात होणाऱ्या चार गाथा सालाहणानें दहा कोटी मुद्रा देऊन घेतल्या.

१००० फेनपुञ्ज : 1000. Lounge.

मग्गु च्चिय अलहंतो हारो पीणुण्णयाण थणयाण ।
उव्विग्गो भमइ उरे जउणाणइफेणपुंज व्व ॥

[मार्गः एव अलभन् हारः पीनोन्नतयोः स्तनयोः ।
उद्विम्बः भ्रमति उरसि यमुनानदि फेनपुञ्ज इव ॥]

पीन व उन्नत स्तनांमध्यें मार्ग न मिळाल्यामुळें मुक्ताहार वरचेवर वावरत आहे, यमुनेच्या लाटांवर फेंसाचा पुंजका वरच्यावर फिरतो तसा.

● क्र. ६६९ आणि क्र. १००० या गाथा एकच आहेत.

१००१ कृष्णोज्वल : 1001. Ebony.

कसिणुज्जलो य रेहइ—

● या उपलब्ध भागावरून गाथेचा अर्थ लागत नाहीं.

१००२ दुःखद सुख : 1002. Pleasures.

परिओससुंदराइं सुरए जायंति जाइं सुक्खाइं ।
ताइं चिय तव्विरहे खट्टुग्गलियाइं कीरंति ॥

● क्र. ६६८ व क्र. १००२ या गाथा एकच. खट्टुग्गलियाइं = मोठ्या कष्टानें सोडावीं लागतात. पुनरावृत्ति अशक्य झाल्यामुळें कीं काय ! खट्टा = खाट, हा अर्थ घेतला तर — तोंवर मिळालेलीं सुखें खाटेवर निचरतात !

१००३ पोपट : 1003. Parrots.

ता किं करोमि माए खज्जउ सालीउ कीरनिवहेहिं ।

पोपटांच्या पिलांनीं साळीचीं रोपें खाल्लीं, मग, मी काय करूं ?

● या गाथेचा एवढाच भाग उपलब्ध आहे.

१००४ विटप : 1004. Fruits & Leaves.

अहलो पत्तावरिओ फलकाले मुयसि मूढ ! पत्ताई ।
इण कारणि रे विड विडव मुद्ध ! तुय एरिसं नामं ॥

हे विटपा, फळें नसतात तेव्हां तूं पानांनीं आच्छादलेला असतोस; आणि मूढा, तूं फळें धारण करतोस तेव्हां मात्र पानें ढाळतोस. म्हणूनच तुला विटप हें नांव मिळालेलें दिसतें.

● तुझ्या पर्णाच्छादित देहाचें दर्शन मोहक असतें, पण तें निष्फळ असतें; आणि तूं सफल असतोस तेव्हां स्वतःचें दैन्य दाखवितोस. तुझी तुलना विटाशींच केली पाहिजे. विट म्हणजे कामुकानुचर, वेश्येचा आश्रित; शिफारस करण्याजोगें माणूस त्यांच्यापाशीं असतें तेव्हांच तो दारोदार हिंडत असतो.

१००५ केसरी : 1005. Majesty.

निव्वूढ पोरिसाणं असच्चसंभावणा वि संभवइ ।
इक्काणणे वि सीहे जाया पंचाणणपसिद्धी ॥

[निर्व्यूढ पौरुषाणाम् असत्य संभावनाऽपि संभवति ।
एकानने अपि सिंहे जाता पंचानन प्रसिद्धिः ॥]

पराक्रमाबद्दल प्रसिद्ध असलेल्या पुरुषांच्या कीर्तींत कित्येक वेळां अतिशयोक्तीचा अंश असलेला दिसतो; पहा. सिंहाला तोंड असतें एकच आणि त्याला म्हणतात मात्र पंचानन.

१००६ लोकमान्य : 1006. Father of the People.

आसन्ने रणरंभे मूढे मंते तहेव दुब्भिक्खे।
जस्स मुहं जोइज्जइ सो च्चिअ जीवउ किमन्नेण॥

युद्धाला सुरुवात होण्याचे वेळीं, मनुष्याची मति मूढ होते अशा वेळीं किंवा दुष्काळांत ज्याच्या मुखाकडे पाहण्यांत येतें तोच जीवन जगला व जगावा, इतरांचा काय उपयोग ?

परिशिष्ट पहिलें

गाथानुक्रमणिका

●●●

परिशिष्ट दुसरें

(अ) अलंकारोल्लेखसूचि :

बारा आलंकारिकांनीं व एका सुभाषितसंग्रहांत उद्धृत केलेल्या गाथांचा तपशील या कोष्टकांत दिलेला आहे. अखेरच्या रकान्यांत अलंकारांचीं नांवें दिलीं आहेत; या खणांत जेथें एकाहून अधिक नांवें आलेलीं आहेत तेथें त्यांबद्दल भिन्न आलंकारिकांचा मतभेद आहे असें समजावें. अलंकारांच्या व्याख्या शरीरखण्डांत टीकेंत दिलेल्या आहेत. गाथेंतील भाव अगर नायिकेचा वर्ग दर्शविण्यासाठीं यांपैकीं कांहीं गाथा आलंकारिकांनीं उद्धृत केलेल्या आहेत; याचा तपशील अखेरच्या रकान्यांत दिलेला नाहीं. इतर आलंकारिकांनीं आणखी कांहीं गाथा उद्धृत केल्या आहेत, त्यांचाही निर्देश या रकान्यांत केलेला आहे.

(आ) अलंकारसूचि

या सूचींत अलंकारोल्लेखसूचींत नमूद केलेल्या अलंकारांचा गाथांच्या क्रमांकांशीं मेळ दिलेला आहे. जो अंक ठळक टंकांत घातलेला आहे त्या गाथेवरील टीकेंत त्या अलंकाराची व्याख्या दिलेली आहे असें समजावें.

(अ:) अलंकारोल्लेखसूचिः

गाथा क्रमांक	अलंकारकौस्तुभ	अलंकारमहोदधि	अलंकाररत्नाकर	अलंकारसर्वस्व	काव्यप्रकाश	काव्यप्रदीप	काव्यानुशासन	दशरूपक	ध्वन्यालोक	वज्जालग्ग	सरस्वतीकण्ठाभरण	साहित्यदर्पण	साहित्यमीमांसा	अलंकार
	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	क्रमांक
२										×				
४	×				×	×						×	×	धर्मोक्ति, व्यंग्योक्ति, स्वभावोक्ति.
५								×		×				रसाश्रित भाव.
८											×		×	प्रकीर्णघटना.
९										×				
११	×													समाधि.
१२	×		×					×						आक्षेप, व्यत्यास.
१३	×										×		×	निदर्शना, विकृत प्रपंचोक्ति, संकर.
१४		×	×								×			
१५											×			
१६	×										×			परिकर.
१७											×			
२०			×									×		उद्भेद, व्याज.
२१											×			
२२											×			
२५			×								×			अर्थापत्ति.
२७							×	×				×		
२८											×		×	
२९											×			
३६	×									×	×			विशेषोक्ति, समुच्चय.
३८										×				
३९											×			
४३											×			
४५										×				

गाथा क्रमांक	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	अलंकार
४६										×				
४७								×			×			
४८			×								×			परभाग.
५०	×										×			अप्रस्तुतप्रशंसा, परिवृत्ति.
५१										×				
५५		×									×			
५७										×	×			
५८										×				
५९										×				
६०		×									×		×	
६५											×			
६९											×			
७०										×	×		×	अपन्हुति.
७२			×								×			समुच्चय.
८४											×			अर्थापत्ति.
८५			×											
८६											×			
८७											×			विरोध.
८८											×			
९१											×			
९३													×	
९६											×			
९८		×									×			
१००											×		×	अर्थान्तरन्यास.
१०६	×						×				×			परिवृत्ति, पर्याय.
१०८											×			
११०									×					
११२											×			पर्याय.
११३											×		×	
११७	×													
११९										×				
१२०										×				

गाथा क्रमांक	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	अलंकार
१२७		×	×				×							व्याजोक्ति.
१३०							×	×			×		×	भाव.
१३२	×													तुल्ययोगिताः विशेष.
१४१			×											
१४२											×			
१४३			×											हेतु.
१४५		×									×			अभिनय, स्वभावोक्ति, हेतु.
१४७											×			अप्रस्तुतप्रशंसा.
१४८		×									×			
१५०											×			
१५८	×													पर्याय.
१६१	×	×									×			(कुवलयानन्द) अन्योन्य, प्रतीयमान.
१६३										×				
१७३		×					×		×	×				(चंद्रालोक).
१७५		×			×	×	×		×				×	(राकागम; भावप्रकाश).
१७६	×													परिवृत्ति.
१७८		×		×						×			×	आक्षेप.
१७९	×		×											पर्याय.
१८०			×								×			(काव्यालंकार) गूढ, सूक्ष्म.
१८१										×				
